# तेरा गोष्टी

र. धों. कर्वे, एम्. ए.

125318

१ रुपया

# समाजस्वास्थ्य मासिक

संपादक : **र. धों. कर्वे** एम्. ए.

दिप्लोम् द एत्युद् स्युपेरिअर् ( पॅरिस )

सर्व सामाजिक विषयांची व विशेषतः कामशास्त्राची निर्भीड चर्चा करणारें व दर महिन्याचे १५ तारखेला नियमितपणें प्रसिद्ध होणारें अशी या मासिकाची ख्याति आहे. जुलै १९४० पासून १४ वें वर्ष सुरू होईल.

वार्षिक वर्गणी रु. १॥, व्ही. पी. ने १॥।, हिंदुस्थानाबाहेर रु. २ किंवा शिलिंग ३.

कोणत्याही महिन्यापासून सुरू करतां येतें. नमुन्याकरतां आम्हास वाटेल तो अंक फुकट पाठवूं.

**राइट एजन्सी,**

१३ नवी भटवाडी, मुंबई-४.

2.3.95
85p.
Rs.1/-
Comp.

# तेरा गोष्टी

र. धों. कर्वे, एम्. ए.

891.463
Kar/Ter

124315

१ रुपया

# अनुक्रमणिका

नांवें पृष्ठें


| | | |
|---|---|---|
| १. | नानासाहेब टक्के ( नोव्हेंबर १९३४ ) ... ... | ३ |
| २. | पुनर्विवाह ( जानेवारी १९३५ ) ... ... | १० |
| ३. | अग्निशलाकामंजूषा ( जून १९३७ ) ... ... | १८ |
| ४. | सहकार्य ( एप्रिल १९३८ ) ... ... | २४ |
| ५. | प्रेम ( मे १९३८ ) ... ... | ३० |
| ६. | कठिण प्रसंग ( जून १९३८ ) ... ... | ३६ |
| ७. | विमलेचें शील ( आक्टोबर १९३८ ) ... ... | ४० |
| ८. | आमची कुसुम ( जून १९३९ ) ... ... | ४५ |
| ९. | स्नेहाची कसोटी ( जुलै १९३९ ) ... ... | ५२ |
| १०. | झोपेचें औषध ( आगस्ट १९३९ ) ... ... | ६० |
| ११. | विवाहाचें सुख ( आक्टोबर १९६९ ) ... ... | ६६ |
| १२. | जगाचा अनुभव ( डिसेंबर १९३९ ) ... ... | ७१ |
| १३. | पंचप्रसंग ( जानेवारी १९४० ) ... ... | ७७ |

# प्रस्तावना

या सर्व गोष्टी ‘ समाजस्वास्थ्य ’ मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत, आणि त्या ज्या अनुक्रमाने लिहिल्या व प्रसिद्ध केल्या त्याच अनुक्रमाने येथे दिल्या आहेत. या गोष्टींतील सर्व पात्रें काल्पनिक आहेत.

जून १९४० र. धों. कर्वे.

# नानासाहेब टके

पन्नाशीच्या वयाली तिसऱ्या बायकोला निजधामाला पाठवल्यावर मात्र नानासाहेबांनी निश्चय केला की पुनः या भानगडींत पडायचें नाही. संतानाच्या आशेने त्यांनी एका नंग्या महाराजाला गुरु देखील केला होता, पण आतां ती आशा सोडून गुरूच्या साह्याने मोक्ष मिळवण्याचा त्यांनी बेत केला, पण मनुष्य बेत करतो एक आणि होतें भलतेंच !

नानासाहेब रंगेल गडी म्हणून प्रसिद्ध होते. बापाने मुबलक पैसा कमावून ठेवल्यामुळे त्यांनी कॉलेजांत अभ्यासाकडे विशेष लक्ष न देतां उनाड मुलांच्या संगतींत चार वर्षें घालवून दोन परीक्षा पास होऊन कॉलेजला कायमचा रामराम ठोकला होता. त्यांच्या लग्नाच्या बायका तीनच झाल्या होत्या, पण इतरांचा त्यांनी हिशेब ठेवला नव्हता, आणि शरीरसंपत्ति व रुबाब भरपूर असल्यामुळे त्यांना या बाबतींत फारसे पैसेहि खर्चावे लागले नव्हते; निदान ते कोणाच्याही विशेष नादीं लागले नव्हते. पण जो बायकांच्या नादीं लागला नाही तो आता गुरूच्या नादीं लागतो की काय, अशी त्याच्या मित्रांना भीति पडली होती.

ललिता आणि तिचा कॉलेजांतील सहाध्यायी सदाशिव जोशी बाजारांत बरोबर जात असतां रस्त्यांत नानासाहेबांनी तिला पाहिली मात्र, ते सर्व जग विसरून आ पसरून पहातच राहिले. बंडोपंत जेव्हा त्यांना म्हणाले ' अहो ! चला की आता ! लोक काय म्हणतील ? ' तेव्हा ते जागे झाले. बंडोपंत, त्यांचे लहानपणचे दोस्त, 'भिकारडे, रडके आणि कंपनीं'त पोटाकरता कारकुनी करीत आणि राहिलेला वेळ नानासाहेबांकडे काढीत. नानासाहेब त्यांना एक पैहि न देतां आश्रितासारखे वागवीत आणि खासगी कामें त्यांच्यावर सोंपवीत. नाजूक कामें करण्यांत बंडोपंतांसारखा मनुष्य नाही. अर्थात् ललिता कोणाची कोण, याचा शोध लावण्याचें काम ओघानेच त्यांचेकडे आलें. त्यांनी दुसऱ्याच दिवशीं

बातमी आणली की 'ती कॉलेजच्या वसतिगृहांत राहून इंटरचा अभ्यास करते आणि तिचा बाप यशवंतराव देशपांडे पेनशनर असून धामणगांवाला राहतो आणि बापाशिवाय तिला कोणी नाही.' ही बातमी ऐकून नानासाहेब थोडे निराशच झाले. अशी मुलगी लग्नाशिवाय मिळणार नाही हें जवळजवळ ठरलेलेंच, पण पन्नाशीच्या मनुष्याबरोबर लग्नाला तरी ती तयार होईल कशावरून ? तरी पण अशा प्रसंगीं बंडोपंतांचें चातुर्य त्यांना माहीत असल्यामुळे त्यांनी अगदींच धीर न सोडतां त्यांना तावडतोब रजा घ्यायला लावून धामणगांवला पिटाळलें.

ते गेल्यावर नानासाहेबांची स्थिति फारच शोचनीय झाली, ललितेला पाहिल्याबरोबर जणूं काय ती फार दिवसांच्या ओळखीची आहे असा त्यांना भास झाला आणि कदाचित् ती आपली मागल्या जन्मींची बायको तर नसेल ना ? असाहि विचार आला. यापूर्वी आपले किती जन्म झाले आणि त्यांत आपल्या बायका किती झाल्या, याला कांहीच पुरावा नसल्यामुळे असा भास अनेक बायकांसंबंधी होणें स्वाभाविक आहे. पण त्याचा उपयोग काय ? ललिता अशाने थोडीच बधणार होती ? उलट आपण निर्लज्जासारखे तिच्याकडे पहात उभे राहिलों तें तिच्या लक्षांत येऊन ती रागाने मानेला एक हिसडा देऊन निघून गेली होती तेंहि त्यांना आठवलें. पण तो हिसडा तरी किती गोड ! तो पुन्हा पाहण्याकरता तिला आणखी राग आणण्यासारखें कांही केलें तर ? हो, पण तिने पुनः मानेला हिसडा देण्याऐवजीं मुस्कटांत दिली तर ? कॉलेजांतल्या मुली काय करतील कांही भरंवसा आहे ? नकोच तें. त्यापेक्षा आपलें सरळ मार्गाने गेलेलें बरें.

इकडे बंडोपंतांनी नानासाहेबांच्या वैभवाचें रसभरित वर्णन करून यशवंतरावांची संमति मिळवली; इतकेंच नाही तर मुलीचें मन वळवण्याचें कामहि बापानेच अंगावर घेतलें. यशवंतरावांनी ललितेला एक लांबलचक पत्र लिहिलें की ' माझी प्रकृति हल्ली बरी नसते. माझ्या पेन्शनांतून तुझा खर्च मी कसाबसा चालवतों, पण मी मेलों तर तुझें शिक्षण कसें होईल ? त्यापेक्षा नानासाहेबांसारख्यांशी लग्न केलेंस तर जन्माची ददात नाहीशी होईल. मी तुला आजपर्यंत माझी मुलगी म्हणून वाढवली खरी, पण आता तुला खरी हकीकत सांगणें भाग

आहे. तूं अगदी लहानपणीं मला घराच्या पायरीवर ठेवलेली सांपडलीस. जवळच एक पत्रहि सांपडलें, त्यावरून असें दिसतें की तुला तेथे ठेवून तुझ्या आईने जीव दिला असावा. पोलीसच्या भीतीमुळे मला तिचा फारसा तपासहि करतां आला नाही. त्याच पाकिटांत आणखी एक बंद पत्र होतें. तें तूं एकविसाव्या वाढ-दिवसाला फोडावें असें त्यावर लिहिलेलें आहे. त्या वेळीं तें तुला मिळण्याची मी व्यवस्था करीन. अंगावर पडलेली जबाबदारी स्वीकारून मीं ती शक्य तितकी पार पाडली आहे आणि तुझें शिक्षण पुरें होईपर्यंत मीं तुला लग्नाचा आग्रहहि केला नसता. पण माझीच आता शाश्वती नाही, तेव्हा चालत आलेल्या मागणीला रुकार देऊन तूं मला यांतून सोडवावें हें बरें नाही का? एरवी मला स्वस्थपणें मरण येणार नाही. मी आता थोड्याच दिवसांचा सोबती आहें, तेव्हा माझी शेवंटची विनंति तूं अमान्य करणार नांहीस असें मी धरून चालतों. मला तसें कळव, म्हणजे पुढची व्यवस्था करायला बरें. एक गोष्ट मात्र लक्षांत ठेव. मी तुला सांगितलेलें गुपित बाहेर फुटतां नये, कारण त्यामुळे नानासाहेब नाकबूल होण्याचा संभव आहे आणि मग तुझ्या लग्नाची काळजी राहिली ती राहिलीच! फसवणुकीची सर्व जबाबदारी मी घेतों. तुला यांतलें कांही माहीतच नाही अशी तूं वाग.'

हें पत्र वाचून ललितेला फारच चमत्कारिक झालें. काय करावें कांही सुचेना. ती एकदम तांतडीने बापाला भेटायला गेली आणि एक दिवस तेथे राहून त्याची समजूत घालण्याचा तिने शक्य तो प्रयत्न केला: 'माझ्या लग्नाची किंवा पोटाची जबाबदारी तुमच्यावर आहे असें मी बिलकुल समजणार नाही. हल्लीच्या दिवसांत शिकल्यासंवरलेल्या मुलींचीं लग्नें बापांनी लावून द्यायचें मुळीच कारण नसतें. माझें मी आपलें पाहून घेईन.'

पण यशवंतराव कांही केल्या ऐकेनात. ते म्हणाले, 'तुम्हा पोरींना कांही पोंच नसतो. आमच्या अनुभवाचा फायदा तुम्हीं घेतला पाहिजे.'

ललितेला मोठा पेंच पडला. कांही संबंध नसतांना ज्याने आपल्याला मुलीसारखें वाढवलें, तो इतक्या काकलुतीने सांगत असतां त्याला नकार देऊन दुखवणें तिच्या जिवावर आलें. बरें सदाशिव जोशी होता गरीब, तेव्हा पोटाची

तजवीज होईपर्यंत तो या बाबतींत कांही बोलणें शक्य नव्हतें. आणि कोणाला माहीत तो नंतर तरी बोलेल की आपले नुसते मनांतले मांडेच आहेत? आणि तो कदाचित् केव्हातरी विचारील या आशेवर थांबावें तरी कसें? शेवटीं रात्रभर बोलण्यांत घालवून तिने म्हाताऱ्याचें म्हणणें कबूल केलें आणि त्याने त्याप्रमाणे नानासाहेबांना कळवलेंहि.

नानासाहेबांचें उलट डाकेने पत्र आलें की आम्हाला तर अर्थात् मुलगी पसंत आहेच, पण गुरुजींची संमति घेणें जरूर आहे. ललितेला हें कळल्याबरोबर ती म्हणाली, 'मी नंग्या महाराजांच्या दर्शनाला मुळीच येणार नाही. त्याला एक लाज नसली तरी मला आहे की नाही?'

बाप म्हणाला 'तूं वेडी आहेस! तो नंगा असला तर तुझें काय बिघडलें? शेंकडों बायका त्याच्या दर्शनाला जातात, त्यांत तूं एक गेलीस म्हणून काय झालें? थोडक्याकरता लग्न कशाला मोडायचें?'

शेवटीं ती कबूल झाली. तिची नानासाहेबांशी ही पहिलीच मुलाखत. प्रश्नाला उत्तर देण्यापलीकडे ती कांहीच बोलली नाहीं, तेव्हा नानासाहेबांना वाटलें, 'कॉलेजांत असून सुद्धां विनयशील आहे हां!'

तिने पादस्पर्श करण्याऐवजी महाराजांना सरळ नमस्कार केला आणि हळूच म्हणाली 'इश्श! पायाला काय हात लावतात? घाणेरडे आहेत हे सगळे लोक!' महाराजांचे कान मोठे तीक्ष्ण होते. बाप तिला कांही म्हणणार, इतक्यांत ते म्हणाले 'ठीक आहे, ठीक आहे, कांही बिघडलें नाही.. चालायचेंच.' या कॉलेजांतल्या कारटीचा उन्मत्तपणा पाहून ते मनांत खूप संतापले, पण तें बाहेर दिसूं देण्यांत फायदा नव्हता. त्यांना हें ताबडतोब दिसलें की नानासाहेबांचें मन या मुलीवर फारच गेलें आहे आणि त्यांना नकार देऊन ते ऐकतील की नाही याची शंकाच होती. सूड उगवायला पुढे केव्हाहि संधि सांपडेल. त्यांनी हंसतमुखाने रुकार दिला.

येथपर्यंत तिने सदाशिवाला याची मुळीच दाद दिली नव्हती. त्याला जेव्हा परस्पर कळलें की ती नंग्या साधूच्या दर्शनाला गेली होती, तेव्हा त्याने तिची खूपच चेष्टा केला, आणि शेवटीं तिला सगळी हकीकत सांगणें भाग पडलें. ती

आपल्याशी लग्न करणार असें धरून चालल्यामुळे तो खूप संतापला आणि तिला आणि एकंदर स्त्रीजातीला तोंडास येईल तें बोलला. पण शेवटी ती रडूं लागल्यामुळे त्यालाच तिचें सांत्वन करणें भाग पडलें आणि लग्न झाल्यावरही मैत्री ठेवण्याचें वचन द्यावें लागलें.

लग्नाच्या आदल्या रात्रीं ललितेला कांही केल्या झोंप येईना. उद्या रात्रीं एका परक्या मनुष्याशेजारीं आपल्याला निजावें लागणार, ही कल्पना तिला कशीशीच वाटली. सुदैवाने नानासाहेबांमधे बाह्यतः तरी किळस येण्याजोगें कांही नव्हतें, तरी देखील एखाद्या अनोळखी मनुष्याला आपल्याशी अशा प्रकारची सलगी करूं देणें भाग पडावें, हें तिला अत्यंत लाजिरवाणें वाटलें. बापाच्या सांगण्यावरून कां होईना पण आपण जर पैशाकरताच लग्न करीत आहोंत, तर वेश्यांना नांवें ठेवण्याचा आपल्याला काय हक्क आहे? हा विचार मोठासा सुखद नव्हता. सदाशिवशीं आपलें लग्न होत असतें तर आपल्याला असें वाटलें नसतें. सदाशिवला मैत्री कायम ठेवण्याचा आग्रह केला हें बरें झालें कां? नानासाहेब तिच्या रूपावर भुलले होते, त्यांत प्रेमाचा संबंधच नव्हता. मग आपण सदाशिवला विसरण्याचा तरी प्रयत्न कां करावा? विवाहाने नानासाहेबांना शरीराचा ताबा मिळणारच होता, पण मनाचा ताबा काय पैशाने मिळत असतो? साहजिकच सदाशिव तिच्या मनांत कायमचें ठाणें देऊन बसला. विवाहानंतरच्या रात्रीचा विचार मात्र तिला सहन करवेना, पण तें टाळण्याचा कोणताही मार्ग नव्हता. 'आलिया भोगासी असावें सादर' असें म्हणण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

या सर्व विचारांचा परिणाम नानासाहेबांना पहिल्या रात्रीं भोगावा लागला. नानासाहेब रंगेल होते, त्यांना सौंदर्याची पारख होती, आणि सुंदर घोडा जसा पाहून घ्यावा, तशीच त्यांनी सुंदर बायको पाहून घेतली होती. अर्थात् बायकोची पारख चेहरा व हातपाय पाहूनच करावी लागते आणि घोड्याचे बाबतींत असा निर्बंध नसतो, इतकाच काय तो फरक. हा फरक विवाहानंतर राहण्याचें कारण नाही असे ते मनांत समजत होते, पण अनुभव वेगळाच आला. आपल्या विटंबनेचा कळस आपल्याला डोळ्यांनी तरी पहावा लागूं नये म्हणून नानासाहेब

थोडी जास्त लगट करूं लागतांच तिने दिवा मालवला. ' दृष्टीआड सृष्टि ' या म्हणीचा एक नवीनच अर्थ या वेळीं तिच्या मनांत आला. नानासाहेबांनी आपल्याकडून चलाखी करून तिला फसवून मधेच दिवा लावण्याचा प्रयत्न केला, पण ती त्यांचेपेक्षा साहजिकच चपळ असल्यामुळे ती तेव्हाच पांघरूण घेई. हा हट्ट तिने शेवटपर्यंत चालवला.

लग्नानंतर थोड्याच दिवसांनी यशवंतराव वारले. सदाशिवने तिला न भेटण्याचा वेत केला होता, पण तिचें सांत्वन करण्याकरता जावेंच लागलें आणि नंतर तो वारंवार जाऊं लागला. नानासाहेबांना जरी तें फारसें आवडत नसे, तरी आपण इतकी सवलत न दिली तर चारचौघांत ती आपली फजीती करील ही भीति होती. अशा तऱ्हेने ललिता व सदाशिव यांचें परस्पर आकर्षण परमावधीला जाऊन पोंचलें.

कालांतराने तिला मुलगी झाली. नानासाहेबांचा विरस झाला, पण तो दिसूं न देतां ते तिला इस्पितळांत भेटायला निघाले. मुलगी त्यांना अगदी ललितेसारखीच दिसली, आणि ' तूं नाहीतर तुझी प्रतिमा तरी मला पहायला मिळालीच कीं नाही ? ' अशी त्यांनी तिची चेष्टाहि केली. परंतु ते मुलीकडे बारकाईने पहात असतां मधेच काय झालें कोणास ठाऊक, त्यांचा चेहरा एकदम उतरला आणि ते ताडकन् घरीं गेले.

मुलींत त्यांना असें काय दिसलें ? स्मरणशक्ति मोठी चमत्कारिक चीज आहे. तिच्या मांडीवरच्या बारीकशा तिळाने त्यांना २२ वर्षांमागच्या एका गोष्टीचें स्मरण करून दिलें. हें शक्य आहे का, या प्रश्नाचा त्यांना बिलकुल उलगडा होईना. असाच तीळ त्याच जागीं चंपीच्याही अंगावर होता ! मग काय, आपल्यावरील निस्सीम प्रेमामुळे चंपीच आपल्या पोटीं जन्माला आली ? विचार करतां करतां एकदम वीज चमकल्याप्रमाणे त्यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला, आणि त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटलें की ललिता ही चंपीची जिवंत प्रतिमा आहे ही गोष्ट आपल्या लक्षांत इतके दिवस कशी आली नाही ? आता मात्र त्यांना वेड लागण्याची वेळ आली. त्यांनी तावडतोब आपल्या एका डाक्टर मित्राला गांठून विचारलें की तिळांसारख्या शारीरिक खुणा आनुवंशिक असूं शकतात

काय ? त्याने नकारार्थी उत्तर दिलें, पण संशयाने पछाडलेल्या मनाची तेवढ्याने शांति होईना. ते पुनः घरीं आले आणि ललितेच्या खाजगी पेटीचें कुलूप फोडून त्यांतील कागदपत्र चाळूं लागले. तोंच ललितेच्या नांवच्या एका बंद पत्रावरील हस्ताक्षर पाहून ते चपापले. तें फोडून वाचल्यावर ललिता ही त्यांची स्वतःचीच मुलगी होती याबद्दल कोणतीहि शंका राहणें शक्य नव्हतें.

नकळत कां होईना, पण आपल्या हातून काय भयंकर पाप झालें हें ! त्यांच्या बावरलेल्या मनाला यापुढे विचारच करतां येईना. त्यांना एकच मार्ग सुचला की सर्व हकीकत गुरुजींच्या कानावर घालून त्यांचा सल्ला घ्यावा. गुरुजी म्हणजे परमेश्वराचे जिवलग दोस्त, तेव्हा अशा भयंकर पापाचें प्रायश्चित्त काय असावें हें त्यांच्याशिवाय कोण सांगणार ? गुरुजींनी त्यांना एक दिवस आश्रमांत राहण्यास सांगून दुसऱ्या दिवशीं निकाल देण्याचें कबूल केलें. त्याच रात्रीं त्यांना साक्षात्कार झाला—निदान ते तसें म्हणाले—की या पापाला देहांत प्रायश्चित्तच योग्य. त्यांनी अशीहि खात्री दिली की देहांत प्रायश्चित्ताने पापाचें पूर्ण क्षालन होऊन आत्मा परीटघडीसारखा स्वच्छ होईल. पण स्वर्गांत उच्च स्थान मिळण्याकरता थोडें पुण्य करून ठेवलेलें बरें; आणि त्यांच्या एका शिष्यानें हळूच सुचवलें की आपली सर्व संपत्ति आश्रमाला देण्यासारखें पुण्य दुसरें कोणतेंच नाही. पण नानासाहेबांत थोडी माणुसकी होती. त्यांनी जीव देण्याचा तर निश्चय केलाच, कारणं या भयंकर स्थितींत जिवंत राहणें त्यांना अशक्य वाटलें. पण त्यांना असेंहि उघड दिसलें की यांत ललितेची किंवा तिच्या तान्ह्या मुलीची चूक नाही, तेव्हा त्यांची सोय लावलीच पाहिजे; आपल्याला पुण्य थोडें कमी लागलें तरी हरकत नाहीं. असा विचार करून त्यांनी आपली निंमी इस्टेट आश्रमाला आणि निंमी ललितेला मृत्युपत्राने ठेवली आणि जीव देण्यासाठीं स्वस्थ चित्ताने पिस्तुलाचा उपयोग केला. ललितेला ही बातमी इस्पितळांतच कळली. जीव दिल्याचा स्पष्ट पुरावा होता आणि नानासाहेबांना लांबचा वारस देखील कोणी नसल्याने कायद्याचीहि कांही भानगड उपस्थित झाली नाही.

आपण ललितेचा सूड उगवायला गेलों आणि हें काय भलतेंच झालें अशी नंग्या महाराजांना मात्र चुटपुट लागून राहिली. त्यांनी सदाशिव जोश्याला

बोलावून आणून सांगितलें, 'नानासाहेबांना मूल होणें शक्य नव्हतें हें मला सिद्ध करतां येईल आणि तुमच्या व्यभिचाराने तिला मुलगी झाली हें स्पष्ट आहे. मुकाट्याने राहिलेली अर्धी इस्टेट तिच्याकडून आश्रमाला देववा, नाहीतर तुमच्यावर व्यभिचाराची फिर्याद करवून हें सगळें लफडें कोर्टांत आणतों.'

एका वकील मित्राचा सल्ला घेऊन त्याने महाराजांना सांगितलें, 'व्यभिचाराची तक्रार नवऱ्याकडून यावी लागते, तो तर मेला. आता तुम्हीं गप्प बसलां नाहीत तर तुमच्याच सगळ्या भानगडी बाहेर काढीन. मुलगी माझी असली तर ठीकच झालें. मी आतां ललितेशी लग्न करीन म्हणजे झालें.' महाराजांना अर्ध्या इस्टेटीवरच समाधान मानावें लागलें! (नोव्हें. १९३४)

---

# पुनर्विवाह

पद्माकर देसाई नुकताच बी. ए. पास होऊन कॉलेजांत फेलो झाला होता आणि आज त्यानिमित्त त्याच्या खोलींत त्याच्याच बरोबर पास झालेल्या काळे, ढवळे, हिरवे, पिंगळे, वगैरे मित्रांना उपाहाराकरतां निमंत्रण होतें. पुढच्या बेतांबद्दल बोलतां बोलतां लग्नाचा विषय निघाला.

**काळे**—काय देसाई, डिबेटिंग् क्लबांत काय बोललां होतां, आठवतें आहे का?

**देसाई**—हो हो, माझा बेत कायम आहे. मी विधवेशीं लग्न करणार.

**पिंगळे**—बरें मग विधवा पहायला केव्हां निघणार? मी येईन हां, बरोबर. मला पहायचें आहे, लग्न करणाऱ्या विधवा कशा असतात त्या.

**ढवळे**—म्हणजे त्यांना काय शिंगें असतात काय? इतर मुलींसारख्याच त्या. कपाळाला कुंकूं नसतें इतकेंच.

**पिंगळे**—मुलींसारख्या कशावरून ? चांगल्या घोड्या असतात की मोठल्या !

**काळे**--तुला सभ्य माणसासारखें नाही कारे बोलतां येत ?

**पिंगळे**—सभ्य माणसासारखाच बोलतों आहे मी. 'गाढव' म्हटलें तर ती शिवी होते, 'घोडी' ही कांही शिवी नाही. घोडा हा उमदा प्राणि आहे, तुला माहीत नाही का ?

**ढवळे**—पण काय हो, मनाजोगी विधवा मिळाली नाही तर ?

**पिंगळे**—तर काय ? देसाईसारख्या बाणेदार माणसाचा एकदां शब्द गेला की मग तो ऐकणार नाही. मनाजोगी नाही मिळाली तर जशी मिळेल तशी. आंधळी, लंगडी, बहिरी, म्हातारी, कशी कां असेना ?

**देसाई**—अहो विद्वान, मनाजोगी न मिळाली तर अविवाहित राहतां येतें की !

**पिंगळे**—असें का? तें नव्हतें मला माहीत. पण अविवाहित राहिल्याने वैधव्यपंकांत रुतलेल्या गाईचा उद्धार कसा होणार ? तो तर तुझा उद्देश आहे. एरवीं साधेंच लग्न करायला काय हरकत होती ?

**देसाई**—तुला नाही तें कळायचें.

**पिंगळे**—बरें बुवा, नाही कळायचें. आम्ही कोठे पहिल्या वर्गांत आलों आहोंत ?

**काळे**—अरे पण तूं कां एवढा त्याच्या मागें लागला आहेस ? करीना तो हवें तें ?

**हिरवे**- तें नाहींच का तुला माहीत ? अरे त्याची ती फटाकडी बहिण आहे ना ? कमला ? जूनिअर बी. ए. च्या क्लासांत ? ती आहे देसाईवर फिदा. तिच्याकरतां कांहीतरी खटपट असेल.

**काळे**--अरेरे ! मीं तर अशा सुंदर मुलीचें मन मोडलें नसतें बुवा.

**देसाई**--तुम्ही हव्या त्या मुलींबद्दल असें बोलत जाऊं नका हां. एखाद्या वेळीं घोटाळा व्हायचा.

**ढवळे**-पण त्यांत विशेष काय आहे ? तूं देखणा आहेस, परीक्षेंत पहिला वर्ग मिळवतोस, खेळांत वक्षिसें मिळवतोस, कां नाही मुली तुझ्यावर फिदा होणार ? मी सांगतों कालेजांतल्या निम्या मुली तुझ्यावर फिदा आहेत.

**देसाई**--थँक्स व्हेरि मच्. पण माझा बेत ठरला तो ठरला.

प्रभाकर पिंगळ्याने अलीकडे पद्माकर देसाईशीं बरीच दोस्ती केली होती. तरी पद्माकर अजून कधी त्याच्या घरीं गेला नव्हता. प्रभाकराच्या आग्रहावरून तो एकदां गेला. नोकराने दार उघडून त्याला दिवाणखान्यांत बसायला सांगितलें. आंतल्या खोलींतून स्त्रीच्या मधुर आवाजांत संगीताचे आलाप ऐकूं येत होते. ते बंद झाले आणि प्रभाकर बाहेर आला.

पद्माकर म्हणाला, कोण रे गात होतें इतकें चांगलें ?

**प्रभाकर**--माझी वहिण.

**पद्माकर**--कमलाबाई ?

**प्रभाकर**--छे छे ! ही तूं पाहिलेली नसशील. तिची थोडी हकीकत आहे.

**पद्माकर**--ती काय बुवा ?

**प्रभाकर**--मला एकंदर दोन जुळ्या वहिणी. हिचें नांव अमला, आणि कॉलेजांत आहे ती कमला. हिचें लक्ष अभ्यासांत लागेना, म्हणून लग्न लवकर करून दिलें. आपल्या नेहमीच्या पद्धतीने मुलगा पसंत केला. बाबा मरून दोन वर्षें झालीं होतीं, तेव्हा आई आणि मीच ठरवणार ! मुलाबद्दल लोकांनी हव्या त्या थापा दिल्या, आणि आम्हीं विश्वास ठेवला. तो लफंगा निघाला, चोरी करून तुरुंगांत गेला, आणि एक वर्षापूर्वी तेथेच तो मेल्याची बातमी आली. असा नवरा जगण्यापेक्षा मेलेलाच बरा ! आमचा जीव खाली पडला. अमला कांही आम्हाला जड नाही. तिचा बहुतेक वेळ वाचण्यांत आणि गाण्यांत जातो. काय करणार बिचारी ?

इतक्यांत अमलेने चहा आणि शंकरपाळे आणून ठेवले आणि एक शब्दहि न बोलतां आणि जमिनीकडे लावलेले डोळे वर न उचलतां निघून गेली. जुळ्या वहिणी म्हणून प्रभाकराने सांगितलें होतें, तरी अमलेच्या

आणि कमलेच्या चेहऱ्यांतील विलक्षण साम्य पाहून पद्माकर थक्क झाला आणि तो तसें बोललाहि.

प्रभाकर म्हणाला, अरे लहानपणीं फार गंमत व्हायची. आई दोघींच्या हाताला निरनिराळ्या रंगाचे दोरे बांधून ठेवायची ओळखूं याव्या म्हणून! आणि कळूं लागल्यावर तर त्यांनी मधेंच केव्हातरी कपड्यांची अदलाबदल करून कितीतरी लोकांना घोटाळ्यांत पाडलें आहे.

पद्माकर एक उसासा टाकून म्हणाला, अरेरे! शेवटीं अशा रीतीने त्यांना ओळखणें सोपें व्हावें!

प्रभाकर म्हणाला, हंऽऽ! भगवदिच्छा बलीयसी. यद्भावि न तद्भावि, भावि चेन्न तदन्यथा.

विषय बदलण्याकरतां पद्माकराने कमलेची चौकशी केली. प्रभाकर म्हणाला, ती कोठली घरीं असायला! सदा आपल्या मैत्रिणींत दंग. काय करतात सारा दिवस कोण जाणे. जेमतेम जेवायला आणि निजायला घरीं असते. पद्माकर निघून गेला, पण अमलेचा त्याला कळवळा आला.

पद्माकर आतां वरचेवर प्रभाकराकडे जाऊं लागला आणि त्याची अमलेशींहि मैत्री झाली. तिच्या गाण्यावर तो अतिशय लुब्ध होता. तो जाई तेव्हा कमला एखादे वेळीं घरीं असलीच तर बाहेर जाण्याच्या तयारींतच असायची, आणि 'ओ, गुड मॉर्निंग!' म्हणून लगेच बाहेर पडायची. कॉलेजांत मात्र ती नेहमी दिसायची. तिचा एकंदर नखरा आणि अमलेचा साधेपणा यांतला विरोध अशा रीतीने त्याच्या मनावर चांगलाच ठसला आणि अमलेची मूर्ति त्याच्या मनांत अधिकाधिक भरूं लागली.

शेवटीं त्याने भीतभीतच प्रभाकरजवळ लग्नाची गोष्ट काढली. तो म्हणाला, विधवेशीं लग्न करण्याचा माझा निश्चय तुला माहीतच आहे. मीं अमलेलाच प्रत्यक्ष विचारलें असतें, पण मला धीर होत नाही. हो, हिंदू स्त्री आहे. तेव्हा पहिला नवरा कसाहि असला तरी त्याच्याबद्दल तिच्या मनांत काय भावना असतील हें मला कसें समजावें? हें काम तुलाच करतां येईल.

—हें मला कठिण दिसतें. तिनें कबूल केलें तर मला बरेंच वाटेल. पण आई

जरी विशेष जुन्या मताची नाही, तरी देखील पुनर्विवाहाला रुकार देईल असें वाटत नाही, आणि तिच्या मनाविरुद्ध अमल कधीच होय म्हणणार नाही.

—पण प्रयत्न तर करून पहा.

—पण तूं कमलशींच कां नाही लग्न करीत ? तिला जरा कपड्याविपड्याची हौस आहे, पण ती हाडाची वाईट नाही. रूप तर तुला पसंत आहेच, कारण अमलची जुळी बहिण ती. पहा विचार करून. ती नाही म्हणणार नाही हें मी सांगतों.

—हें पहा, अमलेवर माझें प्रेम आहे आणि शिवाय विधवेशीं लग्न करायचा माझा निश्चय आहे. अमलेचें जमलें म्हणजे सगळेंच ठीक होईल.

—नाहीतर मग आपण एकदां विधवा पहायला गांवभर हिंडूं या!

—फाजीलपणा बस कर. तुला करायचें आहे की नाही माझें काम ?

—बरें बुंवा, प्रयत्न करून पाहतों. पण मला आठ दिवसांची मुदत पाहिजे.

—बरें आठ दिवस तर आठ दिवस. करतां काय ? अडला नारायण...

—मला गाढव म्हणतोस का रे ? मग नाही मी विचारीत.

—अरे नाही, बाबा. तुझ्या दाढीला हात लावतों पाहिजे तर. पण कर एवढें काम.

आठ दिवसांनी पद्माकर आला. तेव्हा प्रभाकर म्हणाला, आईची कशी-बशी समजूत घातली मीं. पण आतां अमलच आढेवेढे घेते आहे. आतां तूं आपलें पाहून घे काय तें. ती आंत बसली आहे, मी तेथपर्यंत बाहेर बसतों.

अमला दिलरुबा वाजवीत बसली होती, पद्माकराला पाहून तिने तो बाजूला ठेवला.

—चालूं द्या. बंद कां करतां ? आम्हाला ऐकवा की थोडेंसें.

—म्हटलें नेहमी नेहमी ऐकून कंटाळा आला असेल कदाचित्.

—पण तुला अशी शंका यायला नको होती. प्रभाकराने तुला कांहींच सांगितलें नाहीं वाटतें, मी काय बोललों तें ?

—सांगितलें, पण...

—पण काय ? मी स्वतःच तुला विचारायला पाहिजे होतें असें का तुझें म्हणणें आहे ?

—थोडेंबहुत तसेंच, कारण...

—काय असेल तें स्पष्ट सांग. शंका नको.

—तुम्ही त्याच्याजवळ प्रेमाबद्दल कायसें बोललांत, पण मला ती सगळी थापच दिसते आहे.

—ती कशावरून ? आपण येथे दोघेंच असून मी मुका घ्यायचा देखील प्रयत्न केला नाही म्हणून ? ती चूक दुरुस्त करतों, त्याला काय उशीर ?

—हां हां ! प्रभाकर आहे बाहेर.

—झालें ? मग आतां माझी चूक नाही. आतां सांग तुझें काय म्हणणें आहे तें.

—प्रभाकर म्हणत होता की तुम्ही विधवेशींच लग्न करायची प्रतिज्ञा केली होती म्हणून. तेव्हा मला अशी जबरदस्त शंका येते की केवळ मी विधवा आहें म्हणूनच तुम्ही माझ्याशीं लग्न करायला तयार झालांत.

—असें कसें म्हणतेस बरें ? विधवा काय थोड्या का पडल्या आहेत ?

—पण माझी अनायासें ओळख झाली, म्हणून तुम्ही माझ्याशीं लग्न करायला निघालांत. दुसऱ्या कोणाशीं झाली असती तर तिच्याशीं केलें असतेंत.

—अमुक झालें असतें तर मीं तमुक केलें असतें, या वादाला कांही अंत आहे का ? तूं मला भेटलीच नसतीस तर मीं तुझ्याशीं लग्न केलें नसतें हें उघड आहे, पण...

—पहा, मला वाटलेंच तें ! मी पहिल्याने भेटलें म्हणून तुम्ही माझ्याशीं लग्न करणार. प्रेमबिम सगळ्या थापा. कांहीतरी करून प्रतिज्ञा पुरी करायची, दुसरें काय ?

—असें काय बरें अमल ? उगाच का वितंडवाद घालतेस ? मी काय केलें म्हणजे तुझी खात्री होईल की माझें तुझ्यावर प्रेम आहे ?

—प्रेमाची गोष्टच निराळी असते. प्रेम असलें म्हणजे मनुष्य दोषांकडे दुर्लक्ष करतें.

—मग मी कांही तुझें उणें काढलें आहे का ? तुझ्यांत दोष नाहीतच मुळीं. मग दुर्लक्ष कशाकडे करायचें ?

—तुम्ही आपली चेष्टाच करतां. तुम्ही मला असें सांगा, की मी विधवा नसतें तर तुम्ही माझ्याशी लग्न केलें असतें का ?

—हो, केलें असतें.

—आणि मग प्रतिज्ञा ?

—उडत गेली प्रतिज्ञा.

—पहा बरें ! तुम्ही खरें बोलतां आहां असें मी धरून चालतें. कारण एरवीं मला खरें कळायला मार्गच नाही.

—अगदी खुशाल धरून चाल, पण होय म्हण एकदांची.

—मग माझी ना नाही.

—पण होय म्हण की सरळ !

असें म्हणून तो तिला जवळ ओढणार इतक्यांत प्रभाकर दारांतून म्हणतो, काय, तुमचें ठरलें की नाही अजून ? अमल, तूं इतकी खट्याळ असशीलसें नव्हतें वाटलें मला !

पद्माकर म्हणाला, हां सांभाळून बोल. ती माझी बायको आहे आतां.

प्रभाकर म्हणाला, हो, हो, हो ! अजून व्हायची आहे. आणि भावाचा बोलायचा हक्क नेहमीच राहतो.

लग्न लागलें, कमल कोठेच दिसली नाही हें पाहून पद्माकर मनांत म्हणाला, काय मुलगी आहे ! वहिंणीच्या लग्नाला देखील हजर नाही. इतक्यांत पावलांचा आवाज झाला म्हणून वळून पाहतो तों कमल दारांत उभी.

--या कमलाताई, तुम्हाला अगदी शंभर वर्षें आयुष्य आहे.

--तें कसें काय ?

—आत्तांच मीं मनाशीं म्हटलें की आज तरी तुम्ही येतां की नाही ?

—म्हणजे ? मी तर पहिल्यापासून येथेच आहें.

पद्माकर मोठा बुचकळ्यांत पडला, जुळ्या मुलींचा आवाजहि सारखाच

असतो का ? कमलेशीं बोलायचा आजपर्यंत कधी फारसा प्रसंगच नव्हता. आतां ती बोलूं लागल्यावर एकदम त्याच्या तें लक्षांत आलें.

--म्हणजे ? होतां कोठें तुम्ही ?

-- अगदी तुमच्याजवळ. पण आज इतक्या सुंदर बायका जमल्यावर कोठे पाहूं अन् कोठे नाही असें झालें असेल तुम्हाला. मी दिसतें आहें कशाला ? माझ्या एकदां मनांत आलें होतें की आपणच अमलचे कपडे घालून तिच्या जागीं बसावें. पहावें तुम्हाला ओळखतें का.

कमला आपल्यावर फिदा आहे असें लोक म्हणत असत तें पद्माकरला आठवलें आणि काय बोलावें हें त्याला मुळीच् सुचेना. कमला त्याच्या आणखी जवळ सरकली आणि, आतां तरी माझ्याशीं बोलायला हरकत नाही ना, असें म्हणून त्याच्या गळ्यांत हात टाकीत होती, इतक्यांत प्रभाकर दारांतून म्हणतो, वा कमलाताई ! तुमचें आतां लग्न झालें आहे खरें, पण अगदी आमच्या देखत लगेच गळ्यांत हात नको टाकायला.

पद्माकर म्हणाला, आं ! म्हणतोस काय तूं ?

—वा राव ! मला वाटलें पहिल्या वर्गांत पास होणारांची स्मरणशक्ति बरी असते म्हणून. लग्न लागलेलें इतक्यांतच विसरलांत वाटतें ?

– म्हणजे तूं म्हणतोस काय ? तुला वेडबीड तर नाही लागलें ? अमल कोठे आहे ?

—अहो ही तुमच्या शेजारीं बसली आहे हीच अमल, आणि हीच कमल. हीच माझी एकुलती एक बहिण आणि तिचीच ही सगळी कारवाई. तिला लग्न करायचें होतें तुझ्याशीं, आणि तुला करायचें होतें विधवेशीं. तेव्हा तीच विधवा बनली न् काय ?

पद्माकर कमलेला नीट न्याहाळून म्हणतो, अरे चोरांनों ! तुम्ही दोघांनी मिळून मला फसवलेंत काय ?

कमल म्हणाली, अगदी मुळीच फसवलें नाही. तुम्ही मला काय सांगितलेंत ती आठवण करा.

—केव्हा काय सांगितलें ?

—वा ! तुम्ही जेव्हां म्हणालांत की तूं विधवा नसतीस तरीदेखील तुझ्याशीं लग्न केलें असतें, तेव्हा मी कबूल झालें. मग फसवलें कसें ?

—मी हरलों बुवा. कबूल करतों.

प्रभाकर म्हणतो, मग असें वांकडें तोंड कां ?

पद्माकर म्हणाला, तूं बाहेर जा रे. आम्हाला कांहीं खाजगी बोलायचें आहे.

प्रभाकर म्हणाला, जातों बुवा. तुमचा हक्कच आहे तो आतां.

तो गेल्यावर पद्माकर कमलला जवळ घेऊन म्हणाला, पण हें बघ, अमल...

—आतां कमल म्हणा की. अमल संपली.

—बरें हें पहा, माझ्याकरतां तूं एक गोष्ट कबूल केलीच पाहिजेस.

—ती काय ?

—हें बघ, तुझे ओठ अगदीं पुरेसे लाल आहेत. ते तूं रंगवतेस कशाला आणखी ?

—बरें उद्यांपासून नाही रंगवणार.

—उद्यांपासून नाही. आजपासून.

—बरें आजपासून. पण फसवल्याबद्दल रुसायचें नाही हां !

पद्माकराने आतां मात्र पूर्वीची चूक पुन्हा केली नाही, यामुळे तिचें तोंड एकदम बंद झालें.

( जानेवारी १९३५ )

---

# अग्निशलाकामंजूषा

—:०:—

परवां सहज मीं कांही कॉलेजमित्रांना चहाला बोलावलें होतें आणि कॉलेजच्या वेळच्या गप्पा चालल्या होत्या. चहा झाल्यावर गोविंदराव खिशांतून आगपेटी काढून सिगारेट पेटवूं लागला. त्याचा चिनी रेशमाचा सूट वगैरे एकंदर

थाट पाहून मी चेष्टेने म्हटलें, काय रे, तूं एवढी ऐट करून शेवटीं आगपेटीच बाळगतोस? अरे हल्ली विडी पेटवायचें यंत्र मिळतें ना?

--अरे आगपेटीची महति तुला काय माहीत आहे? ऊगाच नाही तिला पावगींनी " अग्निशलाकामंजूषा " असें सुंदर नांव दिलें.

—आगपेटीची महति ती काय असायची बुवा? ही तर सर्वांच्या ओळखीची दीडदमडीची चीज!

--अरे साध्या गोष्टींतच पुष्कळ वेळां गंमत असते. सगळ्याच वस्तूंचें मोल कांही पैशावर ठरवायचें नसतें.

गोविंदराव मोठा गोड़ा माणूस. त्याला कोणी कांही म्हणा, त्याच्या तोंडांतून कधी दुरुत्तर यायचें नाही. डाक्तरीच्या धंद्यांत त्याने अनेक लोकांवर उपकार केले होते आणि त्याची चांगली वाहवा झाली होती. अलीकडे त्याने एका नर्सला ठेवली आहे असा लोकापवादही ऐकूं येत असे. मीं ताडलें की याच्या मागें कांहीतरी गोष्ट आहे, आणि म्हटलें, मग सांग ना ती काय महति असते ती. गोष्ट लांब असली तरी हरकत नाही. रेडिओला अजून वेळ आहे.

—फार जुनी गोष्ट आहे, तरीपण सांग म्हणतोसच तर सांगतों. पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. मी नुकताच विलायतेहून डाक्तरी पास होऊन आलों होतों आणि धंदा सुरू करण्यापूर्वी निरनिराळ्या मित्रांना भेटी देत होतों. नागपूरला वसंतरावाने आग्रहाने बोलावलें होतें, तेव्हा त्याच्याकडे आठ दिवस जाऊन राहिलों. तो, त्याची बायको, एक लहान मूल आणि एक मोलकरीण एवढींच माणसें. त्यांनी माझा खूपच सत्कार केला आणि त्यांत मोलकरणीने विशेष दक्षता दाखवली. मीं म्हटलें, साहजिक आहे, जातांना कांहीतरी मिळेल अशी आशा नोकरांना असणारच. पण तेवढ्यावरच थांबलें नाहीं. तिच्या डोळ्यांत एक विशेष चमक होती आणि ती मला आकर्षण करण्याचा प्रयत्न करीत होती असा मला तर भास झाला.

—वा, राजे! खूप आहे! बळवंतराव म्हणाले, मोलकरणीवरच खूष का?

--हें पहा हा तुमचा गैरसमज आहे. कांही मोलकरणीही स्वच्छ असतात

आणि कांही वरच्या दर्जाच्या बायकाही घाणेरड्या असतात. असा माझा डाक्टरी अनुभव आहे. म्हणजे त्या दिसायलां स्वच्छ असतील, पण सगळें शरीर स्वच्छ असावें अशी कल्पनाच त्यांच्या डोक्यांत कधी येत नाही. आता मोलकरणी शिकलेल्या नसतात हें खरें, पण त्याच्याशी आपल्याला काय करायचें आहे ? लग्न थोडेंच करायचें आहे ?

—ठीक, ठीक ! बळवंतराव माना डोलवीत म्हणाले.

—आणि माझा एक नियम आहे, मी बायकांच्या मागें कधी लागत नाहीं. उगाच कोणीं नसत्या भानगडींत पडावें ? पण त्यावेळीं मी जरा देखणा होतों...,

—हो, हो, माहीत आहे, पुढें. मी म्हणालें.

—त्यामुळे पुष्कळ वेळां बायकाच माझ्या मागें लागत, आणि अशा वेळीं मात्र मी चेस्टरफील्ड्च्या उपदेशाप्रमाणे वागतों.

—हा काय उपदेश आहे, बावा ? मी म्हणालों.

—वा ! तुम्हाला माहीतच नाही का ? त्याने आपल्या मुलाला लिहिलेलीं पत्रें आहेत ना ? त्यांत त्याने त्याला उपदेश केला आहे की अशा प्रसंगीं स्त्रियांना कधीं निराश करूं नये.

—वाहवा ! खूप नीति आहे ! गोपाळराव म्हणाले.

—अरे वा ! हें पुस्तक वाचलें पाहिजे, बळवंतराव म्हणाले.

—मग ती मोलकरीण, भंगीण, कोणीही असली तरी चालेल का ? वामनराव म्हणाले.

—अर्थात् चेस्टरफील्ड होता लॉर्ड. त्याच्या डोक्यांत अशी कल्पनाही आली नसेल की आपल्या मुलावर मोलकरणीच्या बाबतींत असा प्रसंग येईल. पण वामनराव, तुम्ही जर असें समजत असाल की नाही की बडे लोक झाले म्हणून ते हलक्या माणसांशीं कधी संबंध ठेवीत नाहीत, तर ती तुमची चूक आहे. विशेषतः याच्या उलट प्रकार फार आढळतो, म्हणजे बड्या लोकांच्या बायकांना गोषांत रहावें लागल्यामुळे त्यांचा इतर लोकांशीं संबंधच येत नाही. तेव्हा त्यांना नोकरांवरच भागवावें लागतें.

—म्हणजे बड्या लोकांच्या बायका अशा असतात की काय ?

—असतात असें नव्हे हो! पण ज्या तशा असतील त्यांना तर एवढाच मार्ग आहे की नाही? मी या नुसत्याच गप्पा नाही मारीत. मला थोडीबहुत माहिती आहे म्हणून बोलतों आहे.

—असेल बुवा, तुम्ही आहांत डॉक्टर. बरें पण तुमची गोष्ट राहिलीच की!

—पुढें असें झालें, प्रथम मीं तिच्याकडे फारसें लक्षच दिलें नाहीं. खरें म्हटलें तर तिचें शरीर खरोखरच फार बांधेसूद आणि गोंडस होतें. कोणाचेंही सहज लक्ष गेलें असतें. पण मी थोडें ढोंगच केलें, ती काय करते हें पाहण्याकरतां. पुढें पाहतों तों तिनें शक्य तितक्या वेळां इतरांची नजर चुकवून मुद्दाम माझ्या जवळून जावें, चुकून लागलें अशा बहाण्याने मुद्दाम स्पर्श करावा, अशा रीतीने तिच्या मांसल भागांशीं माझा बराच परिचय झाला. मी या बाबतींत बिलकूल हालचाल करीत नव्हतों, तरीपण मी रागावलों नाहीं हेंही तिला दिसलें, आणि आमच्या बोलण्यावरून जेव्हा तिला समजलें की मी दुसऱ्याच दिवशीं जाणार, तेव्हा ती एकदा माझ्या मांडीवरच येऊन बसली. तेव्हा मात्र मी म्हणालों, हां, हें काय? कोणी पाहिलें तर? इतक्यांत कोणाचें तरी पाऊल वाजल्यामुळे ती निघून गेली. त्या दिवशीं संध्याकाळीं पावसाची भुरभूर सुरू झाली होती, तरी वसंतराव आणि त्याची बायको फिरायला निघालीं. मला आधीच फिरायला आवडत नाही, आणि त्यांतही पाऊस. तेव्हा मी म्हटलें पावसांत मी नाही येत बुवा. मी आपला येथेंच वाचीत बसतों. त्यांनी थोडासा आग्रह करुन पाहिला, पण मी गेलों नाहीं. घरांत मी, वसंतरावाची लहान मुलगी आणि काशी मोलकरीण, एवढींच राहिलों. ती अशा कांहींतरी संधीची वाटच पहात होती असें दिसलें. तीं बाहेर गेल्यापासून पांचदहा मिनिटांत तिने शेजारच्या एका मुलाला बोलावून, त्याला त्या लहान मुलीला अंगणांत खेळवायला सांगून, आपण तात्पुरती मोकळी होऊन माझ्या गळ्यांत पडली. आतां त्यांतून सुटकाच नव्हती.

—हो. आपलें तत्व आपण सांगितलेंच आहे, तेव्हा मधें चारपांच फुल्या घाला आणि पुढे सांगा, बळवंतराव म्हणाले.

—सगळें आटपल्यावर मला भीति वाटायला लागली, कारण मीं गुप्त रोगांचा

तज्ञ होऊन आलों होतों आणि आमच्या प्रोफेसराने प्रतिबंधाचें मुख्य तत्व सांगितलें होतें तें हें की प्रत्येक स्त्रीपासून संसर्ग शक्य आहे असें धरून चालावें, मग ती कोणीही असो. प्रतिबंधाची सामग्री माझ्याजवळ नेहमी असतेच, आणि तेव्हाही होती. पण हें तिला कळूं देणें मला बरें वाटलें नाही, आणि तेथें बंद करण्यासारखी खोली म्हणजे वसंतरावाची निजायची खोली तेवढीच. तेथे जाऊन मीं कडी लावून घेतली तर तें फारच चमत्कारिक दिसेल, तेव्हा काय करावें अशा विचारांत मी होतों. इतक्यांत रस्त्यावरून ओळखीची हांक ऐकूं आली. खालीं वांकून पाहतों तों हरिभाऊ आपल्या कारमधें दाराशीं ! मला पाहतांच तो म्हणतो, 'अरे घरांत बसून काय करतोस ? जरा हिंडायला चल की. तूं पायांनी जाणार नाहीस मला माहीत, म्हणून कार घेऊन आलों.'

ही मोठी पंचाईत झाली. त्याला नाही म्हणणें शक्य नाही, आणि रोगप्रतिबंधाची व्यवस्था तर तावडतोब केली पाहिजे, तेव्हा मीं त्याला म्हटलें, हें पहा, जरा वर येऊन बेस. मला शौचाला जायचें आहे, मग आपण जाऊं.

तो वर आला आणि मला तगादा करूं लागला. मी आपली कपड्यांची पेटी उघडायला लागलेला पाहून तो म्हणतो, शौचाला जायला पेटी कशाला उघडायला लागते ? लवकर आटप की.

—अरे आगपेटी शोधतों आहे, सिगारेटशिवाय शौचाला कसें होणार ?

त्यानें आपल्या खिशांतली आगपेटी माझ्या पुढें फेकली. 'ही घे आगपेटी, आटप लवकर.'

मीं म्हटलें, छे, छे, माझीच पाहिजे. ही सांपडलीच.-तो आपला माझा हा कांहीतरी वाहियातपणा समजला असेल, पण माझी प्रतिबंधाची सामग्री होती माझ्या आगपेटींत. तेव्हा त्याची आगपेटी घेऊन मी काय करूं ? मग स्वस्थपणें सगळें आटपून त्याच्याबरोबर फिरायला गेलों.

दुसऱ्या दिवशीं माझी जायची तयारी चालली होती तेथे येऊन काशी म्हणते, पांच रुपये उसने देतां का मला ? लय गरज आहे.—मला थोडा धक्काच बसला. कारण मी समजत होतों की मी देखणा असल्यामुळे ती माझ्यावर फिदा झाली. मीं मुकाट्याने पांच रुपये काढून दिले. अर्थात् ते ती परत देणार नाही हे

मला माहीतच होतें, आणि मी मागणार होतों थोडाच ? मनुष्याची घमेंड कधी कधी अशी जिरते.

—तसें नाही मला वाटत, वामनराव म्हणाले, ती जरी तुझ्यावर फिदा झाली असली, तरीदेखील तिने त्यांतून पैसे कां काढूं नये ?

—तेंही खरेंच. पण मी तुम्हाला आणखी एक गंमत सांगूं का ? नीळकंठराव आतांपर्यंत स्वस्थ बसले होते ते म्हणाले.

—काय बुवा ? कसली गंमत ? आम्ही सगळे म्हणालों.

—हल्लीं डाक्तरांजवळ एक नर्स आहे ना ? तीच ती काशी. नीळकंठराव म्हणाले,

गोविंदराव थक्क झाला. तो म्हणाला, तुला रे कसें कळलें ?

—कसें कळलें ! मी डिटेक्टिव् आहे हें विसरूं नको. नंतर तो आमच्याकडे वळून म्हणाला, मी याची गोष्ट पुरी करतों. काशी एकदां सांपडली अडचणींत, आणि तिने येऊन डाक्तराचे पाय धरले. त्याने तिला अडचणींतून सोडवली आणि पुढे तिला नर्स करून आपल्याजवळच ठेवली.

—पण कसली अडचण होती तिला ?

—अडचण म्हणजे अशी, की तिची मासिक अडचण बंद झाली होती.

—गर्भपात ? आणि तो गुन्हा नाही होत ?

—होतो. पण तो पोलिसापर्यंत पोंचला तर. एरवी नाही.

—असें काय ? तरमग ही नर्स एकदा पाहिली पाहिजे कशी आहे ती. बळवंतराव म्हणाले.

—कांही कारण नाही. आपली नाही तेथे डाळ शिजायची ! नीळकंठरावांनीं सांगितलें.

जून १९३७

# सहकार्य

——*:+:*——

**हिरा०**—या, डाक्तरीणबाई! पण आज तूं आत्ता कशी आलीस ?

**तारा०**—आज कशाकडे मनच लागत नाही. मी तुझ्याजवळ गप्पा मारायला आलें आहे. दवाखान्यांत जरा उशिरां जाईन.

—खरें, मी पाहिलेंच नाहीं तुझ्याकडे हां! तूं कशी काय दिसतेस आज? काल जुहूला तर अगदीं नाचत बागडत होतीस आणि तुझ्यामुळे तर आम्ही जुहूला गेलों. एरवीं आमच्या मनांत सुद्धां नव्हतें.

—तें सगळें खरें, पण......

—मग सांग की काय आहे तें! माझ्याजवळ सांगायला एवढें जड वाटतें तुला ?

—तसें नव्हे, सांगायलाच तर मी आलें. पण सुरवात कशी करावी समजत नाहीं.

—अस्सें! तुला लग्न का करायचें आहे ?

—हं ऽऽ. मला आतां वाटायला लागलें आहे करावें म्हणून.

—अग वेडे! त्यांत एवढें जड काय वाटतें आहे तुला ? मी तर तुला कधीपासून सांगतें आहे कर म्हणून.

—तूं ढीग सांगशील, पण नवरे काय वाटेवर पडले आहेत ?

—वाटेवरच नाहीतर काय ? तूं एवढे पैसे मिळवते आहेस, हवा तो माणूस एका पायावर तयार होईल तुझ्याशीं लग्न करायला.

—पण पैशाकरतां लग्न करणारा नवरा नको आहे मला!

—मग तुझें म्हणणें काय ? आमच्या ओळखीचा एखादा मनुष्य तुझ्या मनांत भरला असला तर मला सांग. मी पाहीन काय करतां येईल तें.

—म्हणून तर मी आलें आहे तुझ्याकडे.

—मग सांग ना कोण तो! त्याला एवढे आढेवेढे कशाला ?

—पण मला भीति वाटते ना ? तुझाच नवरा मला पाहिजे आहे असें सांगि-

तलें तर तूं काय म्हणशील ?

--आं ? तुला वेडबीड तर नाही लागलें ? मी आपली झरणी सुद्धां कोणाला उसनी देत नाही, आणि तूं तर नवराच मागूं लागलीस !

—अग तूं माझ्या जिवाभावाची मैत्रीण, तुझ्याजवळ नाही मागायचें तर कोणाजवळ मागूं ?

--अग म्हणूनच मी तुझ्याशीं सरळ बोलतें आहें. दुसरी कोणी असती तर घालवूनच दिली असती ! तूं म्हटलेंस तर नेसतें पातळ सुद्धां तुला सोडून देईन. पण काय मागायचें याला कांही सुमार !

--अग पण मागचें तुला आठवत नाही का ? तूं कांहीही नवीन वस्तु घेतलीस, की मला अगदी तशी पाहिजे असे. शेवटीं मीं आपलें तुला सांगूनच ठेवलें होतें कीं कांही घेतलेंस तरी जोडी घेत जा, एक तुला आणि एक मला. पण तूं नवरा केलास त्याची जोडी मिळत नाही. त्याला जुळा भाऊ असता तर मला चालला असता. पण जुळा भाऊ तर राहो, त्याला कसलाच भाऊ नाही ! मग सांग बरें मी काय करावें ? तशी दुसरी वस्तु मिळत नाही, तेव्हा तुझ्यांतली अर्धा मला दे म्हटलें तर कोठें बिघडलें ?

—हें पहा, नवरे असे फुकटचे मिळत नसतात. त्याला थोडी खटपट लागते. बाजारांतली वस्तु पैसे टाकले की मिळते; नवरा तसा मिळात नाही, त्याला युक्ति लागते. कॉलेजांत तूं अभ्यासांत पुढे होतीस, म्हणून नवरा हुडकण्यांत मागें पडलीस. माझ्याच भावी नवऱ्याबरोबर तूं हंसलीस खिदळलीस. पण मी त्याला घरीं बोलावून चमचमीत पदार्थ खायला घातले ! ते केले होते आईने, पण मीं केले अशी मीं एक थाप दिली, आणि मग आईजवळ शिकलें. लग्न करतांना समंजस पुरुष काय पाहतात असें वाटतें तुला ? नुसतें रूप ? नाहीं, स्वयंपाक आणि घरांत टापटीप ठेवतां येत नसली तर ते अप्सरेशीं सुद्धां लग्न करायचे नाहीत. पण या गोष्टी करायला तुला कोठे वेळ होता ?

—अग तें मला कळत का नाही ? पण 'तूं कसली डाक्तरीण होते आहेस !' असें म्हणून मला बाबांच्या एका मित्राने चिडवलें. तेव्हा मी अगदी इरेस पडून अभ्यास केला, बक्षिसें मिळवलीं; आणि बाईसाहेब, आपण इकडे लग्न करून

बसलांत ! तूं अगदी स्वार्थी आहेस.

—ती कशी काय ? तूं अभ्यास करून डाक्तरीण झालीस, खोऱ्याने पैसे ओढतेस. मी आपली लग्न करून संसार करतें आहें. यांत स्वार्थ कसा काय झाला माझा ?

—बरें बाई, माझी चूक झाली. पण माझ्याबद्दल तुला आपलेपणा वाटतो म्हणतेस, तो असाच का ? मैत्रिणीच्या हातून चूक झाली तर तिला मदत नको का करायला ? त्यांतून तुझें आणि तुझ्या नवऱ्याचें अगदी कादंबरींतलें प्रेम असतें की नाही, तर मीं तुझ्याजवळ गोष्टच काढली नसती. पण तसें आहे का, तूंच सांग बरें ! तूं जेव्हा लग्नाचा विचार केलास, तेव्हा एवढा एकच पुरुष तुझ्या मनांत नव्हता कांही, खरें की नाही ?

—तसें करून चालायचेंच नाही मुळी. 'ज्यांचें तसें प्रेम बसेल, त्यांना त्यांतून सुटकाच नसते. पण इतरांना एक सावज सुटलें तर दुसरें लक्षांत ठेवावेंच लागतें. राम एवढा एकवाणी होता म्हणतात, पण ती देखील थापच आहे. एका बाणाने काम झालें नाही म्हणजे तो देखील कांहींतरी सबब काढून आणखी मारीतच असे. मग म्हणायचें की एकाच ठिकाणीं तर दोन नाही मारले ! आणि एकाच ठिकाणीं दोन लागताहेतच कशाला ! मग म्हणायचें एक डोक्याला मारला, एक पायाला मारला, असें चालायचेंच.

—आणि 'एकपत्नी' म्हणजे तरी काय ? थापच. कदाचित् त्याचा अर्थ असा असेल की लग्नाची एक,. बाकी इतर हव्या तितक्या. नाहीतर हे राजे लोक काय तसे रहायचे आहेत ? बाकी सगळेच पुरुष तसे असतात म्हणा. सांगायला लग्नाची बायको एक, आणि कोणीं लग्नाच्या दोन केल्या तर त्याला नांवें ठेवायचीं. पण इतर कितीही असल्या तरी चालतात !

—आणि 'एकवचनी' म्हणजे काय तें माहीत आहे का तुला ? एकवचनी म्हणजे वचन एकच द्यायचें. दशरथाने जसें कैकेयीला दोन वर दिले होते, तसें नाही करायचें. पण वचन पाळायचें नांव नको. कारण तो तसा एकवचनी असता तर त्यानें सीतेला टाकली असती का ?

—छे, छे, त्या वेळचे सगळेच लोक एकवचनी होते ! म्हणजे ' रामरावांनीं

रावणपंतांना मारलें ' असें कांही आपण म्हणत नाही. 'रामाने रावणाला मारलें' असेंच म्हणतों. रावण सुद्धां एकवचनीच ! पण हें रामायण राहूं दे, माझ्या रामायणांचें काय करायचें तें सांग.

—तूं आपलें कांहीतरीच बोलतेस. मला हें कांही शक्य दिसत नाहीं. नवरा ही काय देण्याची वस्तु आहे ? समज मी कबूल केलें, तरी तो करील कशावरून ?

तें माझ्याकडे लागलें. तुझी कबुली आहे ना ?

—छे,छे, मी तसें कांही सांगत नाहीं. मला याचा चांगलाच विचार केला पाहिजे.

—तूं विचार कर बापडी, पण असें मात्र समजूं नकोस की यांत सर्वस्वी माझाच फायदा होणार आहे. मी तुझ्याजवळ मदत मागतें, तशी मी तुला मदत करायलाही तयार आहें. माझ्यामुळे प्रभाकरच्या मोठमोठ्या ओळखी होतील आणि त्याची वकिली माझ्या मदतीने खात्रीने जास्त चांगली चालेल. माझ्या नादीं लागून तो पैसे उधळील हीही भीति नको. माझ्याजवळ त्याच्यापेक्षां जास्त पैसे आहेत. माझी स्वतंत्र जागा आहे, आणि मी बसलेलें बस्तान बिघडवून तुझ्या घरीं रहायला कांही यायची नाही. मला मुलें नको आहेत, आणि तशी व्यवस्था मला करतां येते. तूं आपली नवरा आणि मुलें घेऊन खुशाल संसार कर. माझा त्यांत त्रास तर नाहीच, पण जरूर तर मदत होईल. लग्न केल्याचा मला एवढाच फायदा होईल कीं हल्लीं लोक टेलिफोनवर वाहियात बोलून त्रास देतात तो देणार नाहीत. नाहीतर शारीरिक गरजा भागवायला मला कांही लग्नच करायची जरूर नाही. बरें मी आतां जास्त बोलत नाहीं. मी उद्यां माथेरानला जाणार आहें. दोन दिवसांनी परत आलें म्हणजे येईन.

—माथेरानला काय, हवा खायला ? जा म्हणजे जरा बरें वाटेल.

—छे ग ! हवा कसली खातेस ? XXXच्या राणीसाहेबांनी बोलावलें आहे.

—मग काय, चैन आहे ! हवा आणि शिवाय पैसे मिळतील.

—मला सध्यां कशाची चैन वाटत नाही. बरें, येतें मी.

प्रभाकर शेजारच्या खोलींतून डोळे चोळीत बाहेर येऊन म्हणतो, कां ताराबाई, चाललांत वाटतें ? बसा की जरा. आल्याबरोबर काय जातां ?

—आल्याबरोबर ? वा ! मला एक तास तरी झाला येऊन. आपण येथेच

होतांत वाटतें ?

—हं...पहुडलों होतों. जरा डोळा लागला.

—बरें, मी येतें. मला आतां उशीर झाला.

—या.

० ० ० ० ०

दुसऱ्याच दिवशीं प्रभाकरच्या एका मित्राची तार आल्यावरून त्यालाही माथेरानला जावें लागलें, आणि तो आणि तारा बरोबरच परत आलीं. तिची मोटर भायखळ्याच्या ठाणावर आलीच होती. तिने प्रथम आपल्या घरीं सामान टाकलें आणि नंतर त्याला घरीं नेऊन पोंचवला. त्या दोघांना तिच्या गाडींतून उतरतांना पाहून हिरा म्हणते, अस्सें ? म्हणजे तुम्ही दोघें माथेरानला पळून गेलां होतां काय ?

**तारा**—आंत चल, सांगतें तुला. ( तिच्या खोलींत गेल्यावर दार बंद करून ) हें पहा, तुला फसवायचें मला कांहीच कारण नाहीं. अग तुला फसवणें कठिण का आहे ? माझी स्वतंत्र जागा आहे, तेथे भेटायला आम्हाला कोण बंदी करतो ? पण मी सरळ आहें, मला कोणाला फसवायला आवडत नाही. तुला वाटेल आम्ही दोघांनी कट करून तुला फसवलें, पण तें खोटें. मी तुला सांगितलें त्याप्रमाणे मला राणीसाहेबांनी खरेंच बोलावलें होतें. प्रभाकराने मात्र आपलें बोलणें, निदान अर्धवट तरी, त्या दिवशीं ऐकलें होतें आणि आपल्या एका मित्राकडून तार मागवून तोही माथेरानला आला. आम्ही तेथें भेटलों आणि बोललों हें खरें, आाण पुढची मजल गांठण्याचा त्या राजश्रींनी प्रयत्न केला हेंही खरें. पण मला हें समजतें की एकदां तसें होऊं दिलें कीं मग लग्नाची वांतच नको ! त्याच्याबद्दल त्यालाही दोष देण्यांत अर्थ नाहीं. पुरुषांचा मनावर तेवढा ताबा नसतो, आणि त्यांना कांहीं भीतिही नसते. मग आतां तूं काय विचार ठरवलास सांग. आणि सांगण्यापूर्वी हा विचार कर, की माझ्या मनाची हल्ली जी अगदीं वाईट स्थिति झाली आहे, ती केवळ शारीरिक गरजेमुळे नव्हे, तर लोक त्रास देतात म्हणून. लग्न केलें म्हणजे हा त्रास चुकला. मग तुझें तसेंच म्हणणें असलें तर मी तुझ्याकडे फ़िरकणार सुद्धां नाहीं.

'—तें आलें माझ्या ध्यानांत. म्हणजे दोघे मिळून कोठेतरी पसार व्हाल असेंच की नाही?

—तुझें आपलें आहेच का हें अजून, कुत्र्याचें शेंपूट?

—नाही ग, मी सहज चेष्टेने म्हटलें. माझा तुझ्यावर पुरा विश्वास आहे. तूं आपली प्रभाकरशीं लग्नच कर आणि येथेच येत जा, नाही तर त्याला आपल्याकडे बोलाव. अग तूं निदान डाक्तरीण तरी आहेस, भलतेसलते रोग तरी मला लागायची भीति नाही!

—म्हणजे, म्हणून का तूं मला परवानगी देणार? हें पहा, तुझें जर थोडेंतरी नुकसान माझ्यामुळे होत असलें, तर तें मला नको आहे. मला तसें स्पष्ट सांग. नाही तर असें तरी सांग की माझ्यावरच्या प्रेमामुळे तूं माझें म्हणणें कबूल केलेंस म्हणून. मला कोणाचें नुकसान करायला नको आहे.

—तूं अगदी होतीस तश्शी आहेस! जरा कांही झालें की रागावली! बरें मी आतां सांगतें, की माझें कांही नुकसान नाही, आणि तूं मला आतां अधिकच आवडतेस.

—मग अशी इकडे ये. अगदी घट्ट मिठी मारावीशी वाटते आहे मला. आणि तुला लांच द्यायची कांही माझी इच्छा नव्हती, म्हणून मी अगोदर बोललें नाही, पण उद्यां तुझ्या दाराशीं एक लहानशी कोरी मोटार येऊन उभी राहील, ती मी तुला बक्षिस देणार आहें. अगदी प्रभाकरचा सुद्धां हक्क नाही तिच्यावर!

—म्हणजे मला वेगळी काढायचा विचार दिसतो आहे तुझा!

—काय आहेस तूं! नवरा तुला कसा संभाळतो कोण जाणे. अग मला तुझा नवराच हवासा वाटतो असें नाही, तूं सुद्धां मला हवीशीच वाटतेस. तुला वाटले तेव्हा आपण सगळींच बरोबर जाऊं, म्हणजे झालें की नाही? माझी मोठी गाडी आहेच, पण तुला एकटीला किंवा तुम्हाला दोघांनाच जायचें असेल तेव्हां नवी गाडी.

— बरें मग, आतां काय म्हणूं?

—कांही म्हणूं नको, पण माझ्याशी गट्टी कर.

—ही केली.

—(दार उघडून, दोघी मिळून ) अहो प्रभाकरपंत, तुम्हाला आतां दोन बायका झाल्या !

**प्र०**—म्हणजे माझा त्यांत कांहीच संबंध नाही का ? आणि निदान मी एकटाच आहें, तेव्हा माझें अनेकवचन करायचें कारण नाही.

**हिरा०**—पण तुला आतां दुसरें वचन द्यावें लागेल ना ! तेव्हा तूं एकवचनी राहिलाच नाहीस. पण त्याचें असें करतां येईल की तूं मला नेहमी सांगतोसच मी तुझा आहे म्हणून, तेव्हां माझ्या हक्काचा अर्धा भाग मी हिला राजीखुशीनें आणि अक्कलहुशारीने बक्षिस देतें. म्हणजे तुझा त्यांत कांही संबंध राहणार नाही !

**प्र०**—बरें, बोवा 'आलिया भोगासी असावें सादर.'

**तारा०**—अगबाई ! उशीर झाला ना दवाखान्यांत जायला !

असें म्हणून ती आपली हस्तिका उचलून पळतच बाहेर पडली.

( एप्रिल १९३८ )

---

# प्रेम

भाऊसाहेब बाहेरून आले आणि शारदेच्या खोलींत डोकावून पाहतात तों ती अभ्यासाच्या टेबलाशीं एका पुस्तकावर डोकें ठेवून बसलेली दिसली. तेव्हा तिला झोप लागली असावी असें वाटून तिला हलवून जागी करून, 'वा ! चांगला चालला आहे अभ्यास !' असें म्हणण्याकरतां ते पुढे होणार, इतक्यांत हुंदक्याचा आवाज येऊन तिचें सर्व शरीर हललेलें दिसलें. त्यांना फारच आश्चर्य वाटलें.

शारदेचा बाप गोपाळराव हा त्यांचा जिवलग मित्र. तिची आई यमुनाबाई हीही केवळ मित्राची बायको नव्हती. तिच्यावरील गाढ प्रेम व्यक्त करण्याची त्यांना संधि मिळण्यापूर्वींच तिचें लग्न आपल्या मित्राशीं ठरलेलें पाहून

त्यांना आपलें प्रेम दाबून टाकावें लागलें होतें. यमुनाबाईंना तें कळलें नव्हतें असें मात्र नव्हे, कारण बायकांना या गोष्टी तावडतोब कळतात, पण त्याचा उच्चार मात्र कधी झालेला नव्हता. भाऊसाहेबांच्या आत्मसंयमनाची खडतर परीक्षा झाली होती. गोपाळरावांची नोकरी फिरतीची असल्यामुळे त्यांना केव्हाही बाहेरगांवीं जावें लागलें तरी यमुनाबाईंना सोबत करण्याकरतां त्यांनाच त्यांच्या घरीं जाऊन निजावें लागे. "मित्रावर इतका विश्वास बरा नाही, मन हें ओढाळ गुरूं, परधनपरकामिनीकडे धांवे," वगैरे बोलणींही कुटाळ लोकांकडून ऐकूं येऊं लागली होतीं; इतकेंच काय, तर शारदा ही भाऊसाहेबांचीच मुलगी असेंही म्हणण्यापर्यंत कांहींची मजल गेली होती. दैवयोगाने हीं दोन्ही पतिपत्नी जवळजवळ एकदमच वारलीं आणि त्यांना दुसरें कोणीच नसल्यामुळे शारदेला आपल्या घरीं नेऊन मुलीसारखी वाढवण्याशिवाय भाऊसाहेबांना गत्यंतर नव्हतें. यावेळीं तिचें वय चार वर्षांचें होतें आणि तिला त्यांचा अगोदरच लळा असल्यामुळे आईबाप मेल्याचें दुःख तिला विशेष भासलें नाही. आज ती अठरा वर्षांची झाली होती तरी अजूनही ती लडिवाळपणाने भाऊसाहेबांच्या मांडीवर खुशाल येऊन बसत असे. त्यांची मात्र ही कसोटी होती, कारण शारदा मोठी झाली तसतशी ती हुबेहुब आपल्या आईसारखी दिसूं लागली होती. भाऊसाहेबांना आपल्या जुन्या प्रेमाचें स्मरण होई. खरोखरच आपलें प्रेम जुनें झालें का? की शारदेवरच आपलें प्रेम आहे? पण असा विचार तरी कसा मनांत आणावा? शारदा १८ वर्षांची आणि ते पन्नाशीच्या जवळजवळ गेलेले! असे विवाहही होत नाहीत असें नाही, पण आपण शारदेला असें कांही म्हटलें तर तिला काय वाटेल? ती आपल्याला बापाच्या जागीं समजते हें त्यांना माहीत होतें, मग असें कसें म्हणावें? पण ती मांडीवर बसली तर त्यांना धड तिच्याशीं बोलवतही नसे, कारण तिला गाढ आलिंगन देतां नये, इकडेच त्यांना सर्व लक्ष एकवटावें लागे.

तिला त्यांनी शक्य तितकें स्वातंत्र्य दिलें होतें आणि सर्व कांहीं तिच्याच कलाने चालत असे. मग ही रडते कां? हा प्रश्न त्यांना सुटेना. त्यांनी हळूच पुढे होऊन तिच्या पाठीवर हात फिरवला आणि तिची हनुवटी वर करून विचारलें, काय झालें बाळ? तूं घाबरूं नको, कांही झालें तरी मी आहे ना? अर्थात्

मनुष्याच्या शक्तीबाहेरची गोष्ट मी करूं शकणार नाही, पण हें लक्षांत ठेव की मी वकील आहें, आणि माझ्या मताने मला थोडीशी अक्कल आहे.

हें काय हो, भाऊसाहेब ? म्हणून ती त्यांच्या छातीशीं आपलें तोंड लपवून अधिकच रडूं लागली. आतां काय करावें ? त्यांना कांहीच सुचेना. कांही वेळ तिला रडूं देऊन नंतर ते म्हणाले, तुझा विश्वास नाही का माझ्यावर ? तूं सांगितलें नाहीस तर मला कळेल तरी कसें ?

ती तोंड वर न करतांच म्हणाली, मला सांगायला लाज वाटते. तुम्ही जा म्हणजे मी लिहून ठेवीन.

तिने पत्र लिहून ठेवलें त्याचा सारांश असाः--

कालेजांत प्रभाकर भोंसले नांवाच्या विद्यार्थ्याशीं माझी ओळख झाली. हळूहळू आमचें एकमेकांवर प्रेम बसलें आणि आम्ही लग्न करायचें ठरवलें. इतर विद्यार्थ्यांना चुकवून आम्ही लांबलांब फिरायला जात होतों आणि लग्नच करायचें ठरवल्यामुळें आम्हाला फारसा पोंच राहिला नाही, आणि प्रेमामुळें भान राहिलें नाही. याबद्दल मी त्याला दोष देत नाही आणि तुम्हीही देऊं नये. मुलींना निर्बंधांची अधिक संवय असते आणि निष्काळजीपणा केल्याने आमचेंच जास्त नुकसान होतें. असें असून देखील माझ्या हातून जें आत्मसंयमन झालें नाही, तें त्याच्याही हातून झालें नाही याबद्दल त्याला नांवें ठेवण्यांत काय अर्थ आहे ? मला माहीत आहे की तुमचें माझ्यावर जिवापाड प्रेम असल्यामुळें तुम्ही त्यालाच नांवें ठेवून मला दोषमुक्त कराल. पण माझें प्रेम त्याच्यावर आहे, तेव्हा मी त्याला कशी दोष देईन ? आणि तुम्हींही देऊं नका. नाहीना देणार ? नकाच देऊं. मी तुम्हाला आधीच सगळें सांगितलें असतें, पण तो पडला मराठा. तेव्हा तुम्ही काय म्हणाल ? म्हणून सांगितलें नाही. पण आतां मात्र कठिण प्रसंग आहे. मी गरोदर आहें असें कळल्याबरोबर तो म्हणाला ठीक आहे, आपण लग्न करून टाकूं. पण त्याने बापाजवळ गोष्ट काढतांच बाप शिव्या द्यायला लागला. मोठा निघाला बामणाच्या मुलीशी लग्न करायला ! आपल्या जातींतल्या मुली मेल्या का सगळ्या ? बऱ्या बोलाने तो नाद सोडून दे, नाहीतर मी तुझा तरी जीव घेईन, नाहीतर मी आपला तरी देईन. तेव्हा प्रभाकर घाब-

रला, तरी तो आपला म्हणत होता, की आपण चोरून लग्न करूं म्हणून. पण मींच नको म्हटलें. एखाद्या वेळीं म्हताऱ्याने जीव दिला तर ? तेव्हां आतां काय करावें ?

भाऊसाहेबांनी या पत्रावर एक रात्र विचार करून सकाळीं तिला जवळ बोलावली आणि सांगितलें, मी वाचलें तुझें पत्र. तूं कांही म्हण, पण मला कांही तुझ्या प्रभाकराची एकंदर रीत पसंत नाही.

--पण तो तर लग्न करायला तयार आहे. मलाच भीति वाटते.

--पण अगोदर असा प्रसंगच कां येऊं द्यावा ?

--हें बोलण्यांत कांही अर्थ नाहीं. ती माझी चूक आहे, त्याची नाही.

--बरें, तसें कां होईना ? मी याचा पुष्कळ विचार केला, पण मला एकच उपाय सुचतो. तूं माझ्याशींच लग्न कर म्हणजे लोकापवाद टळेल.

हें ऐकून ती तीन फूट दूर सरकली. काय म्हणतां हें ? आजपर्यंत मी तुम्हाला आईबापांच्या जागीं मानलें, आणि आतां......

भाऊसाहेब निर्विकार चेहरा ठेवून म्हणाले, माझा कांही तसा आग्रह नाही. तूं विचार कर. तुला एखादा याहून चांगला उपाय सांपडला तर तो करूं, माझी हरकत नाहीं. तुझ्या हितापलीकडे मला कांही पहायचें नाही.

फार दिवस विचार करायला फुरसत नव्हती. लोकापवाद टाळायचा तर तोड लवकर निघाली पाहिजे. बराच विचार करूनही तिला कांहीच सुचेना. तेव्हा तिनें शेवटी भाऊसाहेबांची सूचना नाइलाजाने कबूल केली आणि गोत्र एक निघाल्यामुळें लग्न रजिस्टर करावें लागलें.

त्या रात्रीं ती भीतभीतच भाऊसाहेबांच्या खोलींत गेली. ते म्हणाले, तूं घाबरली आहेस कां, मला सांग पाहूं. तुला भीति राहूं नये, एवढ्याकरतांच मीं ही कल्पना सुचवली. मग आतां कां भितेस ? तुझ्या खोलींत तुझें अंथरूण घातलेलें आहे. जा, जाऊन स्वस्थ नीज, म्हणजे सकाळीं बरें वाटेल.

या संकटांतून अकस्मात् सुटका झाल्यामुळें तिला इतका उमाळा आला की तिनें भाऊसाहेबांचे पाय धरले. तिच्या तोंडांतून एक शब्द निघेना. भाऊसाहेबांनी बिलकूल हालचाल न करण्याचें ठरवलें होतें, तरी शेवटीं तिच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले, जा, बाळ, असें नको करूं. नीज जा जाऊन.

लोकांत बराच गवगवा झाला. ती भाऊसाहेबांचीच मुलगी असल्याबद्दलची पूर्वीची अफवा कांहींनी पुनः उकरून काढली. पण उघडपणें कोणालाच कांही बोलतां किंवा करतां येईना. नंतर सात महिन्यांनी ती बाळंत झाली, तेव्हा पुनः एकदा लोकांना बोलायला सांपडलें. 'कशीं माणसें असतात पहा ! हा मनुष्य इतका विलंदर असेल असें नव्हतें वाटलें. अंगास आलें तेव्हां मग लग्न करावेंच लागलें !'

मूल फार दिवस जगलें नाही, आणि शारदेची प्रकृतिही दिवसेंदिवस खालावत चालली. ती एकटीच बसून मनांत कुढत असे. बोलणार तरी काय आणि कोणाशीं ? अशा स्थितींत प्रभाकर भोसले एकदां अकस्मात् येऊन तिच्या पुढें उभा राहिला. ती अतिशय घाबरली. भाऊसाहेबांचें औदार्य तिला माहीत होतें, तरीपण याची वागणूक मला पसंत नाही असेंही त्यांनी म्हटलें होतें. आणि आतां लग्न केल्यावर त्याने तिला भेटावें हें त्यांना खपेल का ? ती घाबरट आवाजाने त्यालं म्हणाली, तूं कशाला वरें आलास येथे ? कोणी पाहिलें तर काय म्हणेल ?

—कोण काय म्हणणार आणि म्हणण्याचा हक्क कोणाला आहे ? मला भाऊसाहेबांनीं बोलावलें म्हणून मी आलों. हें पहा त्यांचें पत्र. तुला काय वाटलें मी तुझ्याकरतां आलों ? असें म्हणून त्याने भाऊसाहेबांचें पत्र दाखवलें. शारदेची प्रकृति ठीक नाहीं, ती एकसारखी कुढत असते, तुम्ही मधूनमधून आलांत तर तिला वरें वाटेल, इतकेंच त्या पत्रांत लिहिलें होतें. दोघांच्याही डोळ्यांत अश्रु उभे राहिले. अशींही माणसें जगांत असतात तर ?

कुटाळ लोकांच्या जिभा चालूच असतात. करावें तसें भरावें. आपण दुसऱ्याकडे चैन केली. आतां घ्या त्यांचें फळ !

शारदेचें लग्न झाल्यावरही प्रभाकरांने तिचा नाद सोडला नाहीं, आणि तो अजूनही तिला भेटायला जातो, हें त्याच्या बापाला कळलें तेव्हा तो खूप संतापला. त्याने प्रभाकरला विचारल्याबरोबर त्याने तें कबूल केलें आणि तो आपल्या बाजूनें कांहीं सांगणार, तों म्हाताऱ्याला भान न राहून त्यानें त्याच्या एक मुस्कटांत दिली. यावर प्रभाकर चिडून कांही बोलणार तों—गप बैस, गाढवा. मला

अक्कल शिकवतोस काय ! असें म्हणून म्हातारा आणखी एक मुस्कटांत द्यायला जातो तों त्याचा हात अर्ध्या वाटेवरच थांबला, आणि हृदयाची क्रिया बंद पडून म्हातारा मरून जमिनीवर पडला.

प्रभाकराचे कांही दिवस दुःखांत गेले, पण तें किती दिवस टिकणार ? आतां शारदेशीं लग्न करायला तो मोकळा झाला होता, पण ती हातची गेली. तिला भेटायची परवानगी होती, पण चोरीचा कारभार त्यांना दोघांनाही नको होता. तेव्हां काय करावें ?

पुनः भाऊसाहेबांनी यांतून तोड सुचवली. ते शारदेला म्हणाले, "आपलें लग्न रजिस्टर झालेलें आहे. तूं माझ्यावर फिर्याद करून घटस्फोटाची मागणी कर. मी कोर्टांत हजरच राहणार नाही म्हणजे झालें." आणि त्यांनी तिला कायदा समजावून सांगितला.

शारदा म्हणाली, असले खोटे आरोप तुमच्यावर करून लग्नांतून सुटका मिळवणें हें माझ्या हातून जन्मांत व्हायचें नाही. मग त्याचे काय परिणाम व्हायचे असतील ते होतील. मला काय तुम्ही हलकट समजतां ?

—असें काय म्हणतेस बरें ? पण हा कायद्याचा प्रश्न आहे, तो कायद्याच्याच दृष्टीने सोडवायला हवा. दोन्ही माणसांना लग्न मोडायला पाहिजे असलें तरी तें फिर्याद केल्याशिवाय मोडतां येऊं नये, हा कायद्याचा मूर्खपणा आहे. त्या मूर्ख-पणांतून आपल्याला जर सुटका दिसते, तर आपण ती कां नाही करून घ्यायची ?

—तें मला नाही जमायचें. मग तुम्हीच कां नाही फिर्याद करीत माझ्यावर ? तेंही कायद्यांत चालतेंच. एवीतेवी खोटीच फिर्याद करायची, तें वकिलांनाच जास्त चांगलें साधेल !

—(हंसून) तसेंही केलें असतें, पण घटस्फोटाच्या बाबतींत ही खोट्या फिर्यादीची पद्धतच ठरून गेली आहे, की बायकोने खोटी फिर्याद करायची आणि नवऱ्याने बचाव करायचा नाही.

—तें मुळीच व्हायचें नाही, तुम्ही कांही सांगितलेंत तरी.

—बरें बुवा, दोन माणसांना सुखी करायची युक्ति मी सांगत होतों. तुला नाही पसंत. मग आतां पाहिलें पाहिजे काय करायचें तें.

आणखी कांही दिवस गेले. एके दिवशीं सकाळीं शारदा निजून उठली तोंच नोकराने एक पत्र आणून दिलें. हस्ताक्षर भाऊसाहेबांचें आणि तिच्याच नांवचें पत्र पाहून तिला मोठें आश्चर्य वाटलें आणि तें उघडून वाचतांच तिला विजेचा धक्का बसल्याप्रमाणे झालें. त्यांत पुढील मजकूर होता. मुली, मी आत्महत्या करीत आहें. तुला दुःख होईल हें मी जाणून आहें, पण एरवी तरी तूं सुखी कोठें होतीस? तुला सुखी करणें हेंच मी आपल्या जीविताचें साफल्य समजत होतों. तें जर मला करतां आलें नाही, तर जगायचें तरी कशाला? तूं बिलकूल वाईट वाटून घेऊं नको, मला आतां मरण्यांतच आनंद आहे, आणि तूं प्रभाकराशीं लग्न करून सुखी व्हावेंस हीच माझी अखेरची इच्छा आहे, हें त्यालाही सांग. कधींकधीं माझी आठवण करीत जा, पण रडूं मात्र नको. तूं रडलेली मला मुळीच पाहवत नाही. नाही ना रडणार? येतों मी आतां.:

(मे १९३८)

---

# कठिण प्रसंग

--आई, मी आतां लग्न करायचें ठरवलें आहे.

—अस्सें! आतां आलें वाटतें तुझ्या डोक्यांत? मी इतके दिवस तुझ्या मागें लागलें आहे कीं मला एकटीला आतां काम होत नाही, लग्न केलेंस म्हणजे मला तेवढी मदत होईल. नोकर ठेवायची कांही आपल्याला ऐपत नाही.

--वा! ठीक! म्हणजे माझी बायको नोकर होणार घरांत.

—अरे, तसें नव्हे, पण मुलीची जात, घरांत असली म्हणजे काम करील की नाही थोडेंसें? तेवढीच मला मदत होईल. बरें पण, आतां कोण काढली आहेस रंभा शोधून? इतक्या चांगल्या चांगल्या मुली सांगून आल्या होत्या, पण तुला एकही पसंत नाही! दाखवायला आणली की कांहीं तरी नांवें ठेवून परत पाठवायची.

—पण आई चेहरा पाहूनच जर मुलगी करायची झाली, तर तो तरी चांगला नको का असायला ? पाहून दुसरें काय दिसतें ? मग मुलीचें नाक जर वांकडें असलें तर ती पसंत कां करावी ?

—अरे माझें सुद्धां नाक थोडेंसें वांकडें आहे. म्हणून तूं मला वाईट ठरवशील कीं काय ?

—पण मी तुझा चेहरा पाहून तुला आई करून घेतली नाही, तेव्हां तुझ्या नाकाचा प्रश्नच त्यांत येत नाहीं. आणि शिवाय तुझें नाक वांकडें नाहींच आहे. तूं कांहीतरी सांगतेस.

—अरे फूटपट्टी लावून पाहिलेंस तर कदाचित् असेल थोडेंसें. पण एवढ्या-तेवढ्यावरून चांगली मुलगी नाकारूं नये.

—पण मला कसें समजायचें ती चांगली आहे म्हणून ? शिवाय आई, तूं असें पहा, कीं जिचें ठिकठिकाणीं प्रदर्शन होतें, आणि 'माझें प्रदर्शन करायचें नाही' असें आईबापांना निक्षून सांगण्याइतका सुद्धां जिला स्वाभिमान नाही, ती काय माझी बायको व्हायला योग्य समजतेस तूं ? मी नाही समजत. बाकी ती घरांतलें काम कदाचित् जास्त चांगलें करील.

—तुझें आपलें कांहीतरीच. मुलगी दाखवायला न्यायची रीतच आहे, त्यांत स्वाभिमान कसला आणि काय कसलें ? स्वाभिमान धरून बसतील त्यांचीं लग्नेंच व्हायचीं नाहीत ! अरे बी. ए. झालेल्या मुलींना सुद्धां स्थळें शोधीत हिंडावें लागतें !

—बेअकली मुली त्या ! कधी तोंड उघडायचें नाही, मग कोणाच्या ओळखी व्हाव्या कशा ? अक्कल असली तर बी. ए. होईपर्यंत केव्हाच लग्न जुळून जातें.

—मग तूं अशीच एखादी कॉलेजांतील मुलगी काढली आहेस वाटतें शोधून ? पण मला नांव तर ऐकूं दे कोण ती.

—समजेल लवकरच. तिचा बाप काय म्हणतो तें पाहून मग सांगेन. बाकी तो कांहींही म्हणाला तरी आम्ही लग्न करणारच. आम्ही दोघें वयांत आलेलीं आहोंत. आम्हाला कोणी आडकाठी आणूं शकत नाही.

दोन दिवसांनीं तो आईला बातमी सांगायला म्हणून घरीं आला, तों तिचा

चेहरा दुःखीकष्टी आणि डोळे रडून रडून लाल झालेले दिसले.

—आई, काय झालें ग ? तूं रडत होतीस ? कां ? मला सांग ना. माझ्या हातून कांही होण्यासारखें असलें तर करीन.

—कांही नाही. मागच्या आठवणी झाल्या म्हणजे येतें रडायला, झालें.

—आई, हें कांही बरें नाही. मागच्या आठवणी काढून तूं रडत बसतेस आणि मला त्यांतलें कांही सांगत नाहीस.

—अरे मी एकटी रडतें तेवढी पुरे. तुला कशाला आणखी रडवूं ?

— पण मी तुला लग्नाची बातमी सांगायला आलों आणि तूं रडत बसलेली ! चांगलें का हें ?

—कसली बातमी आणली आहेस ? सांग तर खरी.

—आपल्या गणपतरावांच्या विमलबरोबर मी लग्न करणार आहें. तिनें त्यांना विचारलें तेव्हां ते खूप संतापले. आणि कांही एक कारण सांगितल्याशिवाय 'हें लग्न होतां कामा नये' असा त्यांनी हुकूम सोडला. विमलनें मला सांगितलें, तेव्हा मीं म्हटलें आपण लग्न रजिस्टर करूं आणि मी उद्यां नोटीस देणार आहें.

—हें बघ, प्रभाकर, गणपतरावांनी जें विमलला सांगितलें, तेंच मी तुला सांगतें. हें लग्न होतां कामा नये.

—आई, तूं असें काय करतेस ? विमल चांगली मुलगी आहे असें तूं थोड्या वेळां का म्हणाली आहेस ? आणि तिचा चेहरा अगदीं बरोबर तुझ्यासारखा दिसतो बघ. मला वाटलें तुला आनंद होईल हें ऐकून. वास्तविक आपला इतका घरोबा असतांना हें लग्न तुम्हींच सुचवायला पाहिजे होतें. पण तुम्हीं कांहीच बोलाना तेव्हा आम्हालाच ठरवावें लागलें. आतां आम्ही ऐकणार नाही.

—प्रभाकर, तुला लहानाचा मोठा करायला मला किती कष्ट पडले आहेत, किती खस्ता खाव्या लागल्या आहेत, याचा कांहीतरी विचार कर आणि एवढें माझें म्हणणें ऐक.

—हें बघ आई, तूं माझ्या खस्ता खाल्ल्यास, तुला पुष्कळ त्रास झाला, कबूल. पण तेवढ्याकरतां मी जन्मभर तूं सांगशील तें करावें हें मला कबूल नाही.

शिवाय ही माझ्या सगळ्या जन्माच्या सुखादुःखाची गोष्ट आहे, याचा तूं कसा विचार करीत नाहीस ? बरें तूं कांही कारण सांगितलें असतेंस, तर मीं त्याचा विचार केला असता. नुसतें तूं म्हणतेस, हें कांही पुरेसें कारण नाही.

—गणपतराव नुकतेच येथे येऊन गेले, आणि त्यांनी मला हें लग्न शक्य त्या उपायांनी मोडायला सांगितलें आहे.

—वा ! छान ! म्हणजे माझ्या सुखाची तुला किंमत नाही. गणपतरावांनीं सांगितलें त्याची किंमत जास्त ! असलीं कारणें मी मुळीच ऐकणार नाही.

—मग नाहीच तूं ऐकत ?

—बिलकुल नाही. उद्यां जाऊन मी नोटीस देणार. पाहूं गणपतराव काय करतात तें.

—अरे गणपतराव काय करणार ? ते पुनः मलाच येऊन सांगणार.

—तूं स्पष्ट सांगत कां नाहीस काय आहे तें ? अशी लपवाछपवी कां ?

—बरें बाबा. तुला खरी हकीकत सांगतें. लक्ष देऊन ऐक. तूं झाल्याबरोबर तुझे वडील वारले आणि मी निराधार झालें. तुला घेऊन कांहीं काम तरी कसें करायचें, आणि पोट कसें भरायचें ? अशा वेळीं गणतरावांनी जर मला आश्रय दिला नसता, तर काय झालें असतें तें मला सांगतां येत नाही. तुझें सगळें शिक्षण त्यांच्या पैशाने झालें आहे. पण या उपकाराचा मोबदलाही मला द्यावा लागला. गणपतरावांची बायको तेव्हां जिवंत होती. पण ती किती वर्षांपासून अंथरुणाला खिळलेली होती. त्यांनी मला मदत केली तेव्हा कोणतीही अट घातली नव्हती, पण अशा स्थितींत त्यांना नाही म्हणण्याइतकी मी निर्दय झालें नाही. त्यांत मी कोणाचेंही कांही नुकसान केलें नाही, आणि मी कोणाचीही बांधलेली नव्हतें. माझी मी मुखत्यार होतें. पण त्या वेळीं हल्लीच्या युक्त्या कोणालाच माहीत नव्हत्या आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम होऊन मी गरोदर झालें. गणपतरावांनी पंढरपूरला माझ्या बाळंतपणाची सोय केली आणि नंतर स्वतः पंढरपूरला जाऊन तेथून माझी मुलगी आणून स्वतःची म्हणून वाढवली. ती ही विमल. मग तुला आतां कसें तिच्याशीं लग्न करतां येईल, सांग पाहूं ? तूं म्हणतोस मी तुला मागचें कांही सांगत नाही. कसें हें सगळें सांगूं तुला ? मला स्वतःला

मीं कांही पाप केलें असें वाटत नाही, पण तूंच मला पापी ठरवलेंस तर ? तुम्ही दोघें लग्नच करायला निघालांत, आणि आम्ही नको म्हटलेलें तुम्ही ऐकानात. तेव्हा मग काय करावें ? पण गणपतरावांना ही हकीकत स्वतः तुह्माला सांगणें बरें वाटेना, तेव्हा त्यांनी मला सांगितलें आणि तुम्हाला सांगणें न सांगणें माझ्यावर सोंपवलें. हा त्यांचा चांगुलपणा नाही का ? पण मी तरी काय करणार ? मला वाटलें होतें तूं माझें ऐकशील. पण तूं कांही सुधा मुलगा आहेस ? तूं सगळें सांगायला लावलेंस आणि मला लाज आणलीस.

—आई, मला क्षमा कर. मला काय माहीत असें कांही त्यांत असेल म्हणून? पण तूं तरी एवढी घाबरत होतीस कां ? मी कांही एवढ्यावरून तुला पापी समजणार नाही. तूं केलेंस तें तरी माझ्याकरतांच केलेंस. मी नसतों तर तुला पुनर्विवाह सुद्धां करतां आला असता, नाही का ?

—जाऊं दे, त्याचें काय आतां ?

—व ऽऽरें. वायको नाही तर नाही. एक वहिण तर मिळाली ? लग्न केलें कीं बायको मिळते, पण बहिण कांही केलें तरी मिळत नाहीं. ती असावीच लागते. आतां मी समजलों. उगीच नाही तिचा चेहरा तुझ्यासारखा दिसतो तो !

—पण तूं बायको आणलीस तर ती मला कामाला उपयोगी पडेल. वहिण थोडीच कांही करणार आहे ?

—पुन्हा आपलें आहेच का तुझें ?

(जून १९३८)

---

## विमलेचें शील

गणपतराव सूक्ष्मदर्शक यंत्रांतून कांहीतरी तपाशीत होते. इतक्यांत कोणाचीं पावलें वाजल्यावरून त्यांनी वळून पाहिलें, तों प्रभाकर शेजारीं उभा

असलेला पाहून ते म्हणतात, वाः! आली का आपली स्वारी? होतां कोठे काल आपण?

प्रभाकरला बोलायला तोंडच नव्हतें. तो वरमून म्हणाला, मी विसरलों, बाबा.

--छान! माझ्याबरोबर यशवंतरावांकडे चहाला जायचें ठरवलेलें तूं विसरलोस आणि मग गेला होतास कोठे? सिनेमाला, खरें की नाही?

गणपतराव त्याला विशेष धाकांत ठेवीत नसत, तेव्हा त्याने घाबरल्याशिवाय उत्तर दिलें, हो.

--कोणाबरोबर?—विमलबरोबर.

--वा छान! ती एक हव्या त्याच्याबरोबर सिनेमाला जाईल म्हणा, पण...

--बाबा, ती हव्या त्याच्याबरोबर नाही जात. मी तिच्याशीं लग्न करणार आहे. मग माझ्याबरोबर गेली तर काय बिघडलें?

--हें पहा, मला हें बिलकुल पसंत नाही. हे तुझे चाळे बंद करण्याकरतां मी तुझें लग्न करून द्यायचें ठरवलें आहे, आणि म्हणूनच यशवंतरावांना मी सांगितलें होतें चहाला बोलवायला.

—आणि म्हणूनच मी आलों नाही, बाबा. मला कळलें होतें असें कांही आहे म्हणून.

—अस्सें! बरें मीं आता तुला पुन्हा एकदां सांगतों की मला तुझी निवड बिलकुल पसंत नाही. त्या मुलीशीं तूं लग्न करतां कामा नये.

—पण कां? तिच्यांत काय तुम्हाला कमी दिसतें? ती हुशार आहे, स्वभावाने चांगली आहे, सुंदर आहे. इतकें असून तुम्हाला ती आवडत नसली तर लग्न केल्यावर मी वेगळा राहीन.

—हें पहा मीं आजपर्यंत तुला पुष्कळ स्वातंत्र्य दिलें आहे, पण ही महत्वाची गोष्ट आहे. यांत केवळ तुझाच नव्हे तर आमच्या सगळ्या कुळाचा संबंध पोंचतो. तेव्हा या बाबतींत तूं माझें ऐकलेंच पाहिजेस.

—हें कसलें आलें आहे स्वातंत्र्य? ज्यांत माझ्या सबंध आयुष्याच्या

सुखदुःखाचा प्रश्न आहे, त्यांत स्वातंत्र्य नाही. मग बारीकसारीक गोष्टींत स्वातंत्र्य दिल्याचा काय उपयोग ?

--स्वातंत्र्य याचा अर्थच मुळी हा. चांगल्या गोष्टी करायचें स्वातंत्र्य. वाईट गोष्टी करायचें स्वातंत्र्य कसें मिळेल ?

—आणि कोणती गोष्ट चांगली आणि कोणती वाईट हें ठरवायचें लोकांनी ! असलें स्वातंत्र्य कोणाला नसतें ? आणि तें हवें आहे कोणाला ?

—ते कांही असो. या बाबतींत माझा निश्चय झाला आहे, आणि तसें तुला वागलें पाहिजे.

—आणि तुम्ही त्याला कांही एक कारण सांगत नाही. केवळ तुमची मर्जी म्हणून ऐकायचें !

या वादांत गणपतरावांनाही मोठेसें समाधान वाटत नव्हतें. आपलें म्हणणें आपल्या दृष्टीने बरोबर असलें तरी मुलाने आपल्याला अरेराव समजावें हें त्यांना बरें वाटेना. शिवाय आणखी एका वर्षाने तो डाक्तर होणार, तेथपर्यंत त्याने आपलें जुलमानें ऐकलें, तरी मग तो वाटेल तें करणारच की नाही ? असा पोक्त विचार करून शेवटीं ते म्हणाले, हें पहा, मी म्हणतों याला महत्त्वाचीं कारणें आहेत. विनाकारण अंमल गाजवणें मलाही बरें वाटत नाही. मीं खरें कारण सांगणें रास्त नाही, पण तूं ऐकतच नाहीस म्हणून सांगतों. विमल हुशार असेल, सुंदर असेल, स्वभावाने चांगली असेल, पण तिला शील नाही.

--हें मला मुळींच खरें वाटत नाही. मी तिला चांगली ओळखतों.

—आणि मी तिला तुझ्यापेक्षांही चांगली ओळखतों. आतां नाइलाज म्हणून तुला सांगतों की ती गर्भावर उपचार करून घेण्याकरतां कांही वर्षांपूर्वी माझ्या-कडे आली होती. तेव्हा आतां तर माझें ऐकशील ?

हें ऐकून प्रभाकरचा चेहरा उतरला. तरी तो म्हणाला, पण आतां तर ती बरी झाली आहे ना ?

—माझ्याकडे आल्यावर बरी कशी नाही होणार ?

—मग आतां काय तुमची हरकत आहे ?

—तिला रोग आहे ही माझी हरकत नव्हती. तिला शील नाही ही माझी हरकत आहे.

—हं, मी विचार करतों.

माघार घ्यायची नाही म्हणून शेवटचीं दोनतीन वाक्यें प्रभाकर बोलला होता. पण त्याचें मन अतिशय अस्वस्थ झालें होतें. विमलने ही गोष्ट आपल्यापासून लपवून ठेवली हें कांही बरें केलें नाही, असें त्याला वाटे. पण पुनः असें मनांत येई की ती सांगणार तरी कशी! तथापि तिच्यावर त्याचा इतका दृढ विश्वास होता की हें खरें असलें तरी सुद्धां त्यांत तिची कांही चूक नसावी असेंच त्याला वाटलें. तिला प्रत्यक्ष भेटूनच याची शहानिशा करायचें त्याने ठरवलें.

तिला विचारल्यावरोबर तिने खरी हकीगत सांगितली. ती अशी कीं तिच्यावर एकदां बलात्कार झाला होता, त्याच्या परिणामीं तिला हा रोग जडला होता. बलत्काराचा खटला कोर्टातही गेला होता, पण तिचें नांव प्रसिद्ध करण्याची कोर्टांने मनाई केल्यामुळे तिचें नांव वर्तमानपत्रांत आलें नव्हतें. तिने खटल्याची हकीगत देखील त्याला काढून दाखविली, तेव्हा त्याची खात्री झाली की यांत तिचा बिलकुल दोष नाही, आणि तिच्या शीलाचाही यांत कांही प्रश्न नव्हता.

इतकी खात्री झाल्यावर त्याने गणपतरावांना ही सर्व हकीकत सांगितली. तरीदेखील, मर्जीविरुद्ध कां होईना, पण विवाहबाह्य समागमाने स्त्री अपवित्र होते, या कल्पनेने ते परवानगी देईनात, तेव्हा मी तिच्याशीं लग्न करणार असें त्याने निक्षून सांगितलें, आणि राहिलेलें शिक्षण पुरें करण्यास पैसे देण्याचें त्यांनी नाकारल्यामुळे तो वेगळी खोली घेऊन राहूं लागला. इकडे त्याच्या एका वकील मित्राच्या सल्ल्यावरून विमलच्या तर्फे गणपतरावांवर कोर्टांत फिर्याद दाखल झाली. त्यांच्या धंद्यामुळे त्यांना कळलेलें गुपित त्यांनी मुलाला सांगितल्यामुळे आपलें त्याच्याशीं ठरलेलें लग्न मोडलें आणि यामुळे आपलें भयंकर नुकसान झालेलें आहे, म्हणून त्यांच्याकडून नुकसानभरपाईची मागणी तिने केली होती.

प्रभाकरने आपल्या जबानींत सांगितलें की बापानें दिलेल्या माहितीवरून लग्न मोडणें आपणास भाग पडलें. गणपतरावांना उलट तपासणींत कबूल करणें भाग पडलें की तिला एकदां गर्मी झाली असली तरी आतां ती पूर्ण बरी झाली

होती, आणि निदान पुढे काळजी घेतल्यास संसर्गाची बिलकुल धास्ती नव्हती. तिच्यावर बलात्कार झाला होता हें पूर्वीच्या कोर्टांतल्या हकीकतीवरून सिद्ध झालें, तेव्हा तिची यांत चूक नव्हती हेंही त्यांना कबूल करावें लागलें. तथापि एकदां जिचा दुसऱ्याशीं संबंध झाला तिचें शील शिल्लक रहात नाही, अशा समजुतीने अजूनही ते लग्नाला परवानगी द्यायला तयार नव्हते. कोर्टाने या सर्वांचा विचार करून, तिचें किती नुकसान झालें हें ठरवून, आणि या हकीकतीनंतर तिला पुढेही लग्न करतां येणार नाही हें गृहीत धरुन, तिला नुकसानभरपाई म्हणून एक लक्ष रुपये देववले. गणपतरावांना एक लक्ष रुपये म्हणजे मोठीशी बाब होती असें नाही. ते त्यांनी तावडतोब दिलेही.

यानंतर आठ दिवसांनी ते एकदां आपल्याशीच विचार करीत बसले होते. त्यांनी कोर्टांत लग्नाला संमति न दाखवल्यामुळे या थरावर गोष्ट आली होती. तरी देखील त्यांचें मन त्यांना खात होतें. विमल निरपराध होती हें कबूल करणें त्यांना भाग होतें. तेव्हा आपण आपलाच हट्ट धरला हें कांही बरें केलें नाहीं, याची त्यांना अधिकाअधिक जाणीव होत होती, आणि आतां जास्त ओढून धरण्यांत कांही अर्थ नाही, कांही झालें तरी हें लग्न आतां थांबत नाही, हें त्यांना कळून चुकलें होतें; आणि मुलाने शेवटीं आपल्यावर मात केली म्हणून त्याचें त्यांना थोडेंबहुत कौतुकही वाटत होतें. तो कसा झाला तरी आपला मुलगा आहे, तो सुधेपणाने ऐकणार थोडाच? असे त्यांचे विचार चालले होते, इतक्यांत प्रभाकर दारांत उभा असून आंत यायला घुटमळतो आहे असें पाहून ते म्हणाले, ये ये, प्रभा, घाबरूं नको. मी कांही राक्षस नाही, कांही झालें तरी बापच आहें. बायकोला नाही का आणलीस बरोबर?

—बायकोला? म्हणजे आमचें कांही लग्न नाही झालें अजून. तुमचा आशीर्वाद घ्यायला आलों आहें. आणि विमल खाली उभी आहे, सांगाल तर बोलावतों.

—जा बोलाव तिला इकडे.—आणि ती आंत आल्यावर म्हाताऱ्याने गहिंवरून तिला पोटाशीं धरून म्हटलें, ये बाळ विमल, मला क्षमा कर. पहिल्यापासून तुझी कांही चूक नाही हें मला कळायला पाहिजे होतें.

—जाऊं द्या तें. आतां काय त्याचें ?

—तर तर ! माझ्याकडून लाख रुपये काढून आतां जाऊं द्या म्हणे !

—पण बाबा, ते मलाच दिले असें समजा म्हणजे झालें. एवींतेवीं मलाच मिळायचे की नाही ते ? प्रभाकर म्हणाला.

—तुला रे कां, चोरा ? तिला दिलेले आहेत ते. तूं याला एक पै देऊं नको ग, गणपतराव म्हणाले.

—नाहींच देणार. त्याचा बाप श्रीमंत आहे. मला कोठे आहे बाप ? विमल म्हणाली.

—आतां मलाच बाप समज म्हणजे झालें. गणपतराव म्हणाले.

—वा, वा ! म्हणजे वहिणभावांचीं कोठें लग्नें होतात का ? विमल म्हणाली.

( आक्टो. १९३८ )

---

# आमची कुसुम

आमची कुसुम रस्त्याने जात असली की पुरुषांची गोष्टच राहो, पण बायकांना देखील मागे वळून पाहिल्याशिवाय राहवत नसे. तिचा चेहराच केवळ मोहक होता असें नाही, तिचा एकंदर बांधा आणि चालण्याची ढब कांही विलक्षण आकर्षक होती. म्हणजे ती जुन्या कवींच्या वर्णनाप्रमाणे गजगति नव्हती, किंवा ती दर पावलाला दहा ठिकाणीं वांकतहि नसे. पण तें आकर्षण कशांत होतें हें जर मला सांगतां आलें असतें, तर मींही तसेंच चालायचा प्रयत्न केला असता ! इतकें मात्र खरें की तिला नाजुकपणाचे चोचले बिलकुल येत नव्हते, आणि कोणी आपल्याकडे पहात आहे म्हणून अमुक करायचें हें तिला माहीत नव्हतें. अगदी क्षुल्लक गोष्टींत देखील ढोंग करणें तिच्या जिवावर येत असे, यामुळे ती एखादे वेळीं कोणाला काय बोलेल याची मलाच धास्ती वाटत असे, कारण आम्ही नेहमी बरोबर असायच्या.

आई मला एकदां म्हणाली, काय ग ? अलीकडे तुला झालें आहे काय ? मागे तुला एवढी घडी विघडलेली खपत नसे आणि आता पाहतें तो दिवसेंदिवस अधिकच गबाळ होत चाललीस. या वयांत हें असें काय झालें आहे तुला ? तरणीताठी पोर तूं. तुला वैराग्य यायचे का हे दिवस ?

—आईला मी काय सांगूं ? तिला काळजी वाटूं नये म्हणून मीं म्हटलें, अग आमच्या कॉलेजांत एक नवीन प्रोफेसर आले आहेत, त्यांना किनई, साधेपणाचें इतकें वेड आहे की ते आपले गबाळ मुलींना जास्त मार्क देतात. तेव्हा म्हटलें गबाळ पोशाक करून एखादी स्कॉलरशिप मिळाली तर पहावी.

पण खरें कारण होतें न्यारेंच. कुसुमची आणि माझी खूप गट्टी झाली आणि आम्ही नेहमी कोठेहि बरोबरच जायच्या. मग कुसुम बरोबर असतांना माझ्याकडे पाहणार कोण ढुंकून ? तेव्हा मी पोषाखाकडे फारशी लक्ष देत नाहींशी झालें. आणि ही लोकांची चूक नव्हेच मुळी, आमची कुसुम होतीच तशी. शिवाय आणखी एक असें झालें की यशवंत गोखले नांवाचा एक मुलगा माझ्या बराच ओळखीचा झाला होता, आणि त्याचें माझ्या-वर प्रेम आहे असें मी आपलें मनांत समजत होतें. पण कुसुम आमच्या कॉले-जांत आली मात्र, आणि हीहि स्वारी इतरांच्या बरोबर तिच्याच मागे लागली ! मग मात्र मी अगदीं वैतागलें आणि मला पोषाखविषयक कांही सुचेनासा झाला, आणि अभ्यासाकडेहि लक्ष लागेना. त्या वर्षी मी नापासच व्हायची, पण वेळे-वर सावध झालें. मी वास्तविक चांगली वर यायची, पण त्या वर्षी नुसती पास झालें. इतकें सगळें झालें तरी मीं कुसुमला याची दादहि लागूं दिली नाही आणि तिचा द्वेषहि केला नाही. तिने विचारलें तर बरें वाटत नाही म्हणून वेळ मारून नेत असें, यामुळे तिची माझी मैत्री कायम राहिली. ती श्रीमंत होती म्हणून मी तिच्या मागे असें, असे लोक म्हणत असत, पण मला त्याची पर्वा नव्हती.

गंमत झाली ती याच्या पुढेच. वास्तविक त्या वेळीं ती कांही मोठीशी गंमत नाही वाटली, पण मागचीं दुखें लोक विसरतात इतकेंच. एक दिवस आम्ही दोघी कॉलेजांतून बाहेर पडत होतों, तों एक क्रिकेटचा चेंडू येऊन कुसु-मच्या पायाला जोराने लागला आणि ती मोठ्याने ओरडली. तें पाहून यशवंत

पळत पळत काय झालें तें पहायला आला, कारण चेंडू त्याने मारला होता. आणि बोलिंग करणारा फडके म्हणून मुलगा होता तोही आला. कुसुम लंगडत होती तें पाहून यशवंत म्हणाला, जरा थांबतां का? मी तुम्हाला टांगा आणून देतों.

असें म्हणून तो पळतच गेला. कुसुम नको म्हणणार होती, पण तो होता कोठे ऐकायला? फडके म्हणाला, माफ करा हां, तुम्हाला बरेंच लागलें आहे असें दिसतें.

कुसुम म्हणाली, तुम्ही कां माफी मागतां? तो तुम्हीं नाही ना मारलात?

फडके म्हणाला, मारला गोखल्याने, पण मी बोलिंग करीत होतों ना? बॉल् चांगला टाकला असता म्हणजे त्याला मारतांच आला नसता.

कुसुम म्हणाली, वा! तुम्हाला बरीच घमेंड दिसते आहे आपल्या बोलिंगची.

मी म्हटलें, अग तुला माहीत नाही का? यांच्या बोलिंगवर तर आपल्या कॉलेजची भिस्त असते सगळी.

कुसुम म्हणते, म्हणून काय झालें? अमुक माणसाला मारतांच येणार नाही असा बॉल अमुक वेळेला टाकीन म्हणणें म्हणजे घमेंडच आहे.

फडके विचारा ओशाळा झाला असें पाहून ती पुढे म्हणाली, त्यांत काय आहे एवढें? हा अपघात आहे. अपघात होतातच कधीकधी. त्यांत कोणाचीच चूक नाही.

इतक्यांत यशवंत टांगा घेऊन आला होता, तो म्हणाला, मी तुम्हाला पाहिलें असतें तर इतक्या जोराने नसता मारला.

फडके म्हणाला, पण खेळतांना दिसतें आहे काय त्याला?

कुसुम म्हणते, नाहीच दिसतां कामास. असें जाणारायेणाराकडे पहायला लागलें तर मग खेळणार काय?

आम्ही दोघी टांग्यांत बसलों आणि ते दोघे सायकलवरून आमच्या मागोमाग कुसुमला घरीं पोंचवायला आले. आम्हीं निघतों तों खेळणाऱ्या मुलांच्या घोळक्यांतून कोणीतरी म्हणालें, चैन आहे बुवा! त्यानंतर कांही दिवसपर्यंत ते दोघे कुसुमच्या समाचाराला दररोज तिच्याकडे येऊन जात. शेवटीं

एकदां कुसुमनें त्यांना सांगितलें, मी आतां चांगली बरी झालें हां. आतां समाचाराला यायचें कारण नाही. पण एरवीं सुद्धा यायला हरकत नाही.–ते दोघेही हंसले आणि तेव्हापासून आमची चौघांची चांगलीच ओळख झाली.

कुसुमच्या बापाने एका मित्राचा पोरका झालेला मुलगा आपल्या घरींच वाढवला होता. गोविंद कुसुमपेक्षा वयाने थोडा मोठा होता, आणि त्याला जरी त्या घरीं कांही कमी पडत नसे, तरी आपल्यावर केलेल्या उपकारांचें त्याला ओझें वाटून तो बिचारा नेहमी थोडासा ओशाळा असे, आणि कोणत्याहि बाबतींत आपलें मत ठांसून सांगण्याची त्याला छाती होत नसे. मुळचाच स्वभावाने गरीब, आणि त्यांत अशा परिस्थितींत सांपडलेला. कुसुमवर त्याचें प्रेम होतें यांत कांही नवल नाही, पण आपल्याला तें पचणार नाही या समजुतीने तें दिसूं न देण्याची त्याची खटपट असे. पण हें बायकांपासून लपवणें फार कठिण असतें. कुसुमला आई नव्हतीच, पण मला तें स्पष्ट दिसत होतें. पण काय उपयोग? कुसुमचें आणि त्याचें लग्न होणें जवळ जवळ अशक्य होतें. कुसुमला त्याच्या अस्तित्वाची तरी जाणीव होती की नाही हें सांगणें कठिण होतें. तो एकदम नाहीसा झाला असता तर कदाचित् तिला तें भासलें असतें. इतका तो मागे-मागे राहून तिच्या उपयोगी पडत असे.

दोन वर्षे पाहतां पाहतां निघून गेलीं आणि आमची सर्वांचीच बी. ए. ला बसण्याची वेळ आली. पुढें काय करायचें याबद्दल आमची नेहमी वाटाघाट चालत असे, कारण नापास होण्याची भीति कोणालाच नव्हती. यशवंतचें कुसुमशीं लग्न होणार हें मला उघड दिसत होतें. पण 'यदभावि न तद्भावि, भावि चेन्नतदन्यथा' असें म्हणून मी आपल्या मनाचें समाधान करून घेत असें. अर्थात् लग्नाबद्दल कोणीहि कांही बोललें नव्हतें, कारण तसें असतें तर कुसुमने मला केव्हाच सांगितलें असतें. आणि माझी जशी मनांतून खात्री होती, तशी फडक्याची नव्हती, कारण तो अजून कुसुमच्या भोंवती घोटाळत असे. मला त्याची दया येई. त्याला केव्हाही कोणतेंही काम सांगा, त्याने कधी नाही म्हटलें नाही इतकेंच नाही तर त्याला लोकांच्या उपयोगी पडण्यांत आनंद वाटत असे. या गुणामुळे तो जरी कॉलेजांतला सर्वांत लोकप्रिय मुलगा झाला होता, तरी यशवंतचें रूप आणि

बुद्धीचें तेज त्याला नव्हतें. यशवंतचा पहिला वर्ग चुकणें कठिण होतें, आणि फडक्याला नापास व्हायची जरी भीति नव्हती, तरी वरच्या वर्गात यायची आशाही नव्हती. कुसुम स्वतः अतिशय हुशार होती आणि तिने कसून अभ्यास केला असता तर पहिला वर्गहि मिळवला असता, पण ती थोडीशी लहरी होती. जो विषय आवडेल तोच वाचीत बसे, यामुळे परीक्षेच्या दृष्टीने जोराचा अभ्यास होत नसे. तिने बुद्धीला महत्व द्यावें यांत नवल नव्हतें, आणि तिचा यशवंतकडेच ओढा होता.

पण सर्व सुरळीत चाललें असतांना यशवंतला एकदम टायफॉईड झाला. तो जरी फारसा लांबला नाही तरी त्यामुळे बरीच अशक्तता आली आणि परीक्षेला बसतां येईल की नाही अशी शंका उत्पन्न झाली. फडक्याने रात्रीच्या रात्री जागून काढून त्याची शुश्रूषा केली. आम्हीही मधूनमधून जाऊन चौकशी करीत होतों, पण यापलीकडे कांही करणें आम्हाला शक्य नव्हतें. तरीपण मुख्यतः उत्तम शुश्रूषेमुळे तो परीक्षेला बसण्याइतका बरा झाला. फडक्याची शरीरप्रकृति उत्तम असल्यामुळे इतकीं जाग्रणें करूनही तो आजारी पडला नाही.

परीक्षेची गडबड संपल्यावर आम्ही दोघी त्यांची विचारपूस करायला आणि गप्पा मारायला त्यांच्याकडे गेलों. बहुतेक विद्यार्थी निघून गेल्यामुळे जिकडेतिकडे सामसूम होतें, आणि ते कॉलेजच्या बाहेरच्या एका वसतिगृहांत रहात असल्यामुळे आम्हाला तेथे जायला कोणाचीहि भीति नव्हती. कुसुम माझ्या किंचित् पुढे होती आणि त्यांच्या खोलींतून कांहीतरी बोलणें ऐकूं येत होतें. कुसुमने मला थांबायला खूण केली, आणि आपण कान देऊन ऐकूं लागली. तिने काय ऐकलें हें मला त्या वेळीं समजलें नाही, पण ती एकदम खूप रागावलेली दिसली, आणि खोलीचा दरवाजा धाडकन् उघडून आंत गेली. मीहि धांवत गेलें. ती त्यांच्या अंगावर ओरडली, तुम्हाला कांही लाजा नाही वाटत ? मी काय एखादी बाहुली आहें म्हणून ती एकाने दुसऱ्याला देऊन टाकायची ? नमस्कार. हीच आपली शेवटची भेट.

आणि माझ्याकडे वळून म्हणाली, चैल ग, घरीं जाऊं. त्यांच्याजवळ बोलायची त्यांची किंमत नाही.

मी म्हटलें, अग पण झालें काय ?–ती म्हणाली, घरीं चल, सांगतें.

तिच्या त्या वेळच्या सांगण्यावरून आणि त्यानंतर बऱ्याच दिवसांनी फडक्याने सांगितलेल्या हकीकतीवरून पूर्वी त्यांचें काय संभाषण झालें असावें याचा मी तर्क केला. मित्राच्या शुश्रूषेमुळेच आपण बरें झालों आणि आपल्याला परीक्षेला बसायला मिळालें, या कृतज्ञेच्या भरांत यशवंतने फडक्यावर खुष होऊन त्याला विचारलें, बोल, तुला मी काय बक्षिस देऊं ? मागशील तें देतों.

फडके म्हणाला, अरे वा ! पण पहा बरें, जड जाईल !

यशवंत म्हणाला, कांही जड जात नाही; काय पाहिजे तें माग.

तेव्हा फडके अर्धवट चेष्टेंतच म्हणाला, तर मग मला कुसुम पाहिजे आहे आणि त्याला एकच मार्ग आहे. तूं येथून एकदम निघून जा आणि कुसुमला याची बातमीहि देऊं नको आणि नंतर पत्रहि लिहूं नको.

यशवंताला जबरदस्त धक्का बसला, पण वचन दिल्यामुळे तो म्हणाला, कबूल. मी पुढच्याच गाडीने मुंबईला जातों. कुसुमला तूं काय वाटेल तें कारण सांग.

यांतलीं शेवटचीं एकदोन वाक्यें कुसुमच्या कानीं आलीं आणि ती चिडूनच आंत गेली आणि तसें बोलली.

घरीं गेलों तों गोविंदा एकटाच बसला होता. त्याचीहि परीक्षा पास झाली होती आणि आपल्याला आतां या घरांत यापुढे रहायला कांहीच सबब नाही या विचाराने तो खट्टू झाला होता. घरीं गेल्यावरोबर कुसुमने त्याला हांक मारली आणि तो येतांच म्हणाली, अरे गोविंद, माझ्याशीं लग्न करतोस का ?

गोविंद 'आ' वासून उभा राहिला, त्याच्या तोंडातून एक शब्द निघेना.

कुसुम म्हणाली, कायरे, मी काय विचारलें ?

गोविंद म्हणाला, म्हणजे, मी समजलों नाही !

कुसुम म्हणाली, त्यांत समजायचें काय आहे ? माझ्याशीं लग्न करतोस का ?

आतां गोविंदाला वाचा फुटली.–हें पहा, तूं माझी अशी चेष्टा करतेस हें

कांही वेरं नाही. मी आपला गरीब मनुष्य......

कुसुम म्हणाली, अरे गोविंदा, मी कधी तुझी चेष्टा करतें का ? मी खरेंच विचारतें आहें.

गोविंद म्हणाला, असें ? तरमग मी नाही कसा म्हणेन ? न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत्.

कुसुम म्हणाली, तरमग बाबांना सांग आणि ताबडतोब रजिस्ट्रारला कळव.

गोविंद म्हणाला, म्हणजे मी बाबांना सांगूं ?

कुसुम म्हणते, नाही तर ? एवढा सुद्धां तुला धीर होत नाही, मग तूं माझा नवरा कसा होणार ?

गोविंद म्हणाला, कांही हरकत नाही, मी सांगतों बाबांना. आतां मी कोणाला भीत नाही. पण बाबा नको म्हणाले तर ?

कुसुम म्हणाली, अरे वेड्या, बाबा कधी नको म्हणतात का ? जा लवकर आणि मग रजिस्ट्रारच्या आफिसांत जाऊन नोटिस दे.

गोविंदा निघून गेला मात्र, आणि कुसुम ओक्साबोक्शीं रडूं लागली. मी तरी तिचें सांत्वन काय करणार ? मीहि तिच्याबरोबर रडूं लागलें. मला तिच्याबद्दल खरोखरच वाईट वाटलें. पण मनुष्याचें मन इतकें हलकट असतें कीं यशवंत आतां मोकळा झाला, आतां कदाचित् तो आपल्या वांट्याला येईल, अशीहि एक कल्पना माझ्या डोक्यांत येऊन गेली. आणि पुढे तसेंच झालें.

आम्हाला लोक सुखी जोडपीं समजतात, आणि मी तरी नाही कशाला म्हणूं ? सुख म्हणजे असेंच असतें नाही का साधारणपणें ? यशवंतला चांगली नोकरी मिळाली, यामुळे आम्हालांही पैशाची दधात नाही. आणि तेव्हा जरी फडके एकटा पडला, तरी त्याचेंही पुढे लग्न झालें आणि त्यालाही वशिल्याने बरी नोकरी मिळाली. तेव्हा सगळींच सुखी झालीं म्हणायचीं, नाही तर काय ?

(जून १९३९)

---

124315

# स्नेहाची कसोटी

---*:+:*---

वामनला पहिल्यापासूनच गणिताची आवड. शाळेंत शिक्षकाने एखादा कठिण प्रश्न विचारला की त्याने चटकन् उत्तर द्यावें आणि इतरांनी पहात रहावें असें किती वेळां होत असे. तो मॅट्रिकला बसला तेव्हा गणिताचे प्रश्न जरा अवघडच होते. परीक्षा संपल्यावर मंडपाच्या बाहेर येऊन तो आपलीं उत्तरें इतरांशी ताडून पाहूं लागला तों बाकी पुष्कळांचीं जमत होतीं, पण त्याचीं उत्तरें कांहीं वेगळींच होतीं. त्याला वाटलें आपली कांहीं धडगत नाही, पण गणिताच्या शिक्षकाला विचारलें तेव्हा त्याचींच उत्तरें बरोबर निघालीं आणि इतरांचीं चूक होतीं.

अर्थात् कालेजांत त्याने शेवटपर्यंत गणितच घेतलें. परीक्षाच द्यायच्या होत्या म्हणून नाइलाजानें तो इतर विषय वाचीत असे आणि जात्या हुशार असल्यामुळे तो त्यांत वरही येत असे, पण त्याला खरी गोडी असे गणिताची आणि त्यांत तो नेहमी पहिला असे. प्रकृतीकरतां व्यायाम करीत जावा असें त्याला एका शिक्षकाने सांगितलें होतें, तेव्हा तो दिवसांतून पंधरा मिनिटें डंबेल्स करीत असे आणि जेवण, झोप आणि शरीराचीं इतर कामें करण्यांत गेलेला वेळ सोडून बाकी तो एकसारखा अभ्यासाचीं पुस्तकें घेऊन बसे. क्रिकेट, टेनिस वगैरे कशाचीही त्याला आवड नव्हती, यामुळे सामने पाहण्यांतही त्याचा वेळ जात नसे. त्याचे मित्र थोडेच होते, पण त्यांत एक टेनिसमधें बक्षिसें मिळवणारा होता. तो त्याला आग्रह करी, पण वामन म्हणे, काय तुम्ही लहान पोरांसारखे चेंडू इकडेतिकडे मारता ? मला कांही त्यांत गंमत वाटत नाही बुवा ! उगाच लागायबिगायचा एखादेवेळीं. माधव म्हणे, आणि तुझ्या गणितांत मोठी गंमत आहे नाही रे ? वामन म्हणे, अरे गणिताची गोडी तुला काय कळेल ? टिळक म्हणाले 'गणितांत काव्य आहे.' तें ज्याला कळेल त्यालाच गणित आवडेल. या दोघांची दोस्ती जमली होती, ती तरी शाळेंतल्या ओळखीमुळे. वामन घरचा गरीब. मॅट्रिकमध्यें बराच वर आल्यामुळे त्याला चांगली स्कॉलरशिप मिळाली

आणि कालेजच्या वसतिगृहांत रहायची सोय झाली. तेथें पहातो तों माधवशिवाय ओळखीचा मुलगाच नाही. वामन घरांतून कधीच बाहेर गेलेला नाही. कालेजांत रहायला गेल्यावर तेथलें अनोळखी जग पाहून तो थोडासा घाबरलाच. पहिल्या दिवशीं अंथरुणावर पडला तेव्हा त्याच्या डोळ्यांत पाणी आलें. या दिवसांत त्याला माधवचाच काय तो आधार होता. माधव त्याला कोणतीही अडचण भासूं द्यायचा नाही, सेवेला नेहमी हजर. त्याच्या सगळ्यांशीं ओळखी होतात कशा, याचें वामनला राहूनराहून आश्चर्य वाटे. यामुळे कोणत्याहि गोष्टींत तो माधवाचा सल्ला घेतल्याशिवाय रहात नसे.

माधवच्या घराशेजारीं मालती नांवाची एक मुलगी रहात असे. माधवपेक्षा ती थोडी लहान होती, तरी त्या दोघांची लहानपणापासून गट्टी असे. मालतीच्या बापाला मात्र हें पसंत नव्हतें. तो म्हणे, माधव उनाड मुलगा आहे, त्याची संगत बरी नव्हे. यामुळे माधव तिच्या घरीं जायला भीत असे. पण ती मात्र माधवच्या घरीं जात असे. माधव कालेजांत रहायला गेला तेव्हा ती शाळेंतच जात होती. यामुळे कालेजला सुटी होईल तेव्हाच त्यांच्या गांठी पडत असत. पत्रें पाठवणें कठिण होतें. कारण बाप मालतीचीं पत्रें फोडून पहात असे, आणि एकदां माधवाचें पत्र त्यानें तिला न सांगतांच फाडून टाकलें. यामुळे त्यांची एकमेकांना भेटण्याची उत्कंठा अधिकच वाढत गेली आणि शाळाकालेजांत जाणाऱ्या मुलांवर बाप किती पाळत ठेवणार ? विरोधाने प्रेम वाढतें हें बापाला माहीत नव्हतें. मालती मॅट्रिक झाल्यावर तिचा बाप तिला कालेजांत घालीना. तो म्हणाला, फाजील शिकलेल्या मुलींचीं लग्नें व्हायला कठिण पडतें, तेव्हा एकदा लग्न झालें म्हणजे मग नवऱ्याची खुशी असली तर शीक. मी जास्त शिकवणार नाहीं.

माधव आणि वामन बी. ए. ला बसले तरी तिच्या लग्नाचें कोठें जुळलें नव्हतें. वामनच्या हुशारीमुळे त्याची थोडीबहुत कीर्ति झाली होती, आणि मुलींच्या बापांचा त्यावर डोळा होता. पण तो पडला गरीब. गोविंदरावांना तो कधींच पसंत पडला नसता, पण एका मित्राने त्यांना असें सुचविलें की हा आयू. सी. एस्. होण्यासारखा मुलगा आहे, याला जर तुम्हीं पैसे देऊन

विलायतेला पाठवला तर तो पुढेमागे कलेक्टर होईल, म्हणजे पैसा आणि अधिकार दोन्ही मिळतील. मालतींचें कोठें जुळलें नव्हतेंच, यामुळे शेवटीं त्यांनी वामनपुढे आपली सूचना मांडली, की त्याने बी. ए. झाल्यावरोबर मालतीशीं लग्न करावें आणि मग त्यांच्या पैशानें आय्. सी.एस्. करतां विलायतला जावें.

त्याने नेहमीप्रमाणे माधवचा सल्ला विचारला. माधवला हें ऐकून मोठा धक्का बसला, पण त्याने असा विचार केला की गोविंदरावांच्या संमतीने मालती आपल्याला या जन्मांत मिळणार नाही, आणि संमतीशिवाय लग्न करणें कधी शक्य झालें, तरी बापाची दौलत सोडून तिने आपल्याकडे कां यावें ? आपण वकील झाल्यावर पुढेमागे कदाचित् आपल्याला पैसे मिळतील, पण सध्यां आपल्याजवळ काय आहे ? शिवाय तिने वामनाशीं लग्न करायचें नाकारलें की तिला बापाशी आत्तांच भांडण करावें लागणार, आणि विलायतला जायच्या चालत आलेल्या संधीला आपल्या मित्राला मुकावें लागणार. इतका सगळा विचार करून त्याने वामनला, ही संधि घालवूं नको, असा पोक्त सल्ला दिला.

वामन म्हणाला, पण मुलगी लुळीपांगळी असली तर ?

माधव म्हणाला, त्याची काळजी नको तुला, मुलगी सुंदर आहे.

वामन म्हणाला, अरे चोरा, तुला रे काय माहीत ?

माधव म्हणाला, काय माहीत म्हणजे ? ती माझ्या घराशेजारीं राहते आणि मी तिला लहानपणापासून ओळखतों.

वामन म्हणाला, तुझी शिकस्त आहे बाबा, सगळ्यांच्या तुझ्या ओळखी.

इतक्या अवधींत मालतीने माधवला सगळी हकीकत लिहून माधवच्या आईजवळ संधान बांधून तिच्याच पत्त्यावर उत्तर मागवलें होतें. पण माधव उत्तर कोणत्या तोंडाने लिहिणार ? त्याने उत्तरच लिहिलें नाही आणि मालती त्याच्यावर खूप रागावली आणि बापाने केलेल्या बेताला तिने तावडतोब संमति दिली.

लग्नाच्या वेळीं माधव वरपक्षाकडचा म्हणून राजरोस गोविंदरावांच्या घरीं गेला, पण मालती त्याच्याशीं एक अक्षर बोलेना. लग्न झाल्यावर मालती भयंकर डोकें दुखल्याचें सोंग करून निजून राहिली, ती जेवायला देखील उठली

नाही. विलायतला जाण्यापूर्वी नवराबायकोची एकांतांत गांठ पडूं नये अशीच गोविंदरावांची इच्छा होती, यामुळे त्यांनीही तिला विशेष आग्रह केला नाही. जातांना वामनने आपल्या बायकोचा मधूनमधून समाचार घ्यायला गोविंदरावां-देखत माधवला सांगितलें आणि त्याने कबूल केलें. तो गेल्यावर मात्र गोविंद-रावांनी माधवला बजावून सांगितलें की मालती माझ्या घरीं रहाणार आहे आणि माझ्या घरांत पाऊल ठेवण्याची तुला परवानगी नाही.

तरीपण संधि साधून मालतीला भेटण्याला त्याने बेत केला. इकडे गोविंद-रावांनी नोकरांना सक्त ताकीद दिली की माधवला घरांत घ्यायचा नाही. आपल्या मुलीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता आणि आतां तिचें लग्न करून टाकल्यावर विशेष भ्यायचें कारण नाही अशी त्यांची खात्री होती. शिवाय लग्नाचे वेळीं ती माधवजवळ बोलली सुद्धां नाही हें त्यांनी पाहिलें होतें, आणि ती थोडीशी घाबरट होती आणि म्हणूनच ती मुकाट्याने या लग्नाला कबूल झाली होती हेंहि त्यांना माहीत होतें. त्यांच्या जमिनी बऱ्याच होत्या आणि त्यांसंबंधी कोर्टांत खटले वगैरे असले म्हणजे त्यांना मालतीला एकटी टाकून बाहेरगांवीं जावें लागत असे, तरी ते स्वस्थ चित्ताने जात असत.

अशा एका प्रसंगीं एकदां मालती आपल्या खोलींत निजायच्या तयारींत होती, तों माधव खिडकींतून उडी मारून आंत आला आणि ती घाबरून ओरडणार तों त्याने तिच्या तोंडावर हात ठेवला.

—तूं काय म्हणून आलास येथें ? बाबांनी तुला बंदी केली आहे ना ?

—म्हणून तर खिडकींतून आलों. नाहीतर दरवाजानेच आलों असतों.

—वा ! लाज नाही वाटत आणि सांगायला ?

—अग लाज कसली त्यांत ? तुझी माझी काय ओळख नाही ? आणि पुरुषच लाजायला लागले तरमग बायकांनी काय करावें ?

—चालता हो पाहूं येथून अगोदर. कोणी पाहिलें तर काय म्हणेल ?

—येथे आहे कोण पहायला ? आणि हें पहा, तुझ्या नवऱ्याने मला तुझा समाचार घ्यायला सांगितलें आहे म्हणून मी आलों आहें.

—कांही नको समाचार घ्यायला. मला कांही होत नाही म्हणून कळव जा.

माझ्या पत्राचें उत्तर सुद्धां पाठवलें नाहीस, आणि आतां सगळें होऊन गेल्यावर म्हणे समाचार घ्यायला आलों आहें—इतकें बोलते तों तिला रडें कोसळलें.

—असें काय वरें ?—लहानपणीं ती रडूं लागली म्हणजे तो तिला जवळ घेऊन तिची समजूत करीत असे. या वेळींही त्याला भान न राहून त्याने तिला जवळ घेतली आणि तिचें रडें थोडें कमी झाल्यावर तो म्हणाला, मीं पत्राला उत्तर लिहिलें नाही खरें, पण मीं तुझें कांही वाईट का केलें आहे ? आपलें लग्न होणें शक्य नव्हतें म्हणूनच मी हें जुळवलें.

—शक्य नसायला काय झालें आहे ? पळून जायचें होतेंस मला घेऊन.

—अग माझ्या देखील मनांत अशा कल्पना आल्या नाहीत असें का तूं समजतेस ? पण ते अर्जुनसुभद्रेचे दिवस नाही राहिले आतां. पुढचा कांही विचार नको का करायला ?

यावर ती आणखी रडूं लागली. तिचें समाधान करायला त्याला बराच वेळ लागला आणि नंतर रात्र बरीच झाली म्हणून तो निघून गेला. तो वकिलीचा अभ्यास करीत होता, तेव्हा त्याला सुटी असून गोविंदराव बाहेरगांवीं गेले असले तरच तो तिला भेटत असे. तो बंगला जरा बाजूला होता आणि नोकरांच्या रहायच्या खोल्या वेगळ्या होत्या, यामुळे रात्रीं एकदां सामसूम झालें की नोकर तिकडे फिरकत नसत. आणि शिवाय चोरून भेटायची एकदां संवय झाली की भीति हळूहळू कमी होते. यामुळे ती दोघें निर्धास्तपणें रात्रीं बराच वेळ गप्पा मारीत बसत.

अशा एका प्रसंगीं जवळजवळ मध्यरात्र झाली असतांना गोविंदराव गांवाहून अचानक परत आले. मुलीच्या खोलींत दिवा होता, आणि बोलण्याचा आवाज ऐकूं येत होता. त्यांना संशय येऊन त्यांनी एका नोकराला बरोबर घेतला आणि आपल्या किल्लीने दाराचें आंगचें कुलूप उघडून बिलकूल आवाज केल्याशिवाय आंत जाऊन पाहतात तों खोलीचें दार उघडेंच होतें आणि तीं दोघें एकमेकांच्या जवळ बसून अघळपघळ गप्पा मारीत होतीं. उष्मा असल्या-मुळें दोघांच्याहि अंगावर फारसे कपडे नव्हते आणि जे होते तेहि अस्ताव्यस्त होते. गोविंदरावांना पाहतांच मालती मोठ्याने ओरडली आणि माधव खिड-

कींतून पळून गेला. गोविंदरावांनी त्या दोघांनाहि खूप शिव्या हांसडल्या. ते मुलीला म्हणाले, तूं माझ्या नांवाला काळिमा लावला आहेस. आतां मी सांगतों तें ऐकायचें असलें तर ठीक आहे, नाही तर तूं माझ्या घरांतून आत्तां चालती हो.

तिने घाबरून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागण्याचें कबूल केलें आणि गोविंदरावांनी पोलिसांत तक्रार दिली. माधवने अपरात्रीं घरांत शिरून मुलीवर बलात्कार केला, ती ओरडत होती तें आपण अचानक घरीं आलों तेव्हा ऐकलें, आणि वर जातों तों तो खिडकींतून उडी टाकून पळून गेला, असें त्यांनीं सांगितलें. माधववर तीन गुन्ह्यांचा आरोप होता. परवानगीशिवाय घरांत शिरणें, बलात्कार आणि व्यभिचार. मालतीला बापाविरुद्ध कांही बोलण्याचा धीर झाला नाही, यामुळे बलात्काराची तक्रार तिच्यातर्फे दिली. व्यभिचारासंबंधी तक्रार वास्तविक नवऱ्याने करावी लागते, पण नवरा हजर नव्हता आणि मुलगी बापाच्या ताब्यांत होती, तेव्हा ती तक्रार बापाकडून गेलेली चालली.

वामन जरी आय्. सी. एस्. चा अभ्यास करण्याकरतां गेला होता, तरी त्याने शेवटीं बाकीचे विषय बाजूला ठेवून गणिताचाच अभ्यास करायचें ठरवलें, आणि या सुमाराला तो केंब्रिजच्या बी. ए. च्या परीक्षेला बसला होता आणि थोड्याच दिवसांत निकाल कळणार होता. माधवला पोलिसने पकडून नेल्यावर एका निनांवी मित्राने त्याला सर्व हकीकत तिखटमीठ लावून लिहिली. त्याला खरेंखोटें कांहीच समजेना. बायकोला तो कधीच लिहीत नसे, यामुळे तिचें पत्र येणें शक्यच नव्हतें आणि या वेळीं ती लिहील तरी काय? गोविंदरावांनी पत्र लिहिलें होतें, त्यांत त्यांनी, माधव बदमाष आहे, लहानपणापासूनच त्याचा मालतीवर डोळा होता, मी त्याला घरीं यायची बंदी केली होती, पण मी घरीं नसतांना त्याने संधि साधली, वगैरे लिहिलें होतें. त्याला एकदां वाटे, माधव असें करील कसें? पण त्याला आलेल्या निनांवी पत्रांत लिहिलें होतें की मित्रांच्या ताब्यांत बायका ठेवल्या म्हणजे असेंच व्हायचें. तेव्हा काय सांगावें? असेंहि वाटे. आपल्याला फारसें व्यवहारज्ञान नाही हें जाणून तो प्रत्येक बाबतींत माधवचा सल्ला घेत असे. मग माधवनेच विश्वासघात केल्यावर आतां काय करावें? आतांपर्यंत त्याने

असल्या बाबतींत कधी विचारच केला नव्हता, पण आतां त्याला विचार करणें भाग पडलें. •शिवाय आतां अभ्यासहि नसल्यामुळे विचार करायला वेळहि पुष्कळ होता, तेव्हा त्याने दोन दिवस आणि दोन रात्री विचारांत घालवल्या.

हें सर्व खरें असेल काय ? मालतीची आणि माधवची लहानपणापासून ओळख होती हें त्यानेच आपल्याला सांगितलें होतें. त्यांचें प्रेमहि होतें काय ? मग हें लग्न त्याने कसें होऊं दिलें ? यांत त्याचा काय फायदा झाला ? त्यांत कोणाचा फायदा झाला असला तर तो आपलाच. नाहीतर आपल्याला विलायतेला यायला कसें सांपडलें असतें ? यांत आपली कांही चूक झाली काय ? आपण पैशाकरतां एका अनोळखी मुलीशीं लग्न केलें, तिची आपली अजूनही धड ओळख नाही. ती लहानपणापासून माधवची मैत्रीण, आपल्याला काय हक्क होता तिच्याशीं लग्न करायचा ? तिची संमति आहे की नाही हें देखील आपण पाहिलें नाही. बाप तिच्या संमतीशिवाय कसें लग्न लावून देईल ? एवढ्यावरच तिची संमति गृहीत धरली. माधव बदमाष आहे असें त्याचें मन त्याला सांगेना. माधव उदार आणि दिलदार आहे असा त्याचा अनुभव होता. तो एकदम इतका बदलेल काय ?

पुरा विचार केल्यावर त्याने असें ठरवलें की माधववर केलेले आरोप खरे असण्याचा फारसा संभव दिसत नाही, पण त्याचा विचार न करतां, कांहीं झालें तरी आपल्याला शक्य तर त्याला बचावला पाहिजे, असें ठरवून तो कोणालाही कांही न कळवतां पुढच्याच बोटीने परत आला, आणि त्याने आपल्या एका बॅरिस्टर मित्राचा सल्ला घेतला. बचावाचा मार्ग नक्की करून आणि गोविंदराव घरीं नाहीत अशी संधि पाहून तो मालतीला भेटायला गेला. विलायती पोशाखांत मालतीने त्याला ओळखणें शक्यच नव्हतें, तेव्हा त्याला आपली ओळख द्यावी लागली. मालती थोडीशी घाबरली असें पाहून तो म्हणाला, घाबरायचें कारण नाही. माधव माझा मित्र आहे आणि तो कोणावरहि बलात्कार करील हें मला खरें वाटत नाहीं, पण आरोप खोटे असले तरी कोर्टांत ते एखादे वेळीं सिद्ध व्हायचा संभव असतो, तेव्हा त्यांतून त्याचा अजीबात बचाव होईल अशी तजवीज केली पाहिजे आणि यांत मला तुमची मदत पाहिजे आहे.

—आपण सांगाल तसें वागायला मी तयार आहें.—यांत निदान बलात्कार

असणें शक्य नाँही अशी वामनची खात्री झाली.

—तरमग असें करायचें. तुम्ही त्याला बोलावल्यावरूनच तो तुम्हाला भेटायला आला होता असें तुम्ही म्हटलें पाहिजे. आतां मी येथें आहें, गोविंदरावांची तुम्हाला भीति नको. तुम्हीं असें सांगितलें म्हणजे घरांत शिरल्याचा आरोपहि टिकणार नाही, आणि बलात्काराचाहि टिकणार नाही. कारण तो आरोप खोटा असेंहि तुम्हाला सांगतां येईल. राहतां राहिला व्यभिचाराचा आरोप. हा आरोप मी येथें नसतांना गोविंदरावांनी माझ्या मताविरुद्ध केलेला आहे, मला तसा आरोप करायचा नाही, असें मीं सांगितलें म्हणजे ही सगळी भानगड मिटेल. इतकें करायला तुमची तयारी आहे?

—हो, आहे.

त्याप्रमाणे सर्व व्यवस्था होऊन माधवविरुद्ध सर्व तक्रारी काढून टाकाव्या लागल्या, आणि गोविंदराव चुरमुरे खात बसले. इकडे वामन रँग्लर झाल्याची बातमी आली होती, आणि त्याला विलायतेंतच एक शिक्षकाची जागाहि मिळत होती. तेव्हा त्यानें मालतीला आणि माधवला कायमचा निरोप दिला आणि सांगितलें, लग्न करतांना मीं जी मोठी चूक केली, ती आतां शक्य तितकी दुरुस्त करणें मला भाग आहे. मी यापुढें हिंदुस्थानांत परत येणार नाही, आणि तुम्हाला दोघांना एकत्र रहायला माझी पूर्ण परवानगी आहे. म्हणजे मध्यरात्री भेटायला जायचें कारण रहाणार नाही.

माधव म्हणाला, म्हणजे तूं असें समजतोस की काय......?

वामन म्हणाला, मी कांहीं समजत नाही, आणि सगळें समजतों. मी तुम्हाला कोणत्याही प्रकारचा दोष देत नाही, पण मला जी व्यवस्था करायची ती केली पाहिजे. चूक माझी आहे, आणि यांत मी कांहीं मोठासा स्वार्थत्याग करतों आहें असेंहि नाही. तुम्ही लोकापवादाला बिलकुल भीक घालूं नका आणि खुशाल एकत्र रहा.

तिघांच्याहि डोळ्यांत पाणी आलें. गोविंदराव तेथे असते तर मूर्च्छित पडले असते, पण सुदैवाने ते तेथे नव्हते.

( जुलै १९३९ ).

# झोपेचें औषध

एका वर्षापूर्वी वडील वारल्यामुळे प्रभाकरच घरचा मालक झाला होता. घर बरेंच मोठें होतें आणि त्याचा बराच भाग भाड्याने दिलेला असल्यामुळे त्यांतच त्याचा खर्च भागत होता. तेव्हा तो बी. ए. झाला होता तरी नोकरीच्या किंवा आणखी शिक्षणाच्या भानगडींत पडला नाही. त्याची विधवा बहिण गोद त्याच्याकडेच होती आणि त्याला दुसरें कोणीहि नव्हतें. तिचें लग्न लहानपणींच झालें होतें आणि तिला एक मूलहि झालें होतें, पण लग्नापासून एका वर्षाच्या आंतच नवरा आणि मूल दोन्हीहि वारल्यामुळे, आणि सासरची स्थिति बरी नसल्यामुळे, ती घरीं परत आली होती. तिच्या मनांत कदाचित् एखादे वेळीं पुनर्लग्नाचा विचार येऊन गेला असला तरी त्या कुटुंबांत जुन्याचें राज्य असल्यामुळे तो विचार दुसऱ्या कोणाच्या मनांत येणें शक्य नव्हतें. ती घरीं असल्यामुळे प्रभाकराची जेवणाची सोय आयतीच झाली होती, तेव्हा त्याच्या तरी मनांत तें कसें येईल? अर्थात् स्वयंपाकी ठेवतां आला असता, पण नोकराच्या हातचें जेवण त्याला पसंत नव्हतें. आणि हक्काची विधवा बहिण असतांना नोकराच्या हातचें काय म्हणून जेवावें? इतर सर्व सोयी शहरांत असतातच, तेव्हा त्याला लग्न करण्याची घाई नव्हती.

घराच्या वरच्या मजल्यावर तो रहात असे. पूर्वी सर्वच मजला त्यांच्याकडे असे, पण वडील वारल्यावर त्यांतली निंमी जागा त्याने भाड्याने दिली होती, आणि तेथलें जुनें बिऱ्हाड जाऊन नुकतेंच एक विवाहित जोडपें रहायला आलें होतें. विभावरी नारायणरावांची दुसऱ्या लग्नाची बायको. तिचें वय होतें सतरा वर्षांचें आणि नारायणरावांचें होतें चाळीस वर्षांचें. विभावरी चांगली मॅट्रिकपर्यंत शिकलेली होती, तेव्हा तिने अशा लग्नाला कशी संमति दिली याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. शेवटीं तिने पैशाकरतां हें लग्न केलें असावें असेंच लोकांनी ठरवलें, आणि तें फारसें चूकहि नव्हतें. नारायणराव देखणा मनुष्य होता आणि विभावरीहि दिसायला वाईट नव्हती. तथापि नारायणरावांना ती पोरकट वाटत असे

आणि तिला ते पोक्त वाटत असत. तिला सिनेमाला जावेंसें वाटलें तर ते म्हणत मला नाहीं एकसारखें सिनेमाला जायला आवडत.—उलटपक्षीं ते तिला तत्वज्ञानाचे धडे देऊं पहात, त्यांत तिलाहि स्वारस्य वाटत नसे. तरीपण त्यांचें भांडण नव्हतें, दोघेंहि चालवून घेत होतीं.

एकदां असें झालें की विभावरी जिना चढत असतांना घसरली. पण सुदैवाने प्रभाकर मागेच होता, त्याच्या अंगावरच ती पडली, आणि ती इतकी अकस्मात, की स्वतःला सांवरून तिला आधार देण्याकरतां त्याला प्रथम एक पाय खालच्या पायरीवर टाकून, मग तिला वर ढकलून सरळ उभी करावी लागली. या अंगस्पर्शाचा परिणाम दोघांवरहि झाला. ती प्रथम घाबरून 'अगबाई!' म्हणाली, पण मग आभार मानण्याकरतां मागे वळली तों जवळ जवळ तोंडाला तोंड लागलें, तेव्हा ती लाजून कांहीं न बोलतां पळून गेली. यानंतर त्यांची ओळख बरीच दाट झाली आणि ती प्रथम जरी त्याच्याजवळ बोलायला लाजत होती, तरी कांही दिवसांनी धीर चेपून परस्पर स्नेह उत्पन्न झाला. तथापि ती त्याच्या घरीं सहसा जात नसे, किंवा गेलीच तर गोदू घरीं नसेल अशा वेळीं जात असे.

वरील प्रकारानंतर कांही दिवसांनी एकदां नारायणराव घरीं आले तों दाराला कुलूप. शेजारीं किल्ली देऊन ठेवली असेल म्हणून विचारायला आंत जातात तों आंत कोणीच दिसेना. एकदम फार आंत जाणें बरें नव्हे म्हणून, घरांत कोण आहे हो ? म्हणून विचारलें, तरी कोणी उत्तर देईना. तेव्हां ते आणखी आंतपर्यंत गेले, तों नळाच्या खोलींत गोदू बेशुद्ध पडलेली दिसली. गोदू चांगली गोरी आणि सुस्वरूप होती आणि तिचे कपडे अस्ताव्यस्त झालेले होते. तरीदेखील त्या चित्राकडे पहात बसण्याचा मोह आवरून त्यांनी तिला उचलून आणून बिछान्यावर ठेवली, तोंच ती जागी झाली. तिला मधूनमधून असे झटके येत असत, तेव्हा काय प्रकार झाला असावा हें तिने ताडलें. नारायणराव म्हणाले, माझ्या दाराला कुलूप होतें, तेव्हा म्हटलें किल्ली इकडे असेल, म्हणून पहायला आलों तों आपण बेशुद्ध पडलां होतां. तेव्हा उचलून आंत आणून ठेवलें.

तिने हंसूनच आभार मानले आणि म्हणाली, किल्ली आहे, पण आतां चहा

घेऊनच जा. दादाला आज उशीर होणार आहे आणि विभावरीबाई एका मैत्रिणीकडे गेल्या आहेत.

चहा घेतां घेतां तिने सांगितलें, मला असेच मधून मधून झटके येतात. औषधांचा कांही उपयोग होत नाही, तेव्हा कंटाळून सोडून दिलीं.

चहा आणि थोड्याशा गप्पा झाल्या, तरी त्या दोघांपैकी कोणीच घरीं येईना, तेव्हा नारायणराव म्हणाले, चौपाटीवर फिरायला येतां कां ? जरा मोकळी हवा मिळाली तर तुमची प्रकृति चांगली राहील. माझ्या ओळखीचा एक चांगला डाक्टर आहे, त्याला प्रकृति दाखवा तुम्ही एकदां. नाही होय करीत तीं दोघें चौपाटीवर गेलीं.

तीं गेल्यावर विभावरी घरीं आली आणि प्रभाकर किंचित् मागून आला आणि आपल्या दाराला कुलूप पाहून तिच्याकडेच बसला. तो म्हणाला, हीं दोघेंहि आपल्यासारखींच कोठे गेलीं नाहींत ना ?

विभावरी म्हणाली, मी नाहीं पुनः येणार. मला भीति वाटते.

प्रभाकर म्हणाला, त्यांत भीति काय वाटायची आहे ? तुम्हाला एकट्यांना सिनेमाला जायची परवानगी आहे की नाही ?

विभावरी म्हणाली, हो, ते म्हणतात मला नाही सिनेमा आवडत, तूं हवी तर एकटी जात जा.

प्रभाकर म्हणाला, मग झालें तर. तुही एकट्या जा, आणि मला आधी सांगून ठेवलेंत म्हणजे मी तेथे येईन. तेथे अकस्मात् भेटल्यावर एकत्र बसायला काय हरकत आहे ?

विभावरी म्हणाली, पण कोणीं पाहिलें म्हणजे ?

प्रभाकर म्हणाला, वा ! पाहील कोण कसा अंधारांत ?

विभावरी म्हणाली, पण अंधार कांही एकसारखा नसतो. आरंभाला आणि मधें तर उजेड असतो ?

प्रभाकर म्हणाला, असला तर असला. मुंबईला कांही वायकांच्या वेगळ्या

लागत नसतात. एखादे वेळी अनोळखी बाई देखील शेजारीं बसेल, मग ओळख असल्यावर कां बसूं नये ?

विभावरी म्हणाली, हो, पण अनोळखी बायका कांही पुरुषांशी गप्पा नाही मारीत.

प्रभाकर म्हणाला, बरें तर आपण देखील अगदी गप्प बसूं. बोलायलाच पाहिजे असें नाही कांही.—त्या दिवशीं तें तितकेंच राहिलें.

नारायणरावांनी एकदा गोदूला आपल्या एका ओळखीच्या डाक्तराकडे नेलें आणि त्याचा सल्ला विचारला. डाक्तरने सामान्य तपासणी करून आणि कांही प्रश्न विचारून सांगितलें, आमची मोठी पंचाईत होते, नारायणराव. खरें सांगावें तर तें लोकांना पटत नाही.

नारायणराव म्हणाले, सांगा तर खरें. पटेल की नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

डाक्तर म्हणाला, तर मग माझें मत असें आहे की यांनी लग्न केलें तर यांची प्रकृति सुधारेल.

डाक्तरची फी नारायणरावांनीच दिली आणि तीं घरीं आलीं. गोदू वाटेंत म्हणाली, हें आपलें डाक्तरांचें कांही तरीच. मला नाहीं असें वाटत.

नारायणराव म्हणाले ' हें पहा, तो हुशार डाक्तर आहे. तो म्हणतो त्यांत कांही तरी तथ्य असलें पाहिजे असें वाटतें मला.

गोदू म्हणाली, पण जें शक्यच नाही त्याचा विचार तरी कशाला करा उगीच ?

नारायणराव तिच्या पाठीवर हात फिरवून म्हणाले, पहा बुवा. तुम्ही आपला विचार करा, पण प्रकृति बिघडूं देणें बरें नाही. कांही तरी तोड काढा.

यांतल्या एकाहि जोडीचे परस्पर व्यवहार दुसऱ्या जोडीला माहीत नव्हते, आणि कसे असणार ? मनुष्य जेव्हा आपल्याच बेतांत दंग असतो, तेव्हा त्याला दुसरीकडे लक्ष द्यायला फुरसत नसते. नाहीतर या सर्वांना जर एकमेकांचे बेत कळते तर सर्वांनाच धक्का बसला असता. पण या चौघांच्याहि मनांत प्रेम उत्पन्न झालें होतें, आणि प्रेमाने मनुष्य इतर गोष्टींचे बाबतींत

आंधळा होतो. चोरून भेटण्याने आणि बोलण्यानें यांपैकी कोणाचेंच समाधान होईना. चोरून भेटण्याने मनसोक्त बोलायला देखील सांपडेना, मग इतर गोष्टी बाजूलाच राहिल्या.

यांपैकी प्रभाकर सर्वांत अधिक उतावळा झाला होता. सिनेमांत अंधार असतो खरा, पण तो त्याला पुरेसा वाटेना. शेवटी बराच विचार केल्यावर त्याला एक युक्ति सुचली. तो एका ओळखीच्या वैद्याकडे गेला, आणि म्हणाला, मला हल्ली चांगलीशी झोप येत नाही. अगदी गाढ झोप लागेल असें एखादें औषध द्या !

वैद्याने दिलेली पुडी प्रभाकर घेऊन आला आणि संधि साधून ती विभावरीला देऊन म्हणाला, आपल्याला मनसोक्त भेटायला सांपडेल अशी एक युक्ति काढली आहे. तूं म्हणतेस तुला चोरून भेटायला आवडत नाही म्हणून. या पुडींत झोपेचें औषध आहे. हें नारायणरावांना विड्यांतून दिलेंस म्हणजे त्यांना अगदी गाढ झोप लागेल. झोप लागली म्हणजे तूं हळूच आमच्याकडे ये. आमची पाहुण्यांची खोली तुला माहीतच आहे, तेथें पलंगावर अंथरूण नेहमीच घातलेलें असतें. बोललें नाही म्हणजे कोणाला समजायचें नाही.

विभावरी म्हणाली, पण या औषधाने कांही भलतेंच नाही ना व्हायचें ?

प्रभाकर म्हणाला, छे, छे ! मी असें भलतेंच कसें करीन ? झोप लागण्यापलीकडे कांही व्हायचें नाही.

इतकें म्हणून तो बाहेर पडतो तों नारायणराव घरीं आले आणि त्यांनी ती पुडी पाहिली. ते म्हणाले, हें काय आहे ?

विभावरी म्हणाली, मला अलीकडे चांगलीशी झोप येत नाही, म्हणून प्रभाकरपंतांच्या ओळखीच्या एका वैद्याकडून झोपेचें औषध मागवलें होतें. तें त्यांनी आणून दिलें.—खोटें बोलणारांनी नेहमी एक गोष्ट लक्षांत ठेवावी की मुख्य मुद्याखेरीज बाकीच्या अवांतर गोष्टी नेहमी खऱ्या सांगाव्या, म्हणजे असत्य ओळखणें तितकें कठिण होतें. विभावरी खोटें बोलण्यांत चांगलीच वाकबगार झाली होती हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

नारायणरावांना वाटलें हें अनायासें आपल्या पथ्यावरच पडलें. गोळुला

मनसोक्त कसें भेटावें याची युक्ति ते शोधीत होते. ती आयतीच चालून आली. त्यांनीहि त्याच दिवशी गोदूला एकटी गांठून तिला आपली युक्ति सांगितली. ते म्हणाले, विभावरीने आयतेंच औषध आणलें आहे. तिला चांगली झोप लागली, की मी हळूच तुमच्या पाहुण्यांच्या खोलींत मुकाट्याने येईन. बोललें नाही म्हणजे कशाने समजतें आहे दादाला ?

ती म्हणाली, मला बाई भीति वाटते.

ते म्हणाले, तुला कसली भीति वाटते ? तूं तर आपल्या घरांतच असशील.– शेवटी तिनेहि रुकार दिला.

विभावरीने झोपेचें औषध नारायणरावांच्या विड्यांत घालून तो नेहमी-प्रमाणें त्यांच्या पानाजवळ ठेवला. जेवण झाल्याबरोबर विडा खात खात ते म्हणाले, तूं आपलें औषध घेतलेंस का ? नाहीतर विसरशील.

ती म्हणाली, घेईन मग.

नारायणराव म्हणाले, छे, छे, तसें नाही चालायचें. आत्तां माझ्यासमोर घे. झोप आली नाही म्हणजे तूं पडशील आजारी, आणि मला त्याचा ताप होईल. आण लवकर, मला पाहूं दे.–विभावरीचा नाइलाज झाला. औषध त्यांच्यासमोर घेणें भाग पडलें.

प्रभाकरकडचे दिवे मालवले. तो विभावरीची वाट पाहून कंटाळला आणि शेवटीं त्याने तिची पाहुण्यांच्या खोलींत अंथरुणावरच वाट पहायचें ठरवलें. तो म्हणाला, औषध असावें तितकें चांगलें नाही असें दिसतें. अजून कशी झोप लागली नाही ?

पाहुण्यांच्या खोलींत कोणीतरी गेल्याची चाहूल लागल्यावर लगेच गोदूहि तेथे गेली. कोणीहि बोललें नाही......

थकल्यामुळे दोघांनाहि गाढ झोप लागली. पहाटेच्या अंधुक उजेडांत दोघें जागीं होऊन एकमेकांना ओळखल्यावर त्यांची काय स्थिति झाली असेल याची कल्पना वाचकांनीच करावी !

(आगस्ट १९३९)

# विवाहाचें सुख

आम्ही चारपांच जण मुरलीधराच्या गाळ्यांत गप्पा मारीत बसलों होतों. आम्ही सगळे बरोबरच झेविअर कालेजांतून बी. एस् सी. झालों आणि आमची इतकी गट्टी होती की आम्ही एकमेकांना पहिल्या नांवानेच हांक मारीत असूं आणि अरेतुरे म्हणत असूं. मुरलीधर श्रीमंत होता, तेव्हा तो पुढे मेडिकल कॉलेजांत जाऊन नुकताच डाक्तर झाला होता. यामुळे त्याने अजून लग्न केलें नव्हतें, पण बाकीच्यांना नोकऱ्या मिळून आम्ही लग्न करून केव्हांच संसाराला लागलों होतों. आमच्यापैकीं एक मात्र बेकार होता, तरीहि त्याने लग्न केलें आणि त्याला दोन मुलेंहि झालीं होतीं. अशा स्थितींत मुरलीधर एकटाच अविवाहित कोण राहणार, असें आम्हांला वाटणें साहजिक होतें आणि आम्ही एकत्र जमलों म्हणजे तो विषय निघाल्याशिवाय रहात नसे.

—मुरलीधर, हें आतां बस झालें. लग्न कधी करतोस सांग. करीत असलास तर बोल, म्हणजे माझी एक वहिण आहे लग्नाची, तिला दाखवायला आणतों. अगदी माझ्यासारखीच सुंदर आहे, मी म्हणालों.

—हंः ! दाखवायला आणतों म्हणे ! काय दाखवणार रे ! मुरलीधर म्हणाला.

—काय दाखवणार म्हणजे ? लोक दाखवतात तें. मी म्हणालों.

—म्हणजे चेहरा, कपडे आणि हातपाय. एवढें पाहून मी लग्न करावें असें तुझें म्हणणें ! मुरलीधर म्हणाला.

—मग तुला काय नागवी करून दाखवायला पाहिजे ? तें नाही जमायचें बुवा ! तुझे आपलें हें कांहीतरीच आहे. मी म्हणालों.

—अरे नागवी करून दाखवलीस तरी सुद्धां पुरणार नाही. समज तुला घर विकत घ्यायचें असलें, तर तूं काय त्याचा वरचा मजला आणि रंग पाहून घेशील वाटतें ? मुरलीधर म्हणाला.

—आतां मात्र माफ करा हां ! आतां आपण फार वहावलांत. अरे लग्न करायचें म्हणजे कांही मुलगी विकत घ्यायची नाही. अशा पवित्र गोष्टीची तूं

घराच्या सवदाशीं तुलना करतोस, तेव्हा काय म्हणावें तुला ? मी म्हटलें.

—विकत घ्यायची नाही तर काय ? म्हणजे तूं तिचे पैसे घेणार नसशील, पण माझे तर पैसे खर्च होतात ना ? शिवाय घर विकत घेतलें आणि मागून तें बरें वाटलें नाही तर विकून टाकतां येतें. पण बायको एकदां गळ्यांत पडली की पडली. ती विकून टाकतां येत नाही, कोणाला देऊन सुद्धां टाकतां येत नाही. बरें, तिला पोटगी देऊन दुसरी बायको केली, तरी लोक शंख करतात. तिचा खून केल्याशिवाय त्यांतून सुटका नाही. तो एक रामबाण उपाय आहे, फाशी गेलें तरी निदान बायकोच्या तावडींतून सुटतो मनुष्य. पण आमच्यासारख्याच्या हातून तेंहि व्हायचें नाही, मुरलीधराने व्याख्यान दिलें.

—अरे आज तुला झालें आहे काय ? आम्हीं लग्नें केलीं ते काय सगळे मूर्ख वाटतें ? अनंत म्हणाला.

—तें आपलें तुमचें तुम्ही पहा. आपण कशाला कोणाला मूर्ख म्हणा ? मुरलीधर म्हणाला.

—मग तुझें म्हणणें काय तें तरी ऐकूं दे एकदां. अगोदर ओळख व्हायला पाहिजे असली...मी म्हणत होतों, तोंच

—तर तूं एकदां चहाला बोलावशील, फारतर जेवायला बोलावशील. असेंच की नाही ? मुरलीधर म्हणाला, ही ओळख करायची रीत !

—अहो विद्वान, या बाबतींत आपली स्वतःची काय कल्पना आहे ती ऐकायची आम्हाला उत्कंठा लागून राहिली आहे. आतां कोणी मधें बोलूं नका रे, प्रभास म्हणाला.

—निजून पाहिल्याशिवाय लग्न करूं नये असें माझें ठाम मत आहे. मुरलीधर म्हणाला.

—अरे ए ! कोणी ऐकलें तर तुझ्यावर अश्लीलतेबद्दल खटला होईल हां ! अनंत म्हणाला.

—बोललास मधें ! त्याला सांगूं दे काय तें. प्रभास म्हणाला.

—मी आपलें मत सांगितलेंच आहे. ते तसें कां झालें म्हणाल तर तुम्हाला एक घडलेली हकीकत सांगतों, मुरलीधर म्हणाला. श्रीधरची आणि

ताराची लग्नापूर्वी पुरीं दोन वर्षें ओळख होती. म्हणजे नुसती तोंडओळख नव्हे हां ! ती दोघें फिरायला बरोबर जायचीं, टेनिस खेळायचीं, पोहायला जायचीं. दोन वर्षांच्या ओळखीने त्यांनी लग्न करायचें ठरवलें. त्यांतल्या त्यांत ताराचाच आग्रह जास्त दिसला. म्हणजे श्रीधरला ती आवडत नव्हती असें नाही, पण तो पडला भिडस्त मनुष्य. त्याने आपण होऊन कधी तिला विचारलें असतें असें मला वाटत नाही. पण तिने तें आईबापांकडून त्याला विचारवलें आणि तें लग्न झालें. सामानसुमान खरेदी करतांना हल्लीच्या पद्धतीप्रमाणे श्रीधरने दोन लहान पलंग घ्यायचें ठरवलें, पण ताराला तें पसंत नव्हतें. ती म्हणाली, मी नाही जा ! तुमचें माझ्यावर प्रेमच नाही मुळी !—आणि ती जवळजवळ रडायच्या बेतांत आली. श्रीधर पडला भिडस्त. विचारा शेवटपर्यंत बायकोला अहोजाहो म्हणत होता. तो काय तिचें मन मोडणार ? त्याने एक भला मोठा पलंग घेतला, आणि एकंदर सगळें तिच्याच कलाने झालें. त्यांचें बिऱ्हाड थाटल्यावर त्यांनी कांही निवडक मित्रांना एक मेजवानी दिली. त्यांत मी होतों. तारा फार सुंदर होती, तिला पाहून कित्येक मित्रांना श्रीधरचा हेवा वाटला. तशीच ती प्रेमळ होती हें मीं सांगितलेंच आहे. अशा स्थितींत श्रीधरला सुखी व्हायला कांही अडचण होती ? पण पाहतों तों लग्नानंतर थोड्याच दिवसांनी त्याची प्रकृति बिघडली आणि ती कांहीं केल्या ताळ्यावर येईना. प्रथम आम्हाला वाटलें, आहे, नवीन बायको आहे, सुंदर आहे, तरुण मनुष्याच्या हातून थोडाबहुत अतिरेक होणें साहजिक आहे. कांही दिवसांनी प्रकृति सुधारेल. पण छे ! तो अधिकअधिक खंगत चालला. आम्हीं एकदोघांनी त्याला उपदेश करायचा प्रयत्न केला, की मनावर थोडा ताबा ठेवावा, द्राक्षांची पाटी हाताशीं असली म्हणून अजीर्ण होईपर्यंत खाऊं नये, थोडा विवेक करावा, पण उपड्या घड्यावर पाणी ! त्याचा कांहीएक परिणाम झाला नाही. तो आम्हाला कांही बोलला नाही की आमच्यावर रागावला नाही. तो रागावणारा मनुष्यच नव्हे, अतिशय गोडा मनुष्य. तो इतकेंच म्हणाला, पाण्यामध्यें मासा झोप घेई कैसा । जावें त्याच्या वंशा तेव्हा कळे. तुम्हाला तें कळायचें नाही आणि कळावें अशी माझी इच्छाहि नाही.

त्याचा चेहरा पाहून आम्हाला मरणप्राय दुःख झालें आणि हा आतां फार दिवसांचा सोबती नाही अशी आमची खात्री झाली. एका सुटींत त्याला बायको-पासून वेगळा करण्याकरतां त्याला एकट्याला आम्ही आपल्याबरोबर कोठें तरी घेऊन जायचा बेत केला. पण छे! तारा त्याला जाऊं देईना. अतिशय प्रेमळ बायको. तो तरी तिच्या मनाविरुद्ध तिला कसा सोडणार? एकदां ती आजारी पडली, आणि श्रीधरला काम संभाळून तिची शुश्रूषा करणें शक्यच नव्हतें, तेव्हा तिला माहेरीं पोंचवावी लागली. तेव्हा मात्र श्रीधरची प्रकृति तावडतोब सुधारली, कारण मूळची प्रकृति चांगली. तेव्हा आम्हीं त्याला पुनः सांगितलें की पहा, गृहस्था, कांही विचार कर. बायको आठ दिवस माहेरीं गेल्याबरोबर तुझी प्रकृति सुधारते, आणि ती जवळ असली की तूं आजारी पडतोस! तूं आपला स्वतःचा अशा तऱ्हेने नाश करून घेतो आहेस, हें आम्हाला पाहवत नाही.—तो इतकेंच म्हणाला की मी तुम्हाला काय सांगूं? मला आजारी पडावें असें का वाटतें? पण माझा कांही इलाज नाही.

त्याची बायको बरी होऊन आली आणि तो पुनः आजारी पडला. त्याला आफिसांत पगार कांही वाईट नव्हता, पण याला आफिसांत जर झोप येऊं लागली, तर वरच्या साहेबाने तरी काय करावें? प्रथम साहेबाची त्याच्यावर मर्जी असे, पण तो काम करायच्या ऐवजी टेबलाशीं जर पेंगूं लागला तर ती मर्जी टिकावी कशी? इतर कारकुनांनाहि तो आवडत असे, आणि ही गोष्ट साहेबाच्या नजरेला येऊं नये म्हणून त्यांनी त्याला शक्य तितकी मदत केली. पण साहेब कांही आंधळा नव्हता. शेवटीं व्हायचें तेंच झालें. त्याला तंबी मिळाली की कामांत सुधारणा झाली नाही तर नोकरीवरून काढून टाकावें लागेल. साहेबाला त्याने नम्रपणाने सांगितलें की मी आपल्याकडून प्रयत्न करतों, पण माझी प्रकृति नीट नाही. साहेब म्हणाला, औषध घ्या, जागरणें कमी करा, म्हणजे आफिसांत झोप नाही येणार. तो 'बरें' म्हणून हिरमुसलें तोंड करून आपल्या जागेवर गेला.

हीहि हकीकत आम्हाला त्याच आफिसांतल्या दुसऱ्या एका मनुष्याकडून कळली. पण आम्ही तरी काय करणार? दुसऱ्याला उपदेश किती करायचा

याला देखील कांही मर्यादा आहे ! तेव्हा, काय होईल तें होईल, त्याचें नशीब आणि तो, असें म्हणून स्वस्थ बसण्याखेरीज आम्हाला गत्यंतर नव्हतें.

पण त्याचें नशीब आम्हाला वाटलें तितकें वाईट नव्हतें. एका टायफॉइडच्या सांथींत त्याची बायको मेली आणि त्यानंतर कांही महिन्यांत श्रीधर खडखडीत बरा झाला, आफिसांत काम उत्तम करूं लागला. हा फरक पाहून साहेब इतका खुष झाला की त्याने त्याला बढती दिली. त्या बढतीच्या खुषींत त्याने आम्हाला एक मेजवानी दिली. बायकोला मरून आतां एक वर्ष झालें होतें, आणि त्याच्या चेहऱ्यावर दुःखाचा मागमूसहि दिसत नव्हता. त्याचा चेहरा अगदीं प्रफुल्ल दिसत होता. तो विशेष खुषींत आहे असें पाहून आमच्यापैकी एकाने त्याला हळूच विचारलें, आतां पुनः लग्न करायचा विचार आहे की नाही ?

तो म्हणाला, माफ करा महाराज ! एका लग्नाचा अनुभव मिळाला तितका पुरे.

—पण आम्हाला तर वाटलें होतें...आम्ही सगळे एकदम म्हणालों.

—तुमची कल्पना चुकीची होती. तुम्ही मला स्त्रीलंपट समजत होतां, पण माझी प्रकृति बिघडण्याचें खरें कारण म्हणजे माझी बायको झोपेंत अतिशय मोठ्याने घोरत असे आणि त्यामुळे मला झोप येत नसे. हें मी तिलाहि कधी सांगितलें नाही आणि ती जिवंत असती तर तुम्हालाहि सांगितलें नसतें. वेगळ्या अंथरुणावर सुद्धां निजायची तिची तयारी नव्हती, ती वेगळ्या खोलींत कशी निजणार ? तसें कांहीं म्हटलें की ती म्हणे तुमचें माझ्यावर प्रेमच नाही. म्हणूनच ती माहेरीं गेली तेव्हां माझी प्रकृति सुधारली. पण तुम्ही त्याचा अर्थ वेगळाच केलात. अर्थात् खरें कारण तुम्हाला कळणें शक्यच नव्हतें.

आम्ही त्याची मनापासून माफी मागितली आणि म्हटलें, पण असा कसा रे तूं ? तिला एकदां सांगून टाकूं नये खरें कारण ?

तो म्हणाला, हें पहा, हा माझा स्वभाव आहे. त्याला कांही औषध नाही. तुम्ही मात्र यापासून धडा घ्या. कितीहि ओळख असली तरी निजून पाहिल्याशिवाय लग्न करणें बरें नव्हे !

—अतो ऽ हं ब्रवीमि......हकीकत संपवून मुरलीधर म्हणाला.

—तो एक सौजन्याच्या अतिरेकाने मरत होता. तूं कांही तसा नाहीस, तुला तशी भीति नाही. मी म्हणालों.

—अरे ही एक बाब झाली. अशा आणखी अनेक गोष्टी असतात, की त्या प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कळत नाहीत. त्यांचें काय ? मुरलीधर म्हणाला.

—तें मागून पाहूं. तूं उद्यां चहाला तर ये. माझ्या वहिणीला पाहिलीस म्हणजे तूंच मागे लागशील माझ्या. मग हें सगळें राहील बाजूला तत्वज्ञान. मी त्याचा पिच्छा सोडला नाही.

—तसें झालें तरी तो अविचारच होईल एकंदरींत, पण चहाला कांही हरकत नाही माझी. लग्नाचें मग पुढें पाहूं. लग्न करणें कांही एकंदरींत बरें नाही, मुरलीधर म्हणाला. (आक्टो. १९३९)

---

# जगाचा अनुभव

नंदाचें नुकतेंच ज्यूनिअर बी. ए. चें वर्ष संपलें होतें आणि परीक्षा लांब असल्यामुळे सुटींत अभ्यास करायचें मुळीच कारण नव्हतें. त्याच्या बापाने नुकतेंच दुसरें लग्न केलें होतें आणि घरीं दुसरें कोणीच नव्हतें, तेव्हा सुटी झाल्याबरोबर घरीं त्याची कोणीहि वाट पहात नव्हतें. तेव्हा घरीं जाण्यापूर्वी थोडे दिवस मुंबईला जाऊन जिवाची मुंबई करण्याचें त्याने ठरविलें. तसा तो मुंबईला मुळीच गेला नव्हता असें नाही, पण एकदांच कांही मित्रांबरोबर गेला होता, आणि त्यामुळे त्याला स्वतःला मनसोक्त हिंडायला मिळालें नव्हतें, कारण काय करायचें, कोठें जायचें, तें बहुमताने ठरे. बाप भरपूर पैसे पाठवीत असे, यामुळे तीहि अडचण नव्हती.

त्याला कादंबऱ्या वाचण्याचा नाद होता आणि यामुळे प्रेमाबद्दल त्याच्या आकांक्षा बऱ्याच वाढल्या होत्या. त्याचप्रमाणे कामविषयक कुतूहलहि वाढलें

124315

होतें. त्याचे कांही मित्र त्याला या दोन्ही बाबतींत स्वानुभव सांगत, पण ते खरेच होते की बनावट गोष्टी होत्या याचा त्याला अंदाज लागेना. त्यांत कधी अविवाहित मुलींचा संबंध असे तर कधी विवाहित स्त्रियांचाहि असे. स्त्रियांना यापासून धोका असतो इतकें ज्ञान त्याला होतें, तेव्हा विवाहित स्त्रिया कदाचित् संधि साधून पाहिजे तें करूं शकतील, पण अविवाहित मुली कशा करतील हें त्याला समजेना. तरीपण या मित्रांनी एखादे वेळीं पराचा कावळा केला तरी ते अगदीच थापा देतील असें त्याला वाटेना. त्याला स्वतःला असा अनुभव आला नव्हता आणि तो स्वतःला देखणा समजत असे यांत विशेष घमेंड नव्हती. पण ज्यांना आपण निखालस कुरूप म्हणूं असे मित्रहि जेव्हां असल्या गोष्टी सांगत, तेव्हा काय म्हणावें हें त्याला समजेना. प्रेम आंधळें असतें म्हणतात, तें कदाचित् यामुळेच असेल. पण आपल्यालाच असा अनुभव कां येऊं नये असें त्याला पुनः पुनः वाटे. वेश्यांविषयी मात्र त्याचे सर्व मित्र तुच्छतेने बोलत, आणि त्यांतले कांही स्वानुभवहि सांगत, तेव्हा वेश्यांकडे जाण्याची त्याला मुळीच इच्छा नव्हती. प्रेमाच्या बाबतींत त्याचे मित्र त्याला सांगत, तुझ्या अंगांत धाडस नाही म्हणून तुला असले अनुभव येत नाहीत. नुसत्या कादंबऱ्या वाचीत बसून काय मिळणार ?

मुंबईला जायला निघतांना या सर्व कल्पना त्याच्या मनांत होत्या, पण त्याला स्वतःला देखील त्या इतक्या उघड झाल्या नव्हत्या. तो तिकीट काढण्याकरतां दुसऱ्या वर्गाच्या तिकीटखिडकीकडे जाऊं लागतो तोंच मागून एक मृदु आवाज ऐकूं आला, माझें तिकीट काढतां का मुंबईपर्यंत ?

तो मागे वळून पाहतो तों एक अठरावीस वर्षांची मुलगी कडेवर एक गोजिरवाणें मूल घेऊन त्याच्याकडे पहात उभी होती. त्याने थोड्याशा आश्चर्यानेच तिच्याकडे पाहिलें, तों ती म्हणाली, मी पैसे घ्यायला विसरलें आणि आणायला परत जाईन तर गाडी चुकेल. आपण मुंबईलाच जात असाल तर तेथे मी आपले पैसे देईन.

तिच्या चेहेऱ्याकडे पाहिल्यावर नाही म्हणणें त्याला अशक्य होतें. तिच्या पोषाखावरून ती बहुधा मुंबईचीच असावी असें त्याला वाटलें. उकडत असल्या-

मुळे ती पदराचा उपयोग वारा घेण्याकडे करीत होती, आणि बिनबाह्याचीं पोलकीं जरी त्याने पाहिलीं होतीं, तरी तिच्या बाहीची लांबी शून्यापेक्षाहि कमी झालेली पाहून त्यालाच तिच्याकडे पहायची लाज वाटूं लागली. हें पाहून तिने पदर नीट घेतला आणि पुनः विचारलें, मग काढतां ना माझें तिकीट ?

तिचे डोळे पारदर्शक होते. पारदर्शक डोळ्यांतून आपल्याला मनुष्याचें अंतरंग दिसतें अशी पुष्कळांची कल्पना होते, आणि अशा माणसांवर सहज विश्वास बसतो. अर्थात् पारदर्शक डोळ्यांचा आणि स्वभावाचा कांही संबंध नसतो, पण पुष्कळ लोक नकळत असा संबंध जोडतात. त्याने तिच्याकडे पाहून चटकन् होय म्हटलें आणि दोन तिकिटें काढलीं. वाटेंत त्यांच्या विभागांत फारसें कोणी नव्हतेंच, तेव्हा त्यांना खूप बोलायला सांपडलें. बोलण्याचा बराच भाग तीच संभाळीत होती, आणि तिच्याजवळ मूल असल्यामुळे संभाषणाला बरीच मदत झाली. वास्तविक त्याला बोलायला पाहिजे होतें असें मुळीच नाही. केवळ तिच्याकडे पहात बसण्यांतहि त्याला आनंद झाला असता, पण तें बरें दिसलें नसतें. मुलाचा आणखीहि एक उपयोग होता. अगदी सहजगत्या चुंबनाचे बरेच प्रकार मुलांवर सप्रयोग दाखवतां येतात, आणि त्यांत कोणालाहि कांही चमत्कारिक वाटत नाही. त्याचें मन मात्र त्यामुळे बरेंच क्षुब्ध झालें. माता ही पवित्र असते, आणि मुलाला पाजतांना मातेचे स्तन दिसले तरी त्यामुळे उद्दीपन होत नाही अशी एक समजूत आहे, पण अर्थातच हें पाहणाराच्या मनःस्थितीवर राहतें. कामतृप्ति ज्यांना सुलभ असते त्यांची गोष्ट वेगळी, आणि जे या बाबतींत बुभुक्षित असतात त्यांची वेगळी.

मुंबईला उतरतांना ती म्हणाली, आतां तुम्ही माझ्याबरोबर कांही येऊं नका. मला बोलतील कांहीतरी नाहीतर. मला गाडीपुरता एक रुपया द्या म्हणजे झालें.

आतां अविश्वास दाखवणें शक्यच नव्हतें, तेव्हा त्याने मुकाट्याने एक रुपया काढून दिला. ती पुढे म्हणाली, मी तुमचे पैसे उद्यांच परत देईन. उद्या संध्याकाळीं साडेपांच वाजतां मलबार हिलवरच्या बागेंत या, आणि मी यालाहि बरोबर आणणार नाही. म्हणजे आपल्याला निवांतपणें बोलायला सांपडेल.

'बरें' म्हणून त्याने प्रेमळ दृष्टीने तिचा निरोप घेतला आणि बोरीबंदर-जवळच्याच एका वसतिगृहांत तो उतरला. दुसऱ्या दिवशीं तो ठरल्या ठिकाणीं पांच वाजतांच जाऊन बसला. साडेपांच झाले, सहा झाले, साडेसहा झाले, तेव्हां त्याला शंका येऊं लागली की ही बाई खरोखरच येणार आहे काय? शेवटीं अंधार पडूं लागल्यावर त्याने आशा सोडली. पैसे तर गेलेच, पण ती पुनः कधीं भेटणार नाही हेंहि उघड दिसूं लागलें. स्त्रीजात तेवढी बेईमान असें म्हणतात तेंच खरें, अशी त्याची वालंबाल खात्री झाली आणि शेवटीं कंटाळून तो निघून गेला.

नंतर तो जेवण करून सिनेमाला गेला. ती प्रेमकथा पाहून आणि ऐकून त्याला मुळीच समाधान लाभलें नाही. तो बाहेर पडला. त्याला काय वाटलें कोणास ठाऊक, गर्दी संपेपर्यंत तो बाहेरच्या पदपथावर रेंगाळला. इतक्यांत जवळच एक गाडी उभी राहिली आणि गाडीवान म्हणाला, चला रावसाहेब, बाईसाहेब वाट पहात आहेत.

त्याला फारच आश्चर्य वाटलें. आजूबाजूला दुसरें कोणीच नसल्यामुळे तो आपल्याशींच बोलतो आहे अशी त्याची खात्री झाली, तेव्हा तो म्हणाला, कोण बाईसाहेब?

—आमच्या बाईसाहेब, दुसऱ्या कोण?

शेवटीं त्याच्या मनांत विचार आला की कदाचित् तिने तर ही गाडी पाठवली नसेल? गाडी खासगी दिसत होती, तेव्हा तेंहि शक्य आहे, असा विचार करून, आणि निदान गंमत तर पाहूं या असें म्हणून तो गाडींत बसला. कांही वेळाने गाडी एका गल्लींत शिरून एका घराशीं उभी राहिली आणि गाडीवाला त्या घरांत शिरून परत आला, आणि त्याच्या मागोमाग एक लठ्ठशी बाई येऊन गाडींत शिरून त्याच्या शेजारीं बसली आणि लडिवाळपणानें म्हणाली, आपण जरा हिंडून येऊं हां!

तो इतका गोंधळून गेला की त्याला काय म्हणावें हें सुचेना, आणि गाडी चालूं लागली. गाडी बंद होती, यामुळे बाहेरून कोणालाहि कांही दिसणें शक्य नव्हतें, तेव्हा ही गंमत पुढें पाहूं या म्हणून तो कांहीच बोलला नाही. कांही

वेळाने गाडी एका दुकानाशीं उभी राहिली, आणि तिने खूण करतांच दुकानदार एक उंची सिगारेटचा डबा घेऊन आला. तिने तो घेऊन नंदाला म्हटलें याचे पैसे द्या, मग आपण हिशोब करूं.– त्याने पैसे दिले. आणि गाडी परत गल्लींतल्या घराशीं येऊन उभी राहिली. ती उतरली आणि त्यालाहि तिने आंत बोलावलें. पण अगोदर तिने सांगितल्यावरून त्याला गाडीवाल्याला तीन रुपये द्यावे लागले. त्याला आंत नेऊन तिने एका शृंगारलेल्या खोलींत कोचावर बसवलें, आणि–मी आलेंच हां!—असें म्हणून ती निघून गेली. सुमारें पंधरा मिनिटें त्याने वाट पाहिली, तों पुनः एक गाडी दाराशीं येऊन उभी राहिल्याचा आवाज झाला. शेजारच्या एका खोलींत कोणी बोलल्याचा आवाज येऊं लागला, आणि एका नोकराने येऊन त्याला सांगितलें, बाईसाहेबांना भेटायला एक गृहस्थ आले आहेत. त्यांना घालवून बाई इतक्यांत येतील.–तेव्हा त्याने आणखी पांच मिनिटें वाट पाहिली, आणि आतां येथून निसटून जाणें बरें असा विचार करून ती बाई ज्या दरवाजाने गेली तो त्याने हलकेच ढकलून पाहिला, तों तो उघडला आणि पाहतो तों त्या खोलींत कोणचि नाही. तो आणखी पलीकडच्या खोलींत गेला, आणि तेथून रस्त्याकडचा दरवाजा उघडा दिसला, तेव्हा त्या दरवाजाने तो बाहेर जाऊं लागला. तों एक नोकर मागून येऊन म्हणाला, चाललांत काय रावसाहेब? बसा ना! बाई इतक्यांत येतील.—तो कांहीच न बोलतां जवळ जवळ पळतच बाहेर निघून गेला. वास्तविक पळण्याचें कांहीच कारण नव्हतें. त्याला थांबवण्याचा अधिक प्रयत्न कोणींहि केला नाही.

आज झाली इतकी गंमत पुरे, असा विचार करून तो जाऊन निजला. दुसऱ्या दिवशीं रविवार असल्यामुळे दुपारीं नाटकें होतीं. तो सौभद्राला गेला. नाटक संपल्यावर शेजारींच वेश्यांचा मोहल्ला असल्यामुळे तेथे हिंडून गंमत पाहण्याची त्याला इच्छा झाली. तो इकडेतिकडे पहात हिंडत होता, तों एक इसम त्याच्या कानाला लागून म्हणाला, रावसाहेब, पारसण पाहिजे का? लय चांगली आहे बघा. धंदेवाली नाही, अगदी घरगुती. असेल तर मी ठरवून देतों. चला माझ्याबरोबर.

नंदा कांही बोललाच नव्हता, तरी तो त्या माणसाबरोबर गेला. एका इमारतीशीं पोंचल्यावर तो इसम म्हणाला, येथे तिसऱ्या मजल्यावर राहते ती. तुम्ही ह्या चहाच्या दुकानांत बसा, तोंवर मी ठरवून येतों, असें म्हणून तो चहाच्या दुकानांत शिरला आणि त्याने चहाचा हुकूम दिला. तो हळूच म्हणाला, आतां पांच रुपये द्या, म्हणजे मी ठरवतों, आणि मग आणखी पांच द्यावे लागतील. आधीच दहा दिले तर मग कटकट नाही.

नंदाने पांच रुपये काढून दिले आणि तो मनुष्य चहा पिऊन निघून गेला. नंदा पंधरा मिनिटें दुकानांत वाट पहात बसला, आणि त्याचा पत्ता नाही असें पाहून तो समजला की यानेहि आपल्याला फसवलें. चहाचें बिल देऊन तो निघून गेला.

आतां गंमत बस झाली असें ठरवून तो वसतिगृहांत जायला निघणार, तों एका ठिकाणीं दुसऱ्या मजल्यावर–मॅसाज अँड बाथ–अशी पाटी त्याला दिसली. त्याने मर्दनगृहांबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकल्या होत्या, तेव्हा काय आहे हें पाहण्याकरतां तो वर गेला. आंत जातो तों एक बाई एका टेबलाशीं बसली होती. तिला त्याने विचारलें, येथें काय आहे?

ती म्हणाली, सगळें कांही आहे. पांच रुपये फी द्या आणि आंत जा.

त्याने पांच रुपये दिले आणि तो दाखवलेल्या दरवाज्याने आंत गेला, तों तेथें एक तरुण स्त्री बसली होती. तिने त्याचें स्वागत केलें आणि त्याला हात धरून बिछान्यावर बसवलें. तो कांहीच बोलेना असें पाहून ती म्हणाली, वाट कसली पाहतां?

नंतर आणखी पुढे होऊन एक हात गळ्यांत टाकून त्याच्या कानाशीं तोंड नेऊन ती म्हणाली, पण...

तो म्हणाला, काय?

ती म्हणाली, पांच महिन्यांचें मूल आहे माझ्या पोटांत.

तो तिच्या हातांतून निसटून बाहेर आला आणि इतक्या त्वरेने जिना उतरून निघून गेला की जिन्यांत पडला नाही हेंच आश्चर्य. (दिसेंबर १९३९)

# पेंचप्रसंग

—सर, मला थोडींशीं गणितें अडलीं आहेत, सांगाल का ?

—अं ? हं, सांगेन. पण आधी 'सर' म्हणूं नका, आणि 'गणितें' म्हणूं नका. म्हणजे हरकत नाही. पण आत्तां मात्र मला वेळ नाही, पुनः केव्हां तरी विचारा.

पद्मा फडके कांही दगड नव्हती. पण मध्यंतरी आजारी असल्यामुळे वर्गांत झालेला कांही भाग तिला समजत नव्हता. प्रो. वामनराव प्रसंगे विलायतेंतून कीर्ति मिळवून आले होते. तेथे त्यांनी तीन वर्षें घालवलीं होतीं, आणि त्या अवधींत त्यांनी आपल्या बायकोला कोंकणांत आपल्या घरीं ठेवली होती. पण ही ठेव त्यांना परत मिळाली नाही. ते विलायतेंत असतांनाच ती वारली. ती कशाने मेली हें त्यांना कधींच धडसें कळलें नाही. तिच्यासंबंधी कांही अफवा त्यांच्या कानावर आल्या होत्या, आणि तिने कांही कारणाने जीव दिला असेंहि कांही लोक म्हणत. घरच्या माणसांचें म्हणणें पडलें की ती विषमज्वराने मेली. ती मेल्यावर त्याची जास्त चिकित्सा करण्यांत अर्थ नव्हता, पण त्यामुळे वामनराव इतके उद्विग्न झाले होते की पुनः लग्नाच्या भानगडींत पडायचें नाही असें त्यांनी मनाशीं ठरवून टाकलें होतें. या घटनेने त्यांना सामाजिक प्रश्नांसंबंधी विचार करायला लावलें आणि मित्रमंडळींत चर्चा करतांना ते आपले विचार जोराने मांडूं लागले.

पद्मा विधवा होती. तिचा नवरा लग्न झाल्याबरोबरच वारला होता आणि धाकट्या दिराच्या आग्रहावरून तिला आपलें शिक्षण पुढे चालवायला सवड मिळाली होती. त्याचीहि त्यांत सोय होती, कारण त्याची बायको नेहमी आजारी असल्यामुळे माहेरींच असे. तेव्हा भावजईला आणून मुंबईत बिऱ्हाड केल्यामुळे त्याची जेवणाची सोय आयतीच झाली होती.

प्रो. प्रसंगे घरीं केव्हा असतात याचा त्यांच्या नोकराजवळ तपास करून पद्मा नेमक्या वेळीं त्यांच्या घरीं गेली. घरीं ते एकटेच रहात असत. नोकराने

दार उघडून त्यांची बसण्याची खोली दाखवली. ते वाचनांत गढून गेले होते, तेव्हा तिने दारांतूनच ' मी येऊं का ? ' म्हणून विचारलें. तेव्हां त्यांनी वर पाहून उठून पुढे येऊन तिचें स्वागत केलें.

—या, काय काम आहे ?

—मी परवां कालेजांत विचारलें होतें, तेव्हा आपल्याला वेळ नव्हता, म्हणून......

—हां हां, मी विसरलोंच होतों. तुम्हाला ' गणितें ' अडलीं आहेत नाही का ?

—पण ' गणितें ' म्हणायचें नाही ना ?

—हें तुमच्या लक्षांत राहिलें ? ठीक.

—पण मग म्हणायचें काय ?

—' उदाहरणें ' म्हणावें, 'प्रश्न' म्हणावें. बरें पण मी तुम्हाला असें विचारतों की वर्गांत तुम्ही काय करीत असतां ? तेथे मीच शिकवतों. तेथे समजलें नाही, तर तुमचें लक्ष नसतें, किंवा मला शिकवतां येत नाही असा त्याचा अर्थ होतो. तसें असलें तर सांगा, म्हणजे मला कांही सुधारणा करतां येईल.

—तसें नाही. तुह्मी उत्तम शिकवतां असेंच सगळीं मुलें म्हणतात, पण मी मधें आजारी होतें म्हणून कॉलेजांत जातच नव्हतें. एरवीं मला समजतें.

—बरें मग काढा काय आहे तें.

यानंतर पद्मा त्यांच्याकडे वारंवार जाऊं लागली आणि तिला जायला सबब जरी चांगली होती, तरी ती वारंवार जाऊं लागल्यामुळे लोकांत कुजबुज सुरू झाली. ती विधवा होती आणि प्रो. प्रसंगे सुधारक अशी बोलवा असल्यामुळे हे लवकरच या पंकांत रुतलेल्या गाईचा उद्धार करणार असें लोक म्हणूं लागले. पद्मा रूपाने जरी अप्सरा नव्हती, तरी शंभर जणींत उठून दिसेल अशी होती. वामनराव जरी विशेष देखणे नव्हते तरी कुरूपहि नव्हते, आणि त्यांच्या चेहऱ्यावर हुशारीचें तेज होतें. चेहऱ्यावरून हुशार दिसणारे लोक कधीकधी दगड असतात हें खरें, पण त्यांची गोष्ट तशी नव्हती हें वर सांगितलेंच आहे. अशा स्थितींत या दोघांच्या ओळखीचें स्नेहांत आणि नंतर प्रेमांत रूपांतर झाल्यास नवल मुळीच नव्हतें. तथापि वामनरावांनी पुनः लग्न न करण्याचा जो निश्चय

केला होता, तो त्यांना तिच्याशीं अधिक सलगी करूं देत नव्हता. यामुळे हें प्रियाराधन नेहमीच्या उलट दिशेने होत होतें. नेहमीची पद्धत म्हणजे पुरुषाने थोडी लगट करण्याचा प्रयत्न करायचा आणि स्त्रीने थोडे मागे सरायचें किंवा निदान तसें दाखवायचें. त्याच्या उलट येथे होत असे. उदाहरण समजाऊन देतांना वामनराव कागदावर लिहून दाखवूं लागले, म्हणजे तें पाहण्याकरतां तिला त्यांच्या जवळ बसावें लागे. तें किती जवळ बसायचें हे कोण ठरवणार ? एक पद्धत म्हणजे शक्य तितकें लांब बसून मानेला ताण देऊन पहायचा प्रयत्न करायचा. दुसरी पद्धत म्हणजे एखादे वेळीं स्पर्श झाला तरी हरकत नाही, पण मानेला ताण न पडेल आणि तरी सहज दिसेल इतकें जवळ बसायचें. यांतला तिने दुसराच मार्ग पतकरला आणि तिने तो पतकरल्यावर ते तिला लांब बसायला कसे सांगणार ! बायकांना नैसर्गिक लज्जा असते असा एक लोकभ्रम आहे, पण निरीक्षण करणाराला हें सहज दिसतें की पुरुषांचाच विनय नैसर्गिक असतो आणि बायकांना तो लहानपणापासून शिकवावा लागतो. यामुळे प्रो. प्रसंगें जसजसे अंग चोरूं लागत, तसतशी ती अधिक जवळ बसूं लागल्यामुळे शेवटी त्यांना अंग चोरणें अशक्य झालें. त्यांतून त्यांच्या घरांत नोकराशिवाय कोणीच नव्हतें आणि तोहि नेहमी घरींच असे असें नाही. यामुळे तिला लाजायचें फारसें कारणच नव्हतें. हा प्रकार नोकराच्याहि लक्षांत आला होता आणि ही बाई आपली धनीण होणार असेंच तो धरून चालल्यामुळे, एखादे वेळीं वामनराव घरीं नसतांना ती येऊन त्यांची वाट पहात बसली तर तो आपल्याच जबाबदारीवर तिला चहा देऊं करीत असे आणि ती प्रथम नको म्हणाली तरी नंतर घेऊं लागली.

हें असें बरेच दिवस चाललें होतें. अलीकडे ती मुद्दाम सोपीं उदाहरणें देखील विचारायला येत असे, हें त्यांच्या लक्षांत आलें असें पाहून एके दिवशीं ती नुसतीच येऊन बसली आणि त्यांनी ' काय आहे ? ' म्हणून विचारतां 'कांही नाही, उगीच आलें. ' असें उत्तरली. ती आली म्हणजे त्यांच्या अगदी जवळ जाऊन बसायची, याची आतां संवयच झाली होती. तशीच ती कारण नसतांहि कोचावर त्यांना खेटून बसली आणि त्यांना बोलायला अवसर न देतां इकडच्या तिकडच्या गप्पा मारूं लागली. अर्धा पाऊण तास झाला तरी ती हालेना असें

पाहून वामनराव म्हणाले, 'आतां आपण चहा घेऊं या. आज गडी गेला आहे बाहेर, तेव्हा मीच तुम्हाला चहा करून देतों.' असें म्हणून ते चहाच्या त्यारीला लागले.

—मला सांगा ना. मी करतें, पद्मा म्हणाली.

—छे छे, तुम्ही बसा आपल्या. पाहुण्यांना कोठे चहा करायला सांगतात का ?

—काय झालें त्यांत ? हीं बायकांचीं कामें बायकांनीच करावीं.

—ती आपली तुमची समजूत आहे. पुरुषांनी मनांत आणलें तर करतां येणार नाही अशी गोष्टच नाही. शिवाय माझा गडी पुरुषच आहे, तो किती चांगला चहा करतो तुम्हांला माहीत आहे.

चहा घेऊन झाल्यावर वामनराव म्हणाले, आतां मला माफ करा. मला बाहेर गेलें पाहिजे.

—इश्श ! मी बराच वेळ गप्पा मारायला म्हणून आलें होतें. तर तुम्ही आपले बाहेर चाललांत.

— मग पुनः केव्हा तरी या. आत्तां मला गेलेंच पाहिजे.

—मग अमुक दिवशीं असें सांगा. नाहीतर केव्हातरी आलें म्हणजे आपलें पुनः पळून जायला वरं.

—नाही नाही, पळून जायचें काय कारण आहे ? येत्या शनिवारीं या, मग आपण बोलूं.

पद्मा बिचारी घरीं परत गेली. तिचा दीर तिला अतिशय चांगल्या रीतीने वागवीत असे इतकेंच नाही तर स्वयंपाकांत देखील मदत करीत असे, आणि शिवाय त्याच्यामुळेच तिच्या पुढच्या शिक्षणाची परवानगी मिळून सोय झाली होती हे त्याचे उपकार होतेच. त्याचा स्वभावहि मनमिळाऊ होता, पण तो अलीकडे तिच्याशीं बरीच लगट करूं पहात होता तें तिला आवडत नव्हतें. तिचें मन जर अगोदरच वामनरावांकडे कललें नसतें तर त्याचा काय परिणाम झाला असता हें सांगणें कठिण, पण हल्ली तिची स्थिति फार चमत्कारिक झाली होती. त्याचें मन दुखावल्यास आपलें शिक्षण बुडेल एवढीच भीति त्यांत होती असें नाही, तर अशा सुस्वभावी दिराचें मन दुखावणेंहि तिला कठिणच

होतें. अनंतरावाला वेताच्या पगाराची नोकरी होती, त्यांतूनच तिच्या शिक्षणाचा खर्च चालत असे. त्या दिवशीं ती घरीं गेली तेव्हा तो घरीं नव्हता, पण तो कचेरींतून आल्यावर तिच्या मनांतील चलबिचल त्याच्या ध्यानांत आल्याशिवाय राहिली नाही.

पद्मा ठरल्याप्रमाणे शनिवारीं वामनरावांकडे गेली, पण यावेळींहि तिचा हिरमोड झाला. शनिवार असल्यामुळे वामनरावांची कांही मित्रमंडळी जुहूला जायला निघाली होती, आणि ते वामनरावांना आग्रह करायला आले होते. पद्मा आली असल्यामुळे वामनराव येत नाहीत, असें पाहून त्यांनी तिलाहि आग्रह केला. त्यांच्याबरोबर कांही बायकाहि होत्या आणि त्यांचा पोहायचा बेत होता, तेव्हा पद्माला कांहीतरी नेसायला पाहिजे म्हणून तें घेण्याकरतां मोटर तिच्या घरावरून घ्यायचें ठरलें आणि तीहि जुहूला गेली. अर्थात् तिला घरीं परत यायला उशीर झाला, तेव्हा ही सगळी हकीकत दिराला सांगणें भाग पडलें.

यानंतर पुनः जेव्हा ती वामनरावांकडे गेली, तेव्हा मात्र कोणताही अडथळा न येतां त्यांना मनसोक्त बोलायला मिळालें. नोकरही बाहेर गेला होता, तेव्हा कोणतीच अडचण नव्हती. एकमेकांची माहिती परस्परांना सांगून झाली, सिनेमानाटकांवर चर्चा झाली, आणि या सर्व गोष्टी अगदी शेजारीं बसून. वामनराव कितीहि जपून वागले, तरी या सान्निध्याचा परिणाम त्यांच्यावर झाल्याशिवाय कसा राहणार? चंद्राला पाहून समुद्राला भरती येते ही कांही समुद्राची चूक म्हणतां येणार नाहीं, आणि लाटा न येऊं देण्याचा समुद्राने आपल्याकडून कितीहि बेत केला, तरी तो सिद्धीस कसा जाणार? तथापि वामनरावांना लग्नाच्या भानगडींत पुनः पडायचें नव्हतें, तेव्हा याचा शेवट काय होणार याची त्यांना भीति होती. जातेवेळीं 'मी जातें आतां' म्हणून जेव्हा ती एकदम त्यांच्याकडे वळली, त्या वेळीं तिचें तोंड इतकें जवळ आलें होतें की दुसरा कोणी असता तर चुंबन घेतल्याशिवाय राहता ना. पण त्यांनी स्वतःला आवरलें आणि इतक्यांत नोकर परत आल्यामुळे ती ताबडतोब निघून गेली.

या सर्वांचा परिणाम वामनरावांपेक्षा पद्मावरच जास्त झाला होता आणि

त्याचा फायदा त्या रात्रीं तिच्या दिराने घेतला. जेवण झाल्यावर ती नेहमी थोडावेळ वाचीत बसत असे. त्याऐवजी ती रडत असलेली पाहून त्याने तिला कुरवाळून रडण्याचें कारण विचारलें, पण ती कांहीच न बोलतां जास्तच रडूं लागली. तेव्हा अर्थातच त्याने तिला जास्त जवळ घेतली, आणि याचें पर्यवसान म्हणजे केवळ तिच्या उत्तेजित स्थितीमुळे तिला त्या रात्रीं त्याला दूर ठेवतां आलें नाही.

या चुकीचा परिणाम तिला जेव्हा लवकरच वांत्यांच्या रूपाने जाणवूं लागला, तेव्हा यांतून तोड काय काढावी हें त्या दोघांनाही संकट पडलें. वामनरावांनी तिला उघड झिडकारलें नव्हतें, तेव्हा ती या अवधींत त्यांच्याकडे बऱ्याच वेळां गेली होती आणि एका वेळीं वामनरावांनाही मोह अनावर होऊन त्यांचा संबंध घडला होता. ती वामनरावांबद्दल दिराजवळ बऱ्याच वेळां बोलत असे आणि त्यांची अतोनात स्तुति करीत असे, यामुळे तिच्या प्रेमाची दिराला थोडीबहुत कल्पना होतीच. आतां त्याने अशी युक्ति काढली की ती गरोदर झाली आहे हें वामनरावांना सांगून त्यांना तिच्याशीं लग्न करायला भाग पाडावें. अशा स्थितींत सुद्धां त्यांना फसवणें तिला बरें वाटलें नाही, आणि तिने या बेताला संमति दिली नाही.

तथापि अनंतराव एकदां या उद्देशाने वामनरावांकडे गेलाच आणि आपली ओळख देऊन म्हणाला, पद्मा आपल्याकडे वारंवार येते हें मलाच नव्हे तर पुष्कळ लोकांना माहीत आहे. आतां ती गरोदर झाली आहे, हें आपलेंच कर्म असलें पाहिजे हें उघड आहे, तेव्हा तुम्ही तिच्याशीं मुकाट्याने लग्न करावें एवढाच यांतून मार्ग आहे. तिच्या आईबापांना आणि सासूसासऱ्यांना तें आवडणार नाही, पण तें मी पाहीन. हें तुम्ही कबूल न केलें तर मात्र तिचीच नव्हे तर तुमचीहि बेअब्रू झाल्याशिवाय राहणार नाही.

ती गरोदर आहे हें ऐकून वामनराव थक्कच झाले होते, पण अनंतरावाचें भाषण संपल्यावर ते शांतपणें म्हणाले, हें माझें कृत्य आहे ही आपली समजूत चुकीची आहे, आणि पुनः लग्न न करण्याचा माझा निश्चय आहे तो बदलण्याचें मला कारण दिसत नाही.

अनंतरावाला भांडण करण्यापासून कांहीच फायदा नव्हता, तेव्हा तो सामोपचाराने म्हणाला, हें तुमचें कृत्य नाही असेंहि घटकाभर धरून चाललें तरी देखील या प्रकरणाचा जर बभ्रा झाला तर तुमची बेअब्रू होईल. इतकेंच नव्हे तर तुमच्या नोकरीवरहि कदाचित् गदा येईल. पुण्यांतला एक प्रोफेसर वेश्येच्या घरीं जातांना दिसल्यावरून त्याला बडतर्फ केल्याची हकीकत तुम्हाला माहीतच असेल. तेव्हा याचा विचार करा, पण लवकर करा. कारण याचा कांहीतरी निकाल केलाच पाहिजे. शिवाय पद्मा कांही वाईट मुलगी नाही, तिच्याशीं लग्न केल्याने तुम्हाला बिलकुल कमीपणा येणार नाही.

—तुम्हाला सरळ सांगून तुम्ही ऐकाल असें दिसत नाही. आतां तुमच्याच भाषेंत सांगतों की राजश्री, याचा बभ्रा झाला तर तो माझ्या गळ्यांत न येतांना आपल्या गळ्यांत येईल. माझ्या घरीं ती येते ही गोष्ट खरी, पण तुमच्या तर ती घरींच राहते. इतकेंच नव्हे तर मजकडून कोणालाहि गर्भ राहणें शक्य नाही असा भक्कम पुरावा मी देऊं शकेन.

—तो कसा काय ?

—तें मी सांगतों, म्हणजे तरी तुम्ही भलताच वेडेपणा करणार नाही. मी विलायतेंत असतांना माझी बायको वारली आणि तेव्हाच मीं निश्चय केला की पुनः लग्न करायचें नाही. तेथे आमच्या मित्रमंडळींत संततिनियमनाबद्दल बरीच चर्चा होत असे, आणि त्याकरतां जी शस्त्रक्रिया करतात तीसंबंधी एकदां एका मित्राशीं बोलणें चाललें होतें. तेव्हा तो म्हणाला 'लोकांना सांगायला काय होतें? पण हें अजून नवीन आहे, आणि त्याने आपल्या पौरुषाला धक्का लागेल की काय अशी लोकांना साहजिकच भीति वाटते. याचा अनुभव कोणीं घेतला आहे का ?' मी म्हणालों 'मला कांही आतां लग्न करायचें नाही, तेव्हा शस्त्रक्रियेचा खर्च द्यायला कोणी तयार असेल तर मी स्वतः अनुभव घ्यायला तयार आहें.' मी उगाच बढाई मारतों आणि खरोखर तयार होणार नाही, अशा समजुतीने तो म्हणाला 'मी खर्च देतों. कधी करून घेतां ?' मी म्हणालों 'म्हणाल तेव्हा.' त्याप्रमाणे सगळी व्यवस्था होऊन मीं शस्त्रक्रिया करून घेतली.

—पण याचा पुरावा काय ?

—याचा पुरावा त्या डाक्तराकडून जरी न मिळाला, तरी त्याचा प्रत्यक्ष पुरावा मला केव्हांहि देतां येईल, हें कोणीहि डाक्तर तुम्हाला सांगेल. तेव्हा मला तर उघड दिसतें की तिला गर्भ राहिला असला तर त्याला जबाबदार तुम्ही आहां, मी नव्हे.

ते इतकें बोलतात तों पद्मा आंत आली. ती बराच वेळ रडली असावी असें तिच्या चेहऱ्यावरून दिसत होतें. ती दिराला पाहतांच म्हणाली, शेवटीं तुम्ही आलांतच ना इकडे ? मी तुम्हांला बजावलें होतें मला हें पसंत नाही म्हणून. तें कांही नाही, मी त्यांना सगळें खरें सांगणार. मग काय व्हायचें असेल तें होईल.

**अनंतराव**—पद्माताई, आतां सांगायचें कांही राहिलेलें नाही. त्यांनी सगळें तर्कानें ताडलें आहे. ही चूक सर्वस्वी माझीच आहे, पण तिचे परिणाम मात्र भलत्याला भोगावे लागणार आहेत. वामनराव, यांत पद्माची कांही चूक नाही. तिचें तुमच्यावर खरोखरच प्रेम आहे. मी केवळ तिच्या क्षुब्ध मनःस्थितीचा फायदा घेतला, पण मला आतां त्याबद्दल पश्चाताप होत आहे. आपण जर मन थोर करून यांतून आमची सुटका केली नाही, तर माझ्या चुकीचें प्रायश्चित्त तिला बिचारीला जन्मभर भोगावें लागणार आहे. तेव्हा......

**वामनराव**—तुमच्याकडे प्रेमहि बरेंच स्वस्त आहे आणि पश्चात्तापहि आहे. हें कसलें आलें आहे प्रेम आणि कसला पश्चाताप !

**अनंतराव**—माझें एक राहिलें, मला पश्चाताप झाला आहे हें सिद्ध करायला कांही मार्ग दिसत नाही. पण तुमच्यावर तिचें प्रेम आहे मी अगदी ईश्वराला स्मरून सांगतो. ती तुमची किती स्तुति करीत असते ती जर तुम्ही ऐकली असती तर तुम्हाला संशय राहिला नसता. तुमची खात्री कशी करावी हेंच मला समजत नाही.

पद्मा कांहीएक न बोलतां एका बाजूला तोंड करून रडत होती. तिकडे वामनरावांचें लक्ष गेलें आणि ते तिच्याकडे चळले असें पाहून अनंतराव मुकाट्यानें निघून गेला.

— तुमचें काय म्हणणें आहे याबद्दल ? वामनरावांनी विचारलें.

—मला हें असलें मारूनमुटकून लग्न व्हायला नको आहे. माझें काय

म्हायचें असेल तें होईल. प्रेमाऐवजी दयेने मनुष्य लग्न करूं लागला, म्हणजे शेवटीं पश्चातापाची वेळ यायचीच. तुम्हाला या संकटांत घालायची माझी इच्छा नाही. आपल्या चुकीबद्दल दुसऱ्याला कां त्रास ? तुमचें कांही माझ्यावर प्रेम नाही.

—बरें, माझी लग्न करायची इच्छा असली तर ?


—पण ' प्रेम आहे ' असें कांही म्हणवत नाही !

—म्हणायचें काय त्यांत ? प्रेम हें नेहमी वागणुकीवरून दिसतें. म्हटल्याने त्यांत कमजास्त होत नाही.

—मला नाही असलें समजत !

—बरें 'प्रेम आहे' म्हणतों. आतां झालें ? (जानेवारी १९४०)

समाप्त



Mai

प्रो. र. धों. कर्वे

यांचें नवीन पुस्तक

# वेश्याव्यवसाय

किंमत दोन रुपये,

ट. ख. ६ आणे

राइट एजन्सी,

१३ नवी भटवाडी,

मुंबई-४.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], दुसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.

३. संततिनियमन [ सचित्र ], ७ वी आवृत्ति,
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

४. गुप्त रोगांपासून बचाव [ सचित्र ], २ री आवृत्ति,
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख.
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षे], २—४—०, ट. ख. ६ आ.
भाग २ रा [वर्षे ४—५—६], २—०—०, ट. ख. ५ आ.
दोन्ही भाग घेणारांस किं. ४—०—०, ट. ख. ८ आ.

६. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

७. गुरुबाजी ( नाटक ) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.

प्रकाशक: रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३ नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.
मुद्रक: जी. जी. पाठारे, पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
१०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७.